# माणूस

शनिवार । ८ एप्रिल १९७८ । ७५ पैसे

मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील
उद्योगमंत्री श्री. शरद पवार
यांच्यावर
उपमुख्यमंत्री श्री. नासिकराव तिरपुडे
यांनी चढविलेले हल्ले काय सांगतात ?

## दोन काँग्रेस विलिनीकरणातील धोके

विशेष वार्तापत्र : माहितगार

श्रीमती गांधींची एकाधिकारशाही
थोपविण्याची जबाबदारी
जशी काँग्रेस पक्षावर आहे
तशी जनता पक्षावरही आहेच.

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक पंचेचाळीस

८ एप्रिल १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही



□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी · ४४३४५९

□


# आदिवासी जिल्हा

□ 'माणूस' दिनांक २५ चा अंक वाचला. आदिवासींच्या कल्याणासाठी गुजरातच्या सीमेलगतच्या नाशिक, ठाणे, धुळे या जिल्ह्यांतील आदिवासी परिसराचा एक नवा जिल्हा निर्माण करावा ही श्री. रघुवीर मुळे यांनी मांडलेली कल्पना ठीक असली तरी ती अभिनव नाही. आदिवासी विभागात काम करणारा एक कार्यकर्ता म्हणून मला या योजनेचे प्रथमपासून आकर्षण असल्याने जुन्या आठवणींना उजळा आपल्या साप्ताहिकातील वरील लेखामुळे मिळाला.

१९६२ च्या नोव्हेंबर महिन्यात ठाणे, अहमदनगर, धुळे, नाशिक आणि गुजरात राज्यांमधील डांग जिल्ह्याच्या आदिवासी विभागात काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. नाशिक येथे झालेल्या या बैठकीत आदिवासी जनतेच्या प्रश्नांवर विचारविनिमय झाला आणि आदिवासींसाठी प्रादेशिक स्वायत्ततेच्या [Autonomus Region] राजकीय मागणीसाठी जनमत संघटित करण्याचे ठरले. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या नावाखाली आदिवासी जनतेला "पुढारलेल्या विभागाच्या" (तुमच्या लेखाप्रमाणे नॉन-ट्रायबल्स) नेतृत्वाखाली पंचायत समिती, जिल्हा परिषदा या संस्थांत अशा रीतीने गोवण्यात आले आहे की आदिवासींच्या सामान्य हक्कांसाठीसुद्धा या संस्था कुचकामी ठरल्या आहेत. आदिवासींचे निकडीचे प्रश्न सोडविण्यास त्या संस्था समर्थ नाहीत या मुद्द्याला धरून राजकीय मागणी म्हणून प्रादेशिक स्वायत्ततेची मागणी परिषदेने केली होती. त्या वेळी तर या संस्था नुकत्याच अस्तित्वात आल्या होत्या. आज १६ वर्षांनंतरही या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही आणि म्हणूनच लेखातील मागणीही कायम आहे. याशिवाय परिषदेने आदिवासी जनतेचा भुकेचा प्रश्न सोडविण्यासाठी लागवडीलायक सर्व प्रकारची जमीन मालकी हक्काने कसण्यास मिळावी, सर्व प्रकारचे कर्जबोजे जाहीररीत्या रद्द करून आदिवासी विभागाला कर्जमुक्त करावे, किमान वेतन कायदा लागू करून त्याची अंमलबजावणी कडक रीतीने व्हावी याही मागण्या हाती घेण्यात आल्या. यासाठी चळवळ हाती घेऊन २१ नोव्हेंबर १९६२ ला सर्व आदिवासी जनतेची प्रचंड अशी परिषद बोलवावी असेही ठरले होते माझ्या माहितीप्रमाणे ७ किंवा ८ सप्टेंबरला झालेल्या बैठकीस शामराव परुळेकर, गोदुताई, माधवराव गायकवाड, खंडेराव घुटे, आबा वाघिरे, नाना मालुसरे, लक्ष्मणराव बोंबले आदी प्रमुख कार्यकर्ती मंडळी हजर होती.

परिषदेच्या पूर्वतयारीसाठी कार्यकर्ते आदिवासी परिसरात जनमत संघटित करीत असतानाच ७ नोव्हेंबरची त्र्यंबकेश्वरची बैठक आटोपली. या परिषदेला जवळजवळ तीन हजार आदिवासी उपस्थित होते. दुर्दैवाची गोष्ट अशी की, ही परिषद आटोपून आम्ही कार्यकर्ते घरोघर-गावोगावी पोचतो न पोचतो तोच सरकारचे प्रतिनिधी खाकी कपडे घालून 'लोहे के हाथी' घेऊन आमची वाट पहात होते! आम्हा सगळ्या कार्यकर्त्यांना डि. आय्. आर. (भारत संरक्षण नियमान्वये) पकडण्यात आले व अठरा महिने तुरुंगात डांबण्यात आले. परिणामी २१ नोव्हेंबर १९६२ ची मुख्य परिषद बारगळली! असो.

आता पुन: ही मागणी पुढे आली तर खरी खळबळ गरीब आदिवासी वा आदिवासी पुढाऱ्यांत होणार नाही तर गेल्या १६ वर्षांत ज्या नॉन-ट्रायबल्स पुढाऱ्यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची फळे चाखली त्यांच्यात होणार आहे. एकदा प्रस्थापितांनी आपल्या सत्तेला रामराज्य म्हटले की रामाला देण्यासाठी आणलेली बोरे आधी कुरतडली जाणारच. मग त्याला मुखामा द्यावा 'गोड' आहे की नाही ते चाखले. असो.

मागणीला अनुकूलता कितपत लाभते तो प्रश्न वेगळा; पण D.I.R. अजून अस्तित्वात आहे हेही लक्षात घेणे अप्रस्तुत ठरणार नाही.

—एक कार्यकर्ता

आदिवासी विभाग परिषद तयारी कमिटी, (१९६२)

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ जनता पक्ष आणि जयप्रकाश

जयप्रकाशजींच्या आशीर्वादाने आकारास आलेल्या आणि जनतेच्या पाठिंब्याने केंद्रस्थानी सत्तेवर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने आपली पहिल्या वर्षाची कारकीर्द पूर्ण केली आहे. एखाद्या सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करण्यास केवळ एक वर्षाचा अवधी अत्यल्प असला तरी जनता पक्षाने सत्तेवर येण्यापूर्वी जी आश्वासने दिली होती, त्यातील वर्षाच्या कालावधीमध्ये पुरी करता येण्यासारखी सर्व आश्वासने पूर्ण केली आहेत. या सरकारने वर्षभरात काय केले याचे नगारे चौफेर बडविले जात असताना पुन्हा त्याच त्याच गोष्टींचा तपशील देण्यात मतलब नाही. एक गोष्ट नक्की की, लोकशाही दृढमूल व्हावी म्हणून जेवढे काही करता येण्यासारखे आहे तेवढे सारे या सरकारने केले आहे. असे असले तरी जनता पक्षाची प्रतिमा जेवढी सतेज असायला पाहिजे तेवढी ती दिसत नाही याचे मुख्य कारण म्हणून विविध राज्यांतील जनता सरकार ज्या विस्कळित पद्धतीने काम करीत आहे त्याकडे बोट दाखवावे लागेल. जयप्रकाशजींचे जेथे वास्तव्य तो बिहार राज्यामध्ये बळकट शासन उभे राहू न शकल्याने खदखदतो आहे. प्रचंड बहुमत पाठीशी असूनही कर्पूरी ठाकूर यांच्या सरकारला फारसे काही करता आलेले नाही. त्यात सरकारी नोकरीमध्ये राखीव जागा ठेवण्यावरून सध्या जी वावटळ उठली आहे ती सहजी निवेल असे वाटत नाही. इंदिराजींनी जे आक्रमक धोरण स्वीकारले आहे त्याचा वेग आणि दिशा पाहिली तर राम नरेश यादव यांचे सरकार निश्चित उद्देशाने घातल्या जात असलेल्या या गोंधळाला तोंड देऊ शकेल असे वाटत नाही. हरियानाच्या देवीलाल मंत्रिमंडळाबद्दलही फारसे चांगले बोलले जात नाही. साकलेचा यांच्या दादागिरीपुढे हार खाऊन माजी मुख्यमंत्री कैलासचंद्र जोशी यांनी मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाची खुर्ची खाली करून साध्या मंत्रिपदावर समाधान मानले आहे, केंद्र सरकारचे पहिले वर्ष समाधानकारक असले तरी आता त्याच्या खऱ्या कसोटीचा काळ सुरू झाला आहे. अर्थमंत्री एच्. एम्. पटेल ज्या प्रकारे देशाच्या अर्थकारणास वळण देत आहेत त्याबद्दल अनेक ज्येष्ठ मंत्र्यांमध्येही नाराजी आहे. दक्षिणेत जनता पक्षाला जो पराभव पत्करावा लागला त्याचे पडसादही उमटताना दिसतात. मंत्रिमंडळामधील मतभेदाच्या बातम्या वारंवार प्रसिद्ध होत असतात. मंत्रिगणांपैकी राजनारायण यांच्या वागण्या-बोलण्याबद्दल सर्वसाधारण जनतेमध्ये नाराजी नव्हे चीड असलेली दिसते. थोडक्यात म्हणजे केंद्रस्थानी असलेला हा डोलारा एका वर्षाभरात पूर्ण एकजीव होऊन उरलेल्या तीन वर्षात काही निश्चित कार्यक्रमांची अंमलबजावणी करू शकेल की नाही याबद्दल संदेह निर्माण झाला आहे. पोटनिवडणुकांचे निकाल *जनमानसाच्या बदलत्या मतप्रवाहाची दिशा सूचित करतात.* हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत हरियानामधील कर्नाल लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल प्रसिद्ध झालेला असेल. हा निकाल महत्त्वपूर्ण मानावा लागेल.

ज्यांच्या आशीर्वादाने जनता पक्ष आकाराला आला, ज्यांचा शब्द अखेरचा मानून देशाचा पंतप्रधान निश्चित करण्यात आला त्या जयप्रकाशजींना जनता पक्षाबद्दल आणि जनता सरकारबद्दल काय वाटते? त्यांचा सध्याचा दिनक्रम काय आहे? जनता सरकार त्यांच्याशी संपर्क ठेवून आहे काय? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी जेपींचे वास्तव्य असलेल्या पाटणाच्या कदमकुन्दमध्ये जावे लागेल. जनता पक्षाच्या एकंदर कारभाराबद्दल जे. पी. केवळ असमाधानी नाहीत तर ते रागावले आहेत. एका अमेरिकन वार्ताहाराशी बोलताना जनता पक्षाच्या कामकाजाबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली: आपली ही नाराजी आजवर ते केवळ आपल्या विश्वासातील काही व्यक्तींजवळ व्यक्त करीत होते. तथापी मनातील राग आवरून ठेवणे अशक्य झाल्याने त्यांनी आपली प्रतिक्रिया परकी वार्ताहाराजवळ नोंदविली असावी. या नाराजीची धार कमी व्हावी, तसेच काही गोष्टींचा खुलासा व्हावा म्हणून जनता पक्षाचे काही ज्येष्ठ नेते अलीकडे त्यांना भेटून गेले. त्यामध्ये चंद्रशेखर, मधु लिमये, राजनारायण आदि मंडळींचा समावेश आहे. मोरारजी, बाबु जगजीवनराम आणि चरणसिंग या त्रिमूर्तीपैकी मात्र कोणी त्यांच्या भेटीस आले नाही. जेपींच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाचा जो सोहाळा झाला, त्याला हजर रहाण्यासाठी बाबूजी गेले होते; परंतु त्यांना व्यासपीठावर जाऊ देण्यात आले नाही. जेपींचे चिटणीस सच्चिदानंद म्हणतात, जेपींची गाठ घेण्यासाठी कोणी मोठे राजकारणी फारसे येतच नाहीत, जे येतात ते सल्ला घेण्यासाठी येतात असे नव्हे तर केवळ भेट घेण्यासाठी येतात. पंतप्रधानांची फेरी तर फारच क्वचित होते. खरं सांगायचे तर त्यांपैकी पुष्कळांना असे वाटते की, आज त्यांना मिळालेले सत्तास्थान हे त्यांना त्यांच्या स्वतःच्या त्यागामुळे आणि राजकीय तपस्येमुळे प्राप्त झाले आहे.

जनता पक्षाबद्दल जेपींच्या मनात असलेली नाराजी कमी व्हावी यासाठी जनता पक्षामध्ये काही विशेष व्यक्ती प्रयत्नशील आहेत. जनता पक्ष वर्षाभरापूर्वी केंद्रस्थानी सत्तेवर आला त्या वेळी आपण एक वर्षानंतर या सरकारच्या कार्याचे मूल्यमापन करू असे जेपींनी सांगितले होते, याची जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना जाणीव आहे. त्यामुळे जनता पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते त्यांना भेटून जनता सरकारच्या कामाबद्दल त्यांची जी प्रतिक्रिया आहे ती जाणून घेण्याचा

पुष्ठ २३ वर

# कॉंग्रेस विलिनीकरण : ऊहापोह

## माहीतगार

काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांच्या विलिनीकरणाची चर्चा काँग्रेस गोटात चालू असून कार्यकर्ते विलिनीकरणास अनुकूल आहेत असे वातावरण निर्माण केले जात आहे. विलिनीकरणाचा विचार काँग्रेस पराभवाची शक्यता दिसू लागली तेव्हापासून सुरू झाला आहे आणि पराभवानंतर त्याची जोरात चर्चा सुरू झाली. 'काँग्रेसला बहुमत मिळण्याची शक्यता नाही हे दिसू लागले तेव्हा काही मोठ्या नेत्यांनी दोन्ही काँग्रेसच्या विलिनीकरणाचा विषय इंदिरा गांधी यांच्याकडे काढला होता. प्रचाराची रणधुमाळी चालू असताना विलिनीकरणाचा खटाटोप चालला होता' अशी माहिती मला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सांगितली होती; परंतु हा विषय गांधींजवळ कोणी काढला होता त्याचे नाव जोशीबुवांनी सांगितले नव्हते. पुढेपुढे हा विषय वसंतराव नाईक यांनी काढला होता हे जगजाहीर झाले. विलिनीकरण झाले पाहिजे असे मानणारी मंडळी कोण आहेत? विलिनीकरणाची आवश्यकता या मंडळींना व इतर काही कार्यकर्त्यांना का वाटत आहे? विलिनीकरणाच्या मागणीचे वेळापत्रक कसे आहे? मागणीकरता जोर सुरू झाला तो का झाला आहे? विलिनीकरणाची आवश्यकता आहे का? विलिनीकरणामुळे कोणते धोके संभवनीय आहेत? वगैरे प्रश्नांचा साकल्याने विचार झाला पाहिजे. हा विचार प्रामुख्याने काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. त्यांनी तो करावा किंवा जे कार्यकर्ते या सर्व बाबींचा विचार करीत असतील त्यांच्या विचारासाठी काही मुद्दे मांडावेत व त्यायोगे विलिनीकरणासंबंधी साधकबाधक चर्चा व्हावी हा हेतू बाळगून काँग्रेसच्या राजकारणाचा हा ऊहापोह करत आहे. ऊहापोह म्हटला की, जुन्या घटनाही विचारात घ्याव्या लागतात. महाराष्ट्र काँग्रेसची सर्वसाधारण बैठक पाच एप्रिल ७८ रोजी भरत असल्याने ही चर्चा उपयुक्त झाली तर लेखामागचा हेतू बऱ्याच प्रमाणात साध्य झाला असे मानता येईल.

महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यानंतर काँग्रेस बरखास्त करून लोकसेवा संघात तिचे रूपांतर करावे असे विचार मांडण्यास सुरुवात केली होती. या त्यांच्या विचाराचा ते विस्तार करण्यापूर्वीच हिंदू जातीवादाने महात्मा गांधींचा खून केला. त्यामुळे गेली तीस वर्षे काँग्रेस सत्तेत राहिली, इतकेच नव्हे तर सत्ता ही काँग्रेसची मक्तेदारी झाली. या मक्तेदारीमुळे मतदारांचा आपल्या मताच्या सामर्थ्यावरील विश्वास उडाला होता. कारण मताच्या द्वारे केंद्रातील सत्ता आपण बदलू शकतो किंवा बदलली जाईल असे मतदार मानीत नव्हता. केंद्रातील सत्ता बदलणार नाही ही खूणगाठ मनाशी बांधूनच तो मतदानकेंद्रावर जात होता. राज्यांमध्ये मतपेटीद्वारा काही ठिकाणी सरकारे बदलली गेली; पण केंद्रात काँग्रेसची सत्ता असल्याने राज्यातील काँग्रेसेतर सरकारे पद्धतशीर पाडली गेली होती. केंद्राचे सामर्थ्य लोकांना दिसून आले तरी केंद्रातील सत्ता-बदल घडवून आणण्यासाठी आपण समर्थ आहोत हा विश्वास मतदारांमध्ये राहिला नव्हता.

काँग्रेसची सत्तेतील मक्तेदारी अधिकाधिक बळकट होऊ लागली त्याबरोबर काही निराश होऊन, तर काही जण सत्ताधारी पक्षात जाऊन सत्तास्थाने मिळवावीत व या सत्तास्थानांच्या जोरावर आपल्याला जे योग्य वाटते ते करण्याचा प्रयत्न करावा असा विचार करून काँग्रेसमध्ये जाऊ लागले. सत्तेत काँग्रेसची मिरासदारी प्रस्थापित झाल्यानंतर काँग्रेस पक्ष आपली मिरासदारी करावी म्हणजे आपल्या सत्तेला धोका निर्माण होणार नाही अशी अभिलाषा श्रीमती इंदिरा गांधी यांनी बाळगली. इंदिरा गांधी यांचीही काही वैशिष्ट्ये आहेत त्यांपैकी निर्णय घेण्याची त्यांची शक्ती– मग परिणाम काही होवोत हा त्यांचा स्वभाव– हे प्रमुख वैशिष्ट्य मानावे लागेल. त्याशिवाय त्यांची वैशिष्ट्ये माझ्या दृष्टीने अशी आहेत–' समाजाचे मानसशास्त्र त्यांनी चांगले ओळखले आहे. प्रचाराची उत्तम हातोटी, विधिनिषेधाची पर्वा न करण्याची प्रवृत्ती! या बऱ्यावाईट वैशिष्ट्यांची फार उत्तमपणे सांगड घालून श्रीमती गांधी यांनी पक्षावर आपली मिरास निर्माण केली. आपल्या सत्तास्थानाला धोका निर्माण होताच त्यांनी आणीबाणी पुकारून देशाला तुरुंग बनविले.

आणीबाणीत सबंध देश एक तुरुंग बनला असताना श्रीमती गांधींनी निवडणुका जाहीर केल्या. विरोधी पक्ष खिळखिळे झाले आहेत अशा काळात निवडणुका घेतल्या की, आपणच विजयी होऊ आणि त्या विजयाचा अर्थ जनतेने आणीबाणीच्या बाजूने कौल दिला आहे असा लावावयाचा आणि त्या जोरावर निवडणुका पुढेमागे कायमच्या निकालात काढावयाच्या किंवा लोकसभा-विधानसभा ही लोकशाहीची बाह्य रूपे कायम ठेवून पक्षाची व पक्षाच्या माध्यमातून आपली हुकुमशाही कायम करावयाची हा डाव गांधींचा होता; परंतु नसबंदी व तत्सम अतिरेकामुळे उत्तर भारतात काँग्रेसचे जवळजवळ समूळ उच्चाटन झाले. इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीमुळे काँग्रेसचा पराभव झाला व आपल्या हातून सत्ता गेली हे दिसताच फार मोठ्या प्रमाणावर काँग्रेसजन इंदिरा गांधी यांच्यापासून फारकत घेऊ लागले, त्यांच्यावर टीका करू लागले आणि त्यांनी ब्रह्मानंद रेड्डी आदींचे नेतृत्व स्वीकारले.

लोकसभा निवडणुकीनंतर उत्तर भारतात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा लोकसभा निवडणुकीसारखा नसला तरी चांगलाच पराभव झाला. रेड्डी-चव्हाण यांच्याकडे नेतृत्व दिले व इंदिरा गांधी या निवडणुकीत प्रचारासाठी गेल्या नव्हत्या. तरीही जनतेने काँग्रेसला जवळ केले नाही, त्या अर्थी नेतृत्व बदलूनही काँग्रेसला बरे दिवस येण्याची शक्यता नाही, हा विचार काँग्रेसजनात सुरू झाला. मवाळ सामुदायिक नेतृत्वापेक्षा इंदिरा गांधी यांचे नेतृत्व जनता पक्षाशी दोन हात करील व काँग्रेसकडे सत्ता येण्याजोगी स्थिती येईल ही भावना काँग्रेस जनात हळू हळू निर्माण झाली.

## महाराष्ट्रातले इंदिरा पाठिराखे

मधल्या काळात इंदिरा गांधी घराबाहेर पडल्या तेव्हा त्यांचे जनतेकडून अपेक्षेपेक्षा स्वागत झाले. पराभवानंतर श्रीमती गांधींची अवस्था कशी झाली आहे या औत्सुक्यापोटीही त्यांच्या सभांना व दौऱ्यात गर्दी होत गेली. या गर्दीचेही श्रीमती गांधींनी भांडवल केले आणि कर्नाटकच्या भूमीवर नेतृत्वाची लढाई त्यांनी सुरू केली. कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांच्या बाजूने श्रीमती गांधी उभ्या ठाकल्या. कर्नाटक प्रकरणी समझौता होतो आहे असे वातावरण निर्माण होत होते त्याच सुमारास श्रीमती गांधी यांच्या पाठीराख्यांनी काँग्रेस महासमितीच्या खास बैठकीची मागणी केली. खास बैठकीच्या मागणी-पत्रावर महाराष्ट्रातील त्या वेळच्या मंत्र्यांपैकी दहा मंत्री व राज्यमंत्री आणि महासमितीच्या इतर २०–२५ सदस्यांनी सह्या केल्या होत्या. मागणीपत्रावर सही करणारामध्ये एखाददुसरा अपवाद करता बहुसंख्य लोक मराठेतर होते. देशमुख-पाटलांचे वर्चस्व काँग्रेसवर आहे. आम्हाला तीमध्ये स्थान नाही अशी भावना असलेल्यांच्या जशा सह्या होत्या, त्याचप्रमाणे प्रामुख्याने विदर्भातील नेत्यांनी व मंत्र्यांनी मागणीपत्रावर सह्या केल्या होत्या. नावेच घ्यायची झाली तर रा. ज. देवतळे, शंकरराव गेडाम, मडावी, पारवेकर, भाऊसाहेब वर्तक, प्रतिभा पाटील, मधुकरराव चौधरी, रमेश वळवी आदींनी गांधींच्या बाजूने सही केली होती. ' वसंतराव नाईक यांनी आम्हाला इंदिरा गांधींच्या ओटीत टाकले आहे ', असे त्या वेळच्या एका मंत्र्याने म्हटले होते. वसंतराव नाईक दुसऱ्या फळीत राहिले तरी मनाने ते गांधींकडे गेले होते. काँग्रेसकडे त्यांचे राहणे हे डावपेचात्मक होते याची जाणीव फारच थोड्या लोकांना झाली होती. अधिकृत पक्षात राहून निवडणुकीपर्यंत पक्ष आतून पोखरावयाचा आणि शेवटी सर्व नसली तरी बहुसंख्य मंडळी गांधींच्या दावणीला बांधावयाची हा पवित्रा नाइकांनी घेतला असल्याची चर्चा काही थोड्या लोकांनी त्या वेळी केली होती. या काळापूर्वी मुख्यमंत्री वसंतराव पाटील यांची भूमिका यशवंतराव चव्हाण यांच्यापासून सर्वांनाच गोंधळात टाकणारी होती. ऑक्टोबर १९७७ मध्ये नागपुरात पत्रकारांशी बोलताना वसंतदादा म्हणाले होते की, यशवंतराव चव्हाण व ब्रह्मानंद रेड्डी यांच्यापेक्षा इंदिरा गांधी अधिक लोकप्रिय आहेत. माणसे गोळा करण्याची किमया त्यांच्याजवळ आहे. म्हणून पक्षबांधणीकरिता त्यांच्या लोकप्रियतेचा उपयोग करून घेतला पाहिजे ! डिसेंबरपर्यंत दादांची भूमिका इंदिरा गांधींना अनुकूल अशीच होती. यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात उघडपणे दादांनी पवित्रा घ्यावा अशी गांधींची अपेक्षा होती. त्याला दादांची तयारी नव्हती. हळूहळू आपण ती भूमिका घेऊ; पण यशवंतरावांविरुद्ध आज जाहीर भूमिका घेणे शक्य होणार नाही असे दादा म्हणाले तेव्हा गांधींचे दादांशी बिनसले व दोघांत दुरावा होऊन दादांनी गांधींना अनुकूल ठरणार नाही असा पवित्रा घेतला. यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील नेतृत्व उखडावयाचे हे गांधींनी ठरविले असल्यामुळे त्यांना त्यासाठी साथ देणारी मंडळी हवी आहेत. जुन्या राजकारणाचा राग धरून पुढचे राजकारण करण्याची श्रीमती गांधींची प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती आपलीच एकाधिकारशाही प्रस्थापित करणारी आहे. आपल्या हातून सत्ता गेली तरी एकाधिकार गाजविण्याची त्यांची प्रवृत्ती मुळीसुद्धा कमी झालेली नाही. हा धोका काँग्रेसजनांनी ओळखला पाहिजे. जे काँग्रेसजन गांधीविरोधी राहतील त्यांच्याकडून एकाधिकारशाहीला प्रतिकार करण्याचे काम होणार आहे हे विसरून चालणार नाही. राजकारणातील व्यक्ती खुनशीपणाने वागू लागतात आणि अशा व्यक्तीकडे सत्ता येते तेव्हा त्या व्यक्तीकडून हुकुमशाही किंवा आपले संपूर्ण वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

श्रीमती गांधी दलित-गरीब यांच्या कार्यक्रमाविषयी बोलतात; परंतु त्यांच्याच कारकीर्दीमध्ये गरिबीच्या रेषेखाली चाळीस टक्के लोक होते ते साठ टक्के झाले आहेत. समाजवादाचा घोशा श्रीमती गांधी लावीत आहेत. वास्तविक पाहता श्रीमती गांधी यांच्या दहा वर्षांच्या राजवटीमध्येच खाजगी क्षेत्राची वाढ झाली आहे. उद्योगपतींचे नफे वाढले असून मक्तेदारांची घराणीही वाढली आहेत. खाजगी क्षेत्राला श्रीमती गांधींच्या राजवटीत वाव मिळाला म्हणूनच मक्तेदारांची घराणी वाढली आहेत. त्यांच्याच दहा वर्षांच्या काळात जागतिक बँकेची या देशात अधिक गुंतवणूक झाली आहे. १९७६ च्या जागतिक बँकेच्या अहवालात भारताला जागतिक बँकेने दिलेल्या कर्जाचे आकडे दिले आहेत. विकसनशील देशांपैकी भारतालाच सर्वांत जास्त पैसा जागतिक बँकेने दिला आहे. जागतिक बँकेवर पश्चिमी देशांचा प्रभाव आहे. या देशांची नीती धोरणे काय आहेत हे वेगळे सांगायला नको. जागतिक बँकेने जी गुंतवणूक भारतात केली आहे ती फार मोठ्या प्रमाणावर खाजगी क्षेत्रामार्फत केली आहे. खाजगी क्षेत्र असेल तर जागतिक बँक मदत देते. टाटांना वीज-केंद्रासाठी जागतिक बँकेने शंभर कोटी रुपयांचे मदत-कर्ज देण्याचे ठरविले आहे; परंतु याच केंद्रासाठी जागतिक बँक महाराष्ट्र किंवा केंद्र सरकारला कर्ज देत नाही. हे एक उदाहरण म्हणून सांगत आहे. थोडक्यात गांधींच्याच राजवटीमध्ये खाजगी गुंतवणूक वाढली आहे. गरिबांचा कळवळा, समाजवादाचा ध्यास याबाबत श्रीमती गांधी यांचा आकांडतांडवच अधिक आहे. त्याला सामान्य जनता भुलत आहे. इतकेच नव्हे तर काही नेतेसुद्धा भुलले आहेत !

## विजयामागची गणिते

इंदिरा गांधींची प्रवृत्ती, त्यांची धोरणे याचा आढावा घेतल्यानंतर महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीमध्ये इंदिरा काँग्रेसला इतका विजय कसा मिळाला याची चर्चा करणे आवश्यक आहे. निवडणुकीत विजय मिळाला की त्या पक्षाचे सामर्थ्य वाढले असे आपण मानतो;

परंतु निवडणुकीत अनेक घटक आपला प्रभाव टाकून जातात. त्यामुळे आश्चर्य वाटावे असे निकाल लागतात. अशा विजयात त्या पक्षाचे सामर्थ्य वाढलेले असतेच असे नव्हे! म्हणून आमदारांची संख्या हे पक्षसामर्थ्य अजमावण्यासाठी योग्य साधन नव्हे. विदर्भात इंदिरा कॉंग्रेसला मोठा विजय मिळाला म्हणून प्रथम त्या भागातील परिस्थिती विचारात घेतली पाहिजे. १९७२ साली विधानसभा निवडणुकीच्या वेळी विदर्भात कॉंग्रेसला संघटित असा कोणताच प्रबळ विरोधी पक्ष नव्हता. विदर्भ विभाग म्हणून सोडाच, पण विदर्भाच्या कोणत्याच जिल्ह्यात कॉंग्रेसशी तुल्यबळ सामना करू शकेल असा विरोधी पक्षच नव्हता. शिवाय १९७१ च्या बांगला–युद्धाने इंदिरा गांधी लाट निर्माण झाली होती. ही लाट व प्रबळ विरोधी पक्ष नाही ही उणीव असताना विदर्भात कॉंग्रेसने १९७२ मध्ये ५० जागा हजार ते सात–आठ हजार मतांच्या फरकाने जिंकल्या होत्या. साठपैकी ५० जागा एवढ्या कमी मतांच्या फरकाने कॉंग्रेसने जिंकल्या होत्या हे पाहिले की १९७८ च्या निकालाचे गणित सोपे होत जाते. १९७८ च्या निवडणुकीत कॉंग्रेसमध्ये दुफळी झाली. इंदिरा कॉंग्रेसच्या बाजूने (मागणी–पत्रावर सह्या करणारे लोक विदर्भात प्रामुख्याने होते.) विदर्भातील कॉंग्रेसजन अधिक होते. दोन कॉंग्रेसचे उमेदवार उभे राहिल्यामुळे हजार ते सात–आठ हजार मते अधिकृत कॉंग्रेसची किमान कमी होणार हे स्पष्ट झाले होते. याचाच अर्थ असा की, आठ हजार जास्त मते पडून १९७२ मध्ये जे कॉंग्रेस उमेदवार विजयी झाले तेवढ्या उमेदवारांचा १९७८ मधील दुफळीमुळे पराभव होणार होता हे नक्कीच होते. या आकडेशास्त्रातच कॉंग्रेसच्या ५० जागा गेल्या. विरोधी पक्ष विदर्भात मुळातच खिळखिळा असल्याने त्याला कॉंग्रेसच्या दुफळीचा फायदा झाला नाही. कॉंग्रेसवर पश्चिम महाराष्ट्राचे वर्चस्व आहे. इंदिरा कॉंग्रेसच्या बाजूने स्थानिक म्हणजे विदर्भातील नेते आहेत या दृश्याचा परिणाम वैदर्भीय मतदारावर फार मोठ्या प्रमाणावर झाला. प्रादेशिक भावना विदर्भात पुनश्च निर्माण झाली आहे. त्यामुळेही विदर्भातील नेत्यांचे ज्या संघटनेवर वर्चस्व आहे त्या संघटनेच्या बाजूने वैदर्भीय जनता गेली म्हणून विदर्भात इंदिरा कॉंग्रेसला मोठा विजय मिळाला आहे. पश्चिम महाराष्ट्राचे वर्चस्व असलेल्या कॉंग्रेस संघटनेच्या बाजूला विदर्भातील जे लोक गेले त्यांना १९७२ मधील निवडणुकीमध्ये ७–८ हजार मते अधिक मिळून विजय मिळाला तेवढीच मते सर्वसाधारणपणे १९७८ मधे पडली व २० ते २५ हजार मते इंदिरा कॉंग्रेसला पडून इंदिरा कॉंग्रेस १५ ते २० हजार मतांच्या फरकाने विजयी झाली. या आकड्यांवरून विदर्भातील विजयाचा अर्थ स्पष्ट होतो. त्यात इंदिरा गांधी यांच्या राजकारणाचा संबंध कोठे येतो? थोडक्यात विदर्भामध्ये प्रादेशिक भावनाच प्रबळ झाल्या आहेत असे म्हणावे लागते.

पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसचा पराभव झाला त्याला जनता–हवा हे प्रमुख कारण आहे. त्याचप्रमाणे सत्तेमधील कॉंग्रेसच्या मक्तेदारीमुळे निर्माण झालेले स्थानिक पातळीवरील मतभेद, कुरबुरी, गटबाजी वाढत गेली. तिला पक्षाच्या फुटीमुळे मोकळीक मिळाली. आतमध्ये दबलेला असंतोष मतदारसंघांतून बाहेर पडू लागला. जनता–हवा आणि ही भांडणे यामुळे पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसचा पराभव झाला. पश्चिम महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेसचा प्रभाव पडला नाही; पण त्यांचे काही उमेदवार विजयी झाले, याचे कारण मात्र वेगळे आहे. कॉंग्रेसची मते मोठ्या प्रमाणावर कॉंग्रेसजवळ राहिली. अंतर्गत असंतोषामुळे जी काही कॉंग्रेसची मते कॉंग्रेसच्या पेटीत पडली नाहीत ती अल्प प्रमाणावरील मते स्थानिक सूडाच्या भावनेने इंदिरा कॉंग्रेसच्या पेटीत पडली. जनता, शे. का. पक्ष व कॉंग्रेस या तीन पक्षांत बहुसंख्य मते विभागली आणि अल्प मते पडलेल्या उमेदवाराची मते इतर उमेदवारापेक्षा अधिक झाल्याने हा उमेदवार विजयी झाला. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातही गांधी–कॉंग्रेसचा प्रभाव नसताना त्या पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत. राज्यातील हे चित्र डोळ्यांसमोर ठेवले की इंदिरा कॉंग्रेसच्या लोकप्रियतेचा, प्रभावाचा आभासच कसा आहे याची कल्पना येऊ शकते!

जनता, शे. का. पक्ष व इंदिरा कॉंग्रेस, फॉरवर्ड ब्लॉक यांना पडलेली मते प्रामुख्याने सत्ताधारी पक्षाविरुद्धची मते आहेत. जनता पक्षाला सर्वांत अधिक जागा मिळाल्या असल्यामुळे जनतेचा कौल जनता पक्षाच्या बाजूनेच आहे हे दिसून येते. इंदिरा कॉंग्रेसची मते, सत्ताधारी पक्षाविरुद्धची प्रादेशिकता उराशी बाळगून पडलेली मते आहेत. फॉरवर्ड ब्लॉक स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार करू लागला असल्याने त्याच भावनेतून त्या पक्षाला मते मिळाली आहेत. जनता व शे. का. पक्ष यांची युती झाली असती तर मित्रपक्षांना बहुमत मिळाले असते असे निश्चितपणाने म्हणता येईल. जनता व शे. का. यांच्या आपापसांतील लढतीमुळे दोघांच्या मिळून ४०–५० जागा गेल्या आहेत. शिवाय युतीच्या वातावरणाचा परिणाम मतदारांवर होऊन मित्रपक्षांची संख्या आणखी वाढली असती. जनता पक्षाचे अध्यक्ष एस्. एम्. जोशी यांनी शेकापला थोडे झुकते माप देऊनही त्या पक्षाशी मैत्री करण्याचे धोरण ठेवले होते ते कसे बरोबर होते हेही या निमित्ताने स्पष्ट झाले. त्याचप्रमाणे ५–१० जादा जागांसाठी आग्रह धरून शे. का. पक्षानेही आपली संख्या २०–२५ ने कमी करून घेतली याचा पश्चात्ताप त्या पक्षाला झाला आहे.

इंदिरा कॉंग्रेसबरोबर कॉंग्रेसने आघाडी केली आणि महाराष्ट्रात संमिश्र सरकार आले ही घटनाही इंदिरा कॉंग्रेसचा प्रभाव आहे असे वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत ठरली आहे. कर्नाटक–आंध्रमध्ये इंदिरा कॉंग्रेसला बहुमत मिळाले व त्या पक्षाने तेथे सरकार बनविले, यामध्ये विशेष काही घडले असे नव्हते. प. बंगालमध्ये मार्क्स. कम्युनिस्टांचे किंवा तामीळनाडूत अण्णा द्रमुकचे सरकार बनले. तसेच कर्नाटक–आंध्रमध्ये इंदिरा कॉंग्रेसचे सरकार आले होते. या दोन्ही राज्यांत जनता पक्षाचा सत्ता घेण्याएवढा जोर नव्हताच. त्यामुळे त्या दोन राज्यांत कॉंग्रेसचा पराभव झाला एवढाच अर्थ होता.

¤

महाराष्ट्रात जनता पक्ष सरकार का बनवू शकला नाही याचा एक स्वतंत्र इतिहास आहे. आज मंत्री बनलेल्या काहींनी प्रस्तुत लेखकामार्फत जनता पक्षाच्या आजच्या विधानसभानेत्यांना काही निरोप दिले होते. त्यामुळे या इतिहासाचे बारकावेही लेखकाला माहिती आहेत. जनता पक्षाच्या नाकर्तेपणाचा स्वतंत्र 'इतिहास' लिहीन तेव्हा या सर्व गोष्टी सविस्तर लिहिता येतील!

¤

## जनता पक्षाचा हातभार

जनता पक्षाने–विशेषतः त्या पक्षातील 'राजहट्ट' धरणाऱ्यांनी चूक केली नसती तर त्या पक्षाचे सरकार आले असते आणि जनता पक्ष सत्तारूढ होताच अपक्ष, कांग्रेसमधील काही, इतकेच नव्हे तर इंदिरा कांग्रेसमधील सहा आमदारही जनता पक्षात त्वरित आले असते. या आमदारांच्या आगमनाने जनता व मित्र पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले असते आणि वर्षभरात सत्तारूढ पक्षात येणारांची संख्या आणखी बरीच वाढली असती ! सत्ताधारी पक्षात तीस वर्षे काढलेल्या आमदार व कार्यकर्त्यांची प्रवृत्ती सत्तेच्या प्रवाहात राहण्याची असते. या प्रवृत्तीमुळेच सत्तेचा गुणधर्म (सत्ता) स्थिर होण्याचा बनतो ! सत्तेच्या राजकारणाचे हे प्राथमिक सूत्र आहे. ते न समजण्याइतक्या सुमारांच्या हातात राजकारण जाते तेव्हा त्यांच्या हाती धुपाटणेच येते ! जनता सरकार आले असते तर आज कांग्रेस-मधून इंदिरा कांग्रेसमध्ये काही जण जात आहेत ते सर्व जनता पक्षात आले असते. इंदिरा कांग्रेसला शेजारच्या राज्यात बहुमत मिळाले आहे व महाराष्ट्रात सत्तेतील मोठा भागीदार पक्ष म्हणून इंदिरा कांग्रेस उभी आहे हे दिसून येताच कांग्रेसजन विलिनीकरणाची भूमिका घेऊ लागले आहेत. कांग्रेस संघटनेचा बचाव करावा ही भूमिका या विचारामागे असण्यापेक्षाही सत्ता काबीज करण्याची क्षमता इंदिरा कांग्रेसमध्ये आहे या मृगजळामागे धावणारेच अधिक आहेत. दोन्ही कांग्रेसच्या विलिनीकरणाची प्रक्रिया किंवा भाषा महाराष्ट्रातून चालली आहे आणि ती इंदिरा कांग्रेस महाराष्ट्रात सत्तेमधील मोठा भागीदार आहे म्हणून चालली आहे. हे लक्षात घेता एकाधिकारशाहीचा धोका असलेल्या इंदिरा कांग्रेसला महाराष्ट्रात भुसभुशीत जमीन तयार करून देण्याची अप्रत्यक्ष कामगिरी जनता पक्षातील काहींनी केली आहे.

इंदिरा गांधी यांच्या एकाधिकारशाहीच्या प्रवृत्तीत फरक पडलेला नाही हे दिसत असूनही त्यांच्या पक्षाकडे जाणाऱ्या कांग्रेस-जनांचा सत्ता हाच ओढा आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. ही सत्ताच कोसळली तर बाईंच्या कांग्रेसशी विलिनीकरण झाले पाहिजे असे म्हणणारे किती कार्यकर्ते निघतील ?

गांधींच्या प्रवृत्तीचा धोका कायम आहे, गांधींचे नेतृत्व मानणारे महाराष्ट्रातील नेते जे वर्तन करीत आहेत त्यावरूनही हमकरेसो प्रवृत्ती कशी फोफावणार आहे याची कल्पना येण्यास हरकत नाही ! संयुक्त मंत्रिमंडळातील भागीदार असलेल्या पक्षाविरुद्ध उपमुख्यमंत्री श्री. नाशिकराव तिरपुडे यांनी वेळोवेळी चढविलेले हल्ले काय सांगतात ?

विरोधी पक्षांनी यापूर्वी संयुक्त सरकारे चालविली त्या वेळीसुद्धा त्यांनी घटक पक्षाच्या नेत्याविरुद्ध अशा प्रकारे त्यांचा किंवा त्यांच्या पक्षाचा उपमर्द करणारी भाषा केलेली नव्हती. येथे तर एके काळी एका संघटनेत वाढलेले गट आहेत. आता दोन्ही पक्षांच्या विलिनीकरणाची भाषाही सुरू आहे, तरी हल्ले होत आहेत. ह्या कांग्रेसने इंदिरा कांग्रेसशी विलीन व्हावयाचे ठरविले व विलिनीकरण झाले तर इंदिरा कांग्रेसचे नेते कांग्रेस कार्यकर्त्यांशी कोणत्या प्रकारे वर्तन करतील हे कार्यकर्त्यांनी ओळखले पाहिजे.

विलिनीकरण झाले तर कांग्रेसकार्यकर्त्यांना सापत्न भावानेच वागविले जाईल. तो पक्ष केडरपार्टी नसतो. त्या पक्षात येण्यासाठी प्रवेश मुक्त असतो. इंदिरा कांग्रेस ही काही केडरपार्टी नाही ती मास-पार्टी आहे. तरीही त्या पक्षाचे अध्यक्ष श्री. नाशिकराव तिरपुडे हे पक्षात कोणाला घ्यावयाचे ते आम्ही ठरवू असे सांगतात. इतकेच नव्हे तर कोणाला प्रवेश द्यावयाचा हे ठरवण्याचे सर्वाधिकार स्वतःकडे घेतात. यावरूनही त्या पक्षाची प्रवृत्ती कशी राहणार आहे ते स्पष्ट होते. इंदिरा गांधी यांनीसुद्धा सर्वांसाठी पक्षाची दारे उघडी आहेत असे म्हटलेले नाही. उलट, पक्षात कोणाला घ्यावयाचे हे पक्ष ठरवील असे सांगून पक्ष सर्वांना खुला राहणार नाही हेच दाखवून दिले आहे. प्रवेश कोणाला द्यावा हे पक्ष ठरविणार आणि पक्षावर अधिकार इंदिरा गांधींचा ! म्हणजे गांधी ठरविणार त्यालाच पक्षात प्रवेश राहणार हे उघड आहे. एकाधिकारशाहीची प्रवृत्ती श्रीमती गांधींच्या ठायी कायम आहे. त्यामुळेच त्या अशी भूमिका घेऊ शकतात.

## यशवंतरावांची भूमिका

कांग्रेसने पक्षांतर्गत लोकशाही व सामुदायिक नेतृत्व स्वीकारले; पण गांधींना नेमके हेच नको होते. पक्ष आपला बटीक असावा असे त्यांना वाटत होते, म्हणूनच त्यांनी सामुदायिक नेतृत्वाचा स्वीकार केलेल्या पक्षापासून फारकत घेतली. ज्या व्यक्तींना आणि ज्या व्यक्तींच्या प्रभावाखाली असलेल्या पक्षाला सामुदायिक नेतृत्व, पक्षांतर्गत लोकशाही मान्य नाही त्या पक्षाशी विलिनीकरण करण्याची भूमिका आत्मघातकीपणाची ठरणार आहे. एकाधिकारशाहीचा धोका कायम असताना त्यांच्याशी हातमिळवणी करण्याऐवजी दोन हात करून धोका परतवण्याचा प्रयत्न कांग्रेसजनांनी केला पाहिजे, तरच त्यांना महात्मा गांधी–नेहरू यांच्या कांग्रेसचे नाव घेण्याचा अधिकार पोचेल. हा विचार मान्य केला की, मग ज्या व्यक्ती गांधींची एकाधिकारशाही थोपविण्याचा प्रयत्न करतात त्यांना पाठिंबा देण्याशिवाय दुसरा मार्गच राहात नाही. आज यशवंतराव चव्हाण इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीचा उधळणारा घोडा अडवू पाहात आहेत. अशा वेळी कांग्रेसजन त्यांच्या पाठीशी उभे राहणार की त्यांच्याकडे पाठ फिरविणार ? यशवंतराव चव्हाण तात्त्विक भूमिका घेऊन ठामपणे उभे राहिले नाहीत अशी टीका त्यांच्यावर केली जात होती. अशा टीकाकारांपैकीच प्रस्तुत लेखक आहे. यशवंतराव चव्हाण आता निश्चित स्वरूपाची ठाम भूमिका घेऊन उभे राहिले आहेत आणि त्यांची ही भूमिका पक्षांतर्गत लोकशाही टिकविण्याच्या दृष्टीने ऐतिहासिक अशी आहे. पुन्हा नव्याने येऊ पाहात असलेल्या जुन्या धोक्याविरुद्ध यशवंतराव चव्हाण उभे ठाकले आहेत. समजा, उद्या विलिनीकरण झाले तर यशवंतराव चव्हाण राजकारणातून बाजूला होतील. त्यांचे आता नुकसान होणार नाही. केंद्रात कांग्रेस सत्तारूढ नसल्याने त्यांच्या वैयक्तिक अभिलाषेचा, महत्त्वाकांक्षेचाही प्रश्न राहिलेला नाही. त्यामुळे त्यांचे आणखी काही नुकसान नाही; पण एकाधिकारशाही पुन्हा जन्मली तर जे तरुण कांग्रेस कार्यकर्ते काही तरी करू पाहात आहेत त्यांचेच खच्चीकरण होणार आहे. खच्चीकरण टाळण्यासाठी तरुण कांग्रेसजनांनी विलिनीकरणविरोधी उभे राहिले पाहिजे. महाराष्ट्र कांग्रेसच्या ५ एप्रिल ७८ च्या बैठकीत

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक विलिनीकरणाचा ठराव मांडण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या बाजूला यशवंतराव मोहिते, मधुकरराव चौधरी ही प्रमुख मंडळी जातील. मुख्यमंत्री श्री. वसंतराव पाटील यांना मुख्यमंत्रिपद मिळण्याची शाश्वती मिळाली तर तेही विलिनीकरणाची भूमिका घेतील; परंतु विलिनीकरणाचा ठराव झाला तर संमिश्र सरकार टिकेल का, हे पाहावे लागेल. काय वाटेल ते झाले तरी आता इंदिरा गांधी यांचे नेतृत्व स्वीकारायचे नाही हा खंबीर निर्णय यशवंतराव चव्हाण यांनी घेतला आहे. त्यांची भूमिका मान्य असलेले २५–३० आमदार आहेत. विलिनीकरणाच्या ठरावानंतर हे आमदार संमिश्र सरकारला पाठिंबा देतील असे मानावयाचे कारण नाही. २५–३० आमदार वजा झाले की, संयुक्त आघाडीला बहुमत राहात नाही. सरकार टिकविले तर आमदार बऱ्याच संख्येने इंदिरा काँग्रेसकडे जातील. सरकार टिकण्याची खात्री नसेल तर मात्र इंदिरा काँग्रेसमध्ये जाणारे अथवा जाऊ पाहणारे आपल्या निर्णयाचा फेरविचार करतील. आज जे काँग्रेसजन इंदिरा काँग्रेसमध्ये गेले आहेत त्यांची नावे पाहिली तर ऑक्टोबर-नोव्हेंबर १९७७ मध्ये खास बैठकीची मागणी करणाऱ्या पत्रावर सही करणारेच प्रामुख्याने हे लोक दिसतात. रमेश वळवी, प्रतिभा पाटील, ह. गो. वर्तक, बाबुराव मडावी वगैरे सह्या करणारेच गांधी-काँग्रेसमध्ये गेले आहेत किंवा जाण्याच्या मार्गावर आहेत. या लोकांशिवाय जे (इं) काँग्रेसमध्ये गेले आहेत ते जनता पक्षाचे सरकार आले असते तर जनता पक्षात गेलेले दिसून आले असते.

एकाधिकारशाहीच्या धोक्याची जाणीव नसलेले काँग्रेसजन इंदिरा काँग्रेसमध्ये येत आहेत अशाच काळात महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट येईल अशी परिस्थिती निर्माण करावयाची आणि मग होणाऱ्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराचा आपल्याकडून व जनता पक्षाकडून पराभव करावयाचा आणि सत्ताधारी अथवा प्रमुख विरोधी पक्ष म्हणून पुढे यावयाचे हा डावही इंदिरा काँग्रेसचा चालू आहे.

इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीचा धोका जनता पक्षाला टाळावयाचा असेल तर इंदिरा काँग्रेस सत्तेवर येणार नाही असे राजकारण करण्याची जबाबदारी जनता पक्षावर येते. जनता पक्षाला एकटयाला बहुमत मिळालेले नाही. अशा परिस्थितीत इंदिरा काँग्रेसकडे सत्ता जाऊ द्यावयाची नसेल तर अमुक एक गटाचाच मुख्यमंत्री झाला पाहिजे ही आग्रही भूमिका सर्वांनीच सोडली पाहिजे. इंदिरा काँग्रेसकडे सत्ता जाणार नाही याकरता जे काही करता येणे शक्य आहे ते केलें पाहिजे. गांधींची एकाधिकारशाही थोपवण्याची जबाबदारी काँग्रेसवर जशी आहे तशीच जनता पक्षावरही आहे हे ओळखून जनता पक्षाने राजकारण केले पाहिजे. □

---

# संपूर्ण परिवर्तन

## माणूस बदलल्यानेच यशस्वी

वा. दा. रानडे

स्टालिननंतरच्या पाव शतकात रशिया आणि इतर कम्युनिस्ट राष्ट्रात कम्युनिस्ट चळवळीला जे वळण मिळाले त्यासंबंधी गेल्या आठवडयात मी लिहिले. त्यात एका मुद्द्याचे विवेचन जागेअभावी मी केले नाही; पण तो मुद्दा केवळ कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीनेच नव्हे तर मानवसमाजाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. भांडवलदारी पद्धतीवर कम्युनिस्टांची टीका अशी की, केवळ सरकार बदलल्याने समाजवादी क्रांती होत नाही. भांडवलदारी अर्थव्यवस्थेची चौकट कायम आहे तोपर्यंत डावे पक्ष निवडणुका जिंकून अधिकारावर आले तरी ते समाजवादी क्रांती करू शकणार नाहीत; पण पश्चिम युरोपातील कम्युनिस्ट आज हा सिद्धांत मानीत नाहीत. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद आणता येईल असे ते म्हणत आहेत. कम्युनिस्ट खरोखर बदलले नसून निवडणुका जिंकून सत्ता हाती घेण्यासाठी त्यांनी हा पवित्रा घेतला आहे अशी टीका पाश्चात्य वृत्तपत्रांनी केली. नुकत्याच झालेल्या फ्रेंच निवडणुकांत डाव्या पक्षांच्या आघाडीला निर्णायक बहुमत मिळाले नाही यावरून फ्रेंच जनतेलाही कम्युनिस्टांच्या भूमिकेबद्दल शंका वाटते असे दिसते. ते काहीही असो जेथे कम्युनिस्टांनी भांडवलदारी अर्थव्यवस्था नष्ट करून कम्युनिस्ट पद्धतीची आर्थिक व राजकीय घडी स्थापन केली तेथेही समाज आणि माणूस खरोखर कितपत बदलला याचा वस्तुनिष्ठ आढावा घेतला जाणे आवश्यक आहे.

भांडवलदारी अर्थव्यवस्था नष्ट केली की, भांडवलशाहीतील सारे दोष नष्ट होऊन नवा मानव आणि नवा मानवसमाज निर्माण होईल. त्यात वर्गसंघर्ष नसतील. प्रत्येकाला विकासाची समान संधी मिळाल्याने खेळीमेळीच्या स्पर्धेतून समाजाची प्रगती अधिक वेगाने होईल अशी स्वप्ने कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी उराशी बाळगली होती; पण रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांचा अनुभव काय सांगतो? केवळ आर्थिक चौकट बदलून समाजपरिवर्तन होत नाही. माणूस बदलत नाही. स्वतःच्या मालकीच्या खासगी प्लॉटमध्ये रशियन शेतकरी अधिक उत्पादन काढतो. सामुदायिक शेतात मात्र तो तेवढ्या आत्मीयतेने काम करीत नाही. रशियन क्रांतीला साठ वर्षे झाल्यानंतरही ही परिस्थिती आहे याचा अर्थ साम्यवादी मनोवृत्तीचा माणूस घडविण्यात रशियन सत्ताधाऱ्यांना यश आलेले नाही. भांडवलदारी राष्ट्रातल्या काही अपप्रवृत्ती रशियातही दिसू लागल्या आहेत. बालगुन्हेगारीचे प्रमाण रशियात वाढत असल्यासंबंधीचे एक बातमीपत्र नुकतेच वाचले. न्यूयॉर्क टाइम्स वृत्तसंस्थेने हे बातमीपत्र दिले असले तरी त्याला आधार रशियन वृत्तपत्रांचेच दिलेले आहेत. तेव्हा ते प्रचारकी स्वरूपाचे आहे असे म्हणता येणार नाही. जलद नागरीकरणामुळे बालगुन्हेगारी वाढल्याचा अनुभव भांडवलदारी राष्ट्रांप्रमाणे रशियातही येत आहे आणि त्यामागची कारणेही तीच आहेत. आई नोकरी करीत असल्याने मुलांकडे लक्ष द्यायला तिला वेळ नाही. शाळांमध्ये वर्ग एवढे मोठे असतात की, प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे

शिक्षकांना शक्य होत नाही. अभ्यासात प्रगती नसलेल्या मुलांना आठवीनंतर शाळा सोडण्यास उत्तेजन दिले जाते. शाळेत जाणाऱ्या मुलांपेक्षा शाळा सोडलेल्या मुलांमध्ये गुन्ह्यांचे प्रमाण चोवीस पट अधिक आहे असे डेप्युटी प्रॉसिक्युटर जनरल सर्जी गुसेव्ह यांनी एका लेखात म्हटले आहे. बालगुन्हेगारीच्या कारणांचा शोध घेण्याच्या उद्देशाने एस्तोनियातील तार्तू विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांची पाहणी करण्यात आली. त्यात असे दिसून आले की फक्त दहा टक्के विद्यार्थ्यांचे आपल्या आईबापांशी भावनात्मक संबंध असतात. ७५ टक्के मुलांचे वडिलांशी तर ६० टक्के मुलांचे आईशी प्रेमाचे बंध होते. कौटुंबिक प्रेम न मिळाल्याने एकाकीपणा येऊन ही मुले गुन्हेगारीकडे वळली होती. निझनेकामास्क येथे पंधरा व सोळा वर्षांच्या दोन मुलांनी आपल्या एका वर्गमित्राला मारहाण केल्याबद्दल पोलिसांनी त्यांना ताकीद दिली; पण त्याचा काही परिणाम न होता काही दिवसांनी त्याला ठार करण्यात आल्याचे आढळून आले. आठवीतील दोन मुलांनी नववीमधील एका मुलीस ठार करून तिचे प्रेत छिन्नविछिन्न स्थितीत टाकून दिले असल्याचे आढळले. अमेरिका व इतर पाश्चात्य देशांच्या तुलनेने रशियात बालगुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे; पण ते वाढू लागले आहे ही चिंतेची बाब आहे.

'तुरुंग म्हणजे सुधारणागृहे नसून गुन्हेगारीची विद्यापीठे आहेत' असे वर्णन रशियातील एका तज्ज्ञाने नुकतेच केले. तरुण गुन्हेगारांना तुरुंगात ठेवल्याने ते बिघडतात, वाईट गोष्टी तेवढ्या आत्मसात करतात असे न्यायखात्याच्या एका नियतकालिकात एका माजी कैद्याने लिहिले होते. विघटित कुटुंबे, मद्याचे अतिसेवन हीही बालगुन्हेगारी वाढण्याची कारणे असल्याचे तज्ज्ञांनी केलेल्या पाहणीत आढळून आले. गुन्हेगारी प्रवृत्तीची मुले आधीच हेरून त्यांना योग्य पद्धतीने शिक्षण दिले तर ती सुधारतील; पण त्यांच्यातील प्रवृत्ती लौकर लक्षात येत नाही याचे कारण मुलांकडे पालकांचे दुर्लक्ष होते. बालगुन्हेगारीसंबंधी एक नाटक मॉस्कोत नुकतेच दाखविण्यात आले. त्यानंतर झालेल्या चर्चेत शाळेच्या पालकसमितीच्या प्रमुखाने आपली खंत व्यक्त करताना सांगितले की, मुलांबाबत ज्यांना सल्ला देण्याची आवश्यकता आहे ते पालक सभांना कधी येतच नाहीत. या नाटकालासुद्धा ते कधी आलेले नाहीत; याकडे कोणी तरी लक्ष वेधले. याला जबाबदार कोण असा प्रश्न या नाटकात काम केलेल्या एका नटाने चर्चेत उपस्थित केला व स्वतःच त्याचे उत्तर दिले. 'तुम्ही–आम्ही सारेच!'

रशियात मुलांची फार काळजी घेतली जाते. कारखान्यांच्या पाळणागृहातून मुलांना अगदी घरच्यासारखे प्रेम मिळते असे चित्रण रशियन पत्रांतून काही वर्षांपूर्वी करण्यात आले होते. मग बालगुन्हेगारीची समस्या तेथे का निर्माण व्हावी? याचा अर्थ योजलेले उपाय परिणामकारक नाहीत. आधुनिक यंत्रयुगीन संस्कृतीचे परिणाम भांडवलशाहीला टाळता आले नाहीत, तसेच ते कम्युनिस्ट राष्ट्रांनाही टाळता आले नाहीत. अर्थव्यवस्था बदलल्याने माणसाच्या प्रवृत्ती बदलत नाहीत ही अर्थव्यवस्था बदलली की सारे प्रश्न सुटतील, ही समजूत चुकीची होती. केवळ राजकीय व आर्थिक क्रांतीचे प्रश्न सुटत नाहीत त्यासाठी जयप्रकाश नारायण यांना अभिप्रेत असलेली संपूर्ण क्रांती किंवा समग्र क्रांतीच हवी. महात्मा गांधींचा भर माणूस बदलण्यावर होता. मार्क्सवाद आणि कम्युनिस्ट विचारप्रणालीत या प्रश्नाकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही; पण आर्थिक विषमता निर्माण करणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट करून त्या जागी नवी अर्थव्यवस्था उभारली पाहिजे या प्रश्नाकडे गांधीवादानेही पुरेसे लक्ष दिले नाही. माणसाचे परिवर्तन आणि समाजाचे परिवर्तन यांचा अलग अलग विचार करून चालणार नाही. या दोन्ही परिवर्तनांचे कार्य एकाच वेळी आणि हातात हात घालून चालले पाहिजे. आर्थिक सामाजिक परिस्थिती बदलायला हवी, त्याचबरोबर माणसाचा आंतरिक विचारही व्हावयास हवा. नव्या जगापुढील प्रश्न त्याशिवाय सुटणार नाहीत. जयप्रकाशजींच्या संपूर्ण क्रांतीत सर्वांगीण परिवर्तनाचा एकाच वेळी आणि एकत्रित विचार आहे. या विचाराचे आचरण आपण प्रत्यक्षात किती यशस्वीपणे करतो यावर आजच्या जगापुढील प्रश्नांची सोडवणूक अवलंबून आहे.

□




**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

## चक्रम्‌चक्री ( ३२ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# मोरारजीभाई देसाई

गेल्या आठवड्यात मोरारजीभाईंचा ८२ वा वाढदिवस झाला. त्याच वेळी त्यांच्या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादाचे प्रकाशनही झाले.

खरे पाहिले तर मोरारजींच्या आत्मचरित्राचा दुसरा भाग प्रसिद्ध होऊनही आता चार-पाच वर्षं झाली; पण इतर अनेक पुस्तके गाजली तसे मोरारजींचे आत्मचरित्र काही गाजले नाही. मराठीत एक-दोन तुरळक अभिप्राय सोडले तर कुणी त्याची दखलही घेतलेली दिसत नाही !

का बरे असे झाले असेल ? वास्तविक मोरारजीभाईंचा महाराष्ट्राशी फार निकटचा संबंध. पंचेचाळीस सालापासून छप्पन सालापर्यंत म्हणजे ११ वर्षे ते जुन्या मुंबई-प्रांताचे गृहमंत्री व मुख्य मंत्री होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात तर उभ्या महाराष्ट्राने त्यांची नाना तऱ्हांनी निंदा केली होती. शिवकालीन महाराष्ट्राने औरंगजेबाशी जसे वैर धरले होते तसे वैर आधुनिक महाराष्ट्राला त्या दोन-तीन वर्षांत मोरारजींविषयी वाटत होते. असे असून मराठी नियतकालिकांतून मोरारजींच्या आत्मचरित्राची ही उपेक्षा का बरे झाली ?

*मला त्याची दोन तीन व्यावहारिक कारणे* दिसतात. पहिले असे की, आत्मचरित्राची इंग्रजी आवृत्ती अतिशय महाग होती. बऱ्यापैकी लायब्ऱ्यांना देखील ते पुस्तक घेणे परवडले नसते. हिंदी आणि गुजराती आवृत्त्या इंग्रजी आवृत्तीच्या एकतृतियांश किमतीत मिळतात; पण आपले पत्रकार हिंदी किंवा गुजराती वाचीत नाहीत. दुसरे असे की, या पुस्तकात चघळण्यासारखे किस्से फारसे नाहीत. जो काही मजकूर आहे तो स्थूलमानाने वर्तमानपत्राच्या वाचकांना माहीत असलेलाच आहे. नवीन जर काही असेल तर ते म्हणजे मोरारजींचा दृष्टिकोन आणि व्यक्ती व घटना यांजवरील भाष्ये. तिसरे असे की, हल्ली मराठी नियतकालिके धावती झाल्येत. जुन्या घटनांवरच्या मोरारजींसारख्या जुनाट माणसांनी केलेल्या टीका-टिप्पणीला बाजारात भाव कोठे आहे ?

हं; भाग्यचक्राला कलाटणी मिळून मोरारजी पंतप्रधान झाले नि म्हणूनच त्यांच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर तरी झाले. बाकी, मोरारजींच्या आयुष्याचा आलेख काढला तर त्यात जेवढे चढउतार आढळतील तितके फारच थोड्या राजकारणी पुरुषांच्या आयुष्यात दिसून येतील.

खरे आहे तुमचे म्हणणे. अगदी अगांतुक अडथळे त्यांच्या उत्कर्षाच्या मार्गात उत्पन्न झालेले दिसतात. बावन्न सालच्या निवडणुकीत ते हरले, हा एक त्यापैकीच. सहासष्ट साली इंदिराबाईंविरुद्धच्या नेतेपदाच्या लढतीत ते हरले. त्यानंतर त्यांचा मंत्रिमंडळात प्रवेश व्हायला काहीच हरकत नव्हती. किंबहुना, त्यापूर्वी शास्त्रींच्या मंत्रिमंडळातच त्यांचा समावेश व्हायला हवा होता; पण दोन्ही वेळा नंदाजीरूपी उपटसुंभ आड आला; पण मोरारजींच्या आत्मचरित्राचे हे वैशिष्टच मानावे लागेल की, अशा हकीकती सांगताना सुद्धा त्यांच्या लिखाणात कटुता फारशी आढळत नाही.

### मोरारजींची जीवनदृष्टी

मोरारजींनी राजकारणाची ऊन-सावली भरपूर अनुभविली आहे. त्यामुळे सुखाबरोबर दुःख, उत्कर्षासह अपकर्ष आणि चढणीसह उतरण येतच असते अशी खात्री पटून ही अलिप्तता किंवा निष्कटुता त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली असेल.

तुम्ही म्हणता ते एका अर्थाने खरे आहे. राजकारणी माणसाने अपमान, अवहेलना आणि वैफल्य यांचा बाऊ करून चालत नाही; परंतु, मोराजींच्या लिखाणात जी निष्कटुता आहे त्याचे कारण निराळे आहे. हिंदूंची सनातन जीवनदृष्टी त्यांनी अंगी बाणवल्यामुळे एक व्रतस्थ जीवन ते कंठीत असतात. त्यातून ही अलिप्तता जन्माला आली आहे.

ही सनातन जीवनदृष्टी कोणती ?

ईश्वरावर मोरारजींची अढळ निष्ठा आहे, जग व्यवस्थित चालते, कारण काही भौतिक आणि नैतिक नियमांनी जगाची वाट आखून दिलेली आहे. या नियमांचा अंमल करणारा कोणी तरी असलाच पाहिजे. त्या जगन्नियंत्याने कर्माचा नियम सर्व जीवांच्या वर्तनासाठी घालून दिला आहे. या नियमांचा अर्थ असा की, आपण जी कृती करू तिचे परिणाम आपणास या जन्मी किंवा पुढच्या जन्मी भोगावे लागतातच. हे परिणाम तीन प्रकारचे असतात : ( १ ) सुख—दुःख. आपण जे कर्म करू त्यापासून होणारे सुख किंवा दुःख आपल्या वाट्याला येते. ही सुख-दुःखे तत्काळ, कालांतराने किंवा पुढच्या जन्मीही भोगावी लागतात. ( २ ) संस्कार : आपण जे कर्म करू त्याचा संस्कार आपल्यावर होतो. पहिल्या कृतीचा जो संस्कार आपल्यावर घडतो त्यानुसार पुढील कृती करतानाचे आपले वर्तन घडते. ( ३ ) संचित. जे कर्म आपण करू त्यामागील वृत्तीवर संचित अवलंबून असते. सद्हेतूने कर्म केल्यास पुण्य मिळते. असद्वृत्तीने कर्म केल्यास पाप मिळते. प्रत्येकाच्या खात्यावर त्याची नोंद होते. मात्र केवळ कर्तव्यबुद्धीने कर्म केल्यास मात्र संचित प्राप्त होत नाही. खात्यावर जोपर्यंत शिल्लक आहे तोवर जन्म घ्यावे लागतात. त्यामुळे पापपुण्यरहित कर्तव्यबुद्धीचा अंगिकार केल्याने जन्मचक्रापासून मिळणारी मुक्ती जवळ येते.

हे तर अगदीच सनातनी आणि बुरसटलेले विचार आहेत ! धावत्या जगाबरोबर धावणाऱ्यांपैकी मोरारजी दिसत नाहीत !

ते काय असेल ते असो; पण त्याचा परिणाम असा झाला आहे की, व्यक्तींविषयींच्या राग-लोभापासून मोरारजी दूर राहिले आहेत. इंदिराबाईंनी त्यांचा काय कमी अपमान आणि अवहेलना केली होती ? "साध्या चपराशाला कामावरून दूर करताना जे सौजन्य दाखविले जाते, तेही मला दाखविले नाही !" असे स्वतः मोराजींनी ६९ साली म्हटले होते; पण आज मोरारजी बाईंविषयी शत्रुत्व बाळगून आहेत, असा संशयही कोणी घेत नाही. कारण मोरारजी असे मानतात

मलपृष्ठ २ वर

# विलिनीकरणाच्या रोखाने धावू लागलेली रेड्डी काँग्रेस

सदाशिव पेठकर

'गेल्या दोन महिन्यांत काय घडतंय ते पहाच', असे जे बुटासिंग म्हणाले ते दोन गोष्टींच्या संदर्भामध्ये. एक म्हणजे, इंदिरा काँग्रेसचा जनता पक्षविरोधी निदर्शनांचा व्याप आणि ताप वाढत जाणार आहे, असे त्यांना सुचवायचे आहे; परंतु नजीकच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने दुसरी गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. ती म्हणजे रेड्डी (आता स्वर्णसिंग) काँग्रेसच्या भवितव्याची !

हे भवितव्य काय आहे हे रेड्डी काँग्रेसच्या रायसीना मार्गावरील कचेरीत गेलो की कळून येते. तेथील सगळयाच वातावरणामध्ये उदासीनता दाटून आलेली असल्याचे जाणवते.

ब्रह्मानंद रेड्डी जोपर्यंत या पक्षाचे अध्यक्ष होते तोपर्यंत इंदिरा गांधींच्या सुलतानशाहीविरुद्ध हा पक्ष काही काळ तरी उभा राहील असे वाटत होते; परंतु कर्नाटकात या पक्षाचे पानिपत होताच आंध्रप्रदेशातील निवडणूक निकाल यायची वाट न पाहताच ब्रह्मानंद रेड्डी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन टाकला. त्यामुळे हंगामी अध्यक्षासाठी शोध सुरू झाला. पूर्वी काँग्रेसचे अध्यक्षपद आपल्याला मिळावे यासाठी वरिष्ठ नेत्यांमध्ये चुरस लागे. या वेळी परिस्थिती अगदी उलटी होती. अध्यक्षपद टाळण्याच्याच जो तो खटपटीत होता. शेवटी कसेबसे स्वर्णसिंग राजी झाले. स्वर्णसिंगांकडे दुसऱ्यांदा हंगामी अध्यक्षपद आलेले आहे. गेल्या वर्षीच्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव होताच देवकांत बरुआ यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर, इंदिरा गांधींच्या सूचनेनुसार स्वर्णसिंग हंगामी अध्यक्ष झाले. नंतर मेमध्ये अ. भा. काँग्रेस समितीची बैठक भरून तीत ब्रह्मानंद रेड्डी यांची त्या पदावर निवड करण्यात आली. रेड्डी हे इंदिरा गांधी यांचेच उमेदवार होते. इंदिरा गांधींना पक्षनेतृत्वामध्ये पूर्वीसारखे स्थान मिळू नये असे वाटणारा जो गट होता त्याने रेड्डींच्या विरुद्ध सिद्धार्थशंकर राय यांना उभे केले. राय यांच्यापेक्षा रेड्डी यांना जवळजवळ दुप्पट मते मिळाली आणि त्यामुळे इंदिरा गांधींची अजूनही पक्षावर पकड आहे हे दिसून आले. ही पकड सुप्रतिष्ठित करण्याचे कार्य ब्रह्मानंद रेड्डी पार पाडतील अशी इंदिरा गांधींची साहजिकच अपेक्षा होती. रेड्डी यांनी इंदिरा गांधींना कार्यकारिणीत घेतले, निवडणूक मंडळावरही घेतले; परंतु एवढया माफक महत्त्वावर इंदिरा गांधींचे समाधान होण्यासारखे नव्हते. शंकरदयाळ शर्मा किंवा देवकांत बरुआ हे जसे आपल्या इशाऱ्यानुसार नाचत असत असत तसेच ब्रह्मानंद रेड्डी यांनीही वागले पाहिजे असे इंदिरा गांधींना वाटत होते. मधला कटु अनुभव आला नसता तर रेड्डींनीही होयबाची भूमिका घेतली असती. आणीबाणीच्या काळात ते गृहमंत्री होते; पण हातात सत्ता मात्र किंचितही नव्हती. इंदिरा गांधींचे हुकूम संजय ओम मेहता यांना कळवी आणि त्यानुसार ओमजी फर्मान काढीत असत. त्यामुळे ब्रह्मानंद रेड्डी केवळ नामधारीच मंत्री राहिले. ती अपमानित अवस्था पुन्हा स्वीकारायला रेड्डी यांनी अध्यक्षपदावर विराजमान झाल्यानंतर नकार दिल्यामुळेच इंदिरा गांधींनी रेड्डींना आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या आठ-दहा जणांना धडा शिकविण्यासाठी वेगळा पक्ष काढला !

इंदिरा गांधी आपण होऊन पक्षातून बाहेर गेल्यानंतर रेड्डी काँग्रेस यापुढे तरी नरमाईचे धोरण सोडून देऊन इंदिरा गांधींच्या राजकीय पुनरागमनाविरुद्ध दंड थोपटून उभी राहील असे वाटत होते; परंतु ही अपेक्षा पूर्णपणे फोल ठरली. पाच राज्यांतील विधानसभांच्या निवडणुकांत पराभव पत्करावा लागताच हा पक्ष पार कोसळला. सत्ता म्हणजेच राजकारण असे मानणाऱ्या लोकांना सत्तेवरून दूर व्हावे लागले की, त्यांची अवस्था किती केविलवाणी होते याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे रेड्डी काँग्रेसची सध्याची स्थिती.

मी दिल्लीत असताना रेड्डी काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक भरली होती. तीत स्वतंत्र पक्ष म्हणून काम करण्याच्या निर्णयाचा पुनरुच्चार करण्यात आला. या बैठकीनंतर स्वर्णसिंग यांची ओझरती भेट झाली. 'आम्ही इंदिरा काँग्रेसशी ऐक्य करणार नाही' असे ते म्हणाले; परंतु त्यांचे ते बोलणे मनापासूनचे आहे असे वाटले नाही. आधी हा गृहस्थ फारसे न बोलण्याबद्दलच प्रसिद्ध आहे. त्यात पराभूत पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारावे लागल्यामुळे स्वतःवरच काहीसा चिडलेला असला पाहिजे. त्यामुळे 'पुरे करा तुमचे प्रश्न' असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर सारखा दिसत होता. रेड्डी काँग्रेसला स्वतंत्र पक्ष म्हणून राहणे झेपण्यासारखे नाही, तेवढा त्राण त्या पक्षात राहिलेला नाही हे स्वर्णसिंग यांच्याशी पाच-दहा मिनिटे बोलले तरी जाणवते. तीच गोष्ट कृष्णचंद्र पंत यांची. रेड्डी यांच्या कारकीर्दीत पंत सरचिटणीस असले तरी त्या वेळी वरचष्मा होता तो दुसरे सरचिटणीस व्ही. बी. राजू यांचा. त्या काळात रेड्डी आणि राजू ही दुक्कलच सारे निर्णय करीत असे. रेड्डी यांच्या पाठोपाठ राजू यांनी सरचिटणीसपदाचे त्यागपत्र देऊन राजकीय संन्यास घेतला. तेव्हापासून कृष्णचंद्र पंत हे रेड्डी काँग्रेसचे प्रवक्ते झाले आहेत. सी. एम्. स्टीफन यांच्या भाषेत जसे आर्जव आढळते तसेच ते पंत यांच्यापाशीही आहे. पत्रकारांच्या प्रश्नांना ते शांतपणे उत्तरे

देतात. तेही स्वर्णसिंगांप्रमाणे 'आमचा पक्ष वेगळा राहील' असे म्हणतात; परंतु त्यांची मनःस्थिती दोलायमान असली पाहिजे, असे त्यांच्या बोलण्यावरून वाटते. निर्धाराची भाषा त्यांच्या तोंडातून निघतच नाही. त्यामुळे अ. भा. काँग्रेस समितीच्या बैठकीत इंदिरा काँग्रेसशी जमवून घेण्याचा प्रस्ताव आला तर कदाचित पंत त्या प्रभावाच्या बाजूने उभे राहतील आणि स्वर्णसिंगही तोच मार्ग अनुसरू लागतील असा अनेकांचा अंदाज आहे.

रायसीना मार्गावरच्या काँग्रेस कचेरीतील कर्मचाऱ्यांचा कानोसा घेतला की या अंदाजाला पुष्टी मिळते.

रेड्डी काँग्रेस किती काळ स्वतंत्र पक्ष म्हणून काम करील हे प्रश्नचिन्ह त्या कचेरीच्या उदासवाण्या चेहऱ्यावर कोरले गेले आहे.

यशवंतराव चव्हाण, करणसिंग, महंमदअली आणि प्रियरंजनदास मुन्शी हेच काय ते कार्यकारिणीचे सदस्य. 'इंदिरा गांधींशी कधीही समझोता करावयाचा नाही', या भूमिकेचा ठामपणाने पुरस्कार करीत आहेत; परंतु त्यांना अ. भा. काँग्रेस कमिटीमध्ये पुरेसा पाठिंबा मिळण्याची शक्यता दिसत नसल्यामुळे, १९६९च्या अखेरीस इंदिरा गांधींनी आपला स्वतंत्र पक्ष काढल्यानंतर, निजलिंगप्पा, अतुल्य घोष, स. का. पाटील प्रभृतींची जशी अवस्था झाली तशी पाळी या इंदिरा-विरोधकांवर येईल. संघटना काँग्रेसने तो विजनवास न कुरकुरता सहन केला. तेवढे मनोबल चव्हाण, करणसिंग प्रभृतींपाशी आहे का याची शंका वाटते.

कारण, 'पराभूत सेनानीची प्रतिक्रिया तुम्हाला कशाला हवी आहे?' असा चव्हाण निवडणुकीतील अपयशाबद्दल आपण विचारलेल्या प्रश्नाला प्रतिप्रश्न करतात.

चव्हाणांनी स्वतःला सेनानी म्हणवून घ्यावे याची गंमत वाटली. सेनानी लढाई कधीच टाळीत नाही. उलट संघर्षाचे ढग जमू लागले की, त्याचे बाहू आणि छाती यांच्यात नवे स्फुरण चढते. परंतु चव्हाणांनी लढाई सतत टाळलेलीच आहे. आकाशात पक्षीही भराऱ्या मारतो आणि पतंगही विहार करतो. पक्ष्याचे भ्रमण स्वतःच्या पंखांच्या सामर्थ्यावर होत असते तर पतंगाला वाऱ्याचा आधार घ्यावा लागतो. चव्हाणांचे नेतृत्वही वेळोवेळी वेगवेगळे आकार घेणाऱ्या परिस्थितीच्या वाऱ्यावरच स्वार झालेले आहे.

मला बारा वर्षांपूर्वीची चव्हाणांची भेट आठवते. त्यांच्या ओळखीच्या एका गृहस्थाबरोबर त्या वेळी मी त्यांच्या घरी गेलो होतो. बोलण्याच्या ओघात चव्हाण म्हणाले होते, 'पंतप्रधानांचे घर माझ्यापासून दूर नाही!'

इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्याला सात-आठ महिने झाले होते. त्या काळात गुंगी गुडिया अशीच त्यांची प्रतिमा निर्माण झालेली होती. मोरारजी देसाई नकोत म्हणून कामराजांनी इंदिरा गांधींना पंतप्रधान केले होते. लवकरच पुन्हा लोकसभेची निवडणूक होणार होती आणि त्या वेळी आपल्याला पंतप्रधानपद मिळू शकेल असा चव्हाणांचा कयास होता.

त्यामागचा त्यांचा आधार कोणता होता?

संसदीय काँग्रेस पक्षाचे त्या वेळचे सरचिटणीस रघुनाथसिंग यांनी त्याचे उत्कृष्ट विश्लेषण केले होते. महाराष्ट्राच्या राजकारणासंबंधी बोलताना रघुनाथसिंग मला म्हणाले होते, 'चव्हाण इज दी लीडर ऑफ दी फ्यूएल मराठा लीग'.

रघुनाथसिंगांचे हे मत जेव्हा चव्हाणांच्या कानावर घातले तेव्हा ते संतापतील अशी माझी कल्पना होती; परंतु अप्रत्यक्षपणे त्यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली. 'राजकारण करायचे म्हणजे एखाद्या समाजाचा घट्ट आधार घ्यावाच लागतो', अशी त्यांनी रघुनाथसिंगांच्या मतावर मल्लीनाथी केली होती.

एखादे राज्य संपूर्णपणे एका व्यक्तीच्या पाठीशी उभे आहे असे चित्र फक्त चव्हाणांच्याच बाबतीत दिसत असायचे. १९६९ मधल्या दुफळीनंतर इंदिरा गांधी म्हणजे काँग्रेस पक्ष असे समीकरण झालेले होते. १९६० मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर आरूढ झाल्यानंतर चव्हाणांनी आपण म्हणजे महाराष्ट्र काँग्रेस असे समीकरण निर्माण केले आणि आपल्या या एकमुखी नेतृत्वाला महाराष्ट्र काँग्रेसमध्ये किंचितही विरोध होणार नाही याची तरतूद करण्यासाठी धनिक शेतकऱ्यांना हाताशी धरले, विधानसभा आणि लोकसभा यांचे उमेदवार निवडताना आपल्याशी निष्ठा हीच एकमेव कसोटी मानली.

चव्हाण दिल्लीला गेले ते काहीशा असाधारण परिस्थितीतच. चीनशी झालेल्या सीमासंघर्षामध्ये भारताच्या पदरी नामुष्की आल्यामुळे कृष्ण मेनन यांना संरक्षणमंत्रिपदाचा राजीनामा देणे भाग पडले. त्या वेळी नेहरूंनी चव्हाणांना दिल्लीला बोलावून घेतले. तेव्हापासून गेल्या वर्षाच्या मार्चपर्यंत यशवंतराव चव्हाण केंद्रीय मंत्रिमंडळात होते. संरक्षण, गृह, अर्थ आणि परराष्ट्र अशी महत्त्वाची खाती त्यांच्याकडे येत गेली, परंतु चौदा वर्षे दिल्लीत राहूनही चव्हाणांच्या नेतृत्वाने प्रादेशिक कक्षा कधीच ओलांडली नाही. संसदेतील पन्नास-पंचावन्न महाराष्ट्रीय सदस्यांचा गट हेच केंद्रीय मंत्रिपद सुरक्षित ठेवण्यामागचे चव्हाणांचे एकमेव शक्तिकेंद्र होते. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये जोपर्यंत आपल्याविरुद्ध विसंवादी सूर निघत नाही तोपर्यंत दिल्लीत आपल्या स्थानाला कोणीही धक्का लावू शकत नाही हे त्यांना माहीत होते. त्यांच्या या धोरणामुळेच इतर राज्यांतील खासदार चव्हाणांबाबत बोलताना 'छत्रपती' असा उल्लेख करीत. हा उल्लेख गौरवाचा नव्हता. त्यात उघडउघड कुचेष्टा होती. चव्हाणांना हे माहीत नव्हते असेही नाही.

१९६६ च्या सप्टेंबरमध्ये त्यांच्याशी झालेल्या भेटीच्या वेळी या सगळ्या गोष्टींचा ऊहापोह झालेला होता. त्यानंतर सहाच महिन्यांनी लोकसभेची निवडणूक होणार होती. त्या वेळी महाराष्ट्राच्या एकमुखी पाठिंब्याच्या बळावर पंतप्रधानपद मिळविणे अशक्य नाही असे चव्हाण यांना वाटत होते; परंतु त्यासाठी मोरारजींसारखी इंदिरा गांधीशी लढत द्यायची त्यांची तयारी नव्हती. भक्तगण जशी आपल्या आराध्य देवतेची मूर्ती उचलून मंदिराच्या गाभाऱ्यात ठेवतात तसे संसदीय काँग्रेस पक्षाने आपल्याला पंतप्रधानपदावर नेऊन ठेवावे अशी चव्हाणांची अपेक्षा होती. ती सफल होणे अर्थातच शक्य नव्हते. 'आपण नेतेपदाची निवडणूक लढविणार आहोत' असे इंदिरा गांधी यांनी जाहीर करताच चव्हाणांचा मनसुबा बारगळला. तरीही इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात काँग्रेसला भरघोस यश मिळालेले असल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळामधील त्यांचे स्थान अधिकच पक्के झाले.

ही परिस्थिती दोन वर्षे टिकली.

चव्हाणांच्या दृष्टीने हा दिल्लीतील बरा काळ होता.

त्यानंतर १९६९ च्या जुलैमध्ये राष्ट्रपतिपदाच्या उमेदवाराची निवड करताना काँग्रेस हायकमांडमध्ये तीव्र मतभेद उफाळून आले तेव्हा चव्हाणांची बरीच श्रेधातिरपिट उडाली. इंदिरा गांधींच्या महत्त्वाकांक्षेला रोखण्यासाठी कामराज, मोरारजी देसाई आणि स.का. पाटील यांनी संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीचा पुरस्कार आरंभिला. 'सिंडिकेट' ला संजीव रेड्डी कशासाठी राष्ट्रपती व्हावयास हवे आहेत हे इंदिरा गांधींना ठाऊक होते. त्या बिथरल्या आणि त्यांनी 'सिंडिकेट' चा बनाव मोडून काढण्यासाठी चव्हाणांची मदत घ्यायचे ठरविले. रेड्डी यांच्या उमेदवारीला आपण विरोध करू असे चव्हाणांनी इंदिरा गांधींना आश्वासन दिले, परंतु बंगलोरला गेल्यावर त्यांनी आपले पहिले मत बदलले आणि रेड्डी यांच्या बाजूने मत नोंदविले. तेव्हाही चव्हाणांपुढे पंतप्रधानपदाचाच हिशोब होता. चव्हाणांनी आपल्याला दिलेले आश्वासन पाळले नाही म्हणून संतापलेल्या इंदिरा गांधी तेव्हा उद्‌गारल्या होत्या, " He is a liar "

पुढे निवडणुकीत संजीव रेड्डी पराभूत होताच, चव्हाणांनी पुन्हा एकदा बाजू बदलून इंदिरा गांधींच्या गोटात प्रवेश केला, तोही मंत्रिपद सुरक्षित ठेवण्याच्या हव्यासापायीच. मोरारजी देसाई यांच्याकडून अर्थखाते काढून घेतल्यानंतर ते राजीनामा देतील हे इंदिरा गांधींना माहीत होते. मोरारजींसमवेत आणखी काही मंत्री राजीनामा देणार असल्याची जी बातमी प्रसिद्ध झाली होती तीत यशवंतराव चव्हाणांचेही नाव होते, परंतु चव्हाण जेवढ्या झटक्यात मोरारजींच्या जवळ आलेले होते तेवढ्याच तऱ्हेने त्वरेने मोरारजींची साथ सोडली. तेव्हापासून काँग्रेसच्या वरिष्ठ वर्तुळातील आपली विश्वासार्हता चव्हाणांनी गमावली. आपण त्यांना कोणतेही खाते दिली तरी ते मंत्रिमंडळातून बाहेर पडणार नाहीत याची इंदिराजींची खात्री पटली आणि चव्हाणांनी ती खरीही करून दाखविली. इंदिरा गांधींनी त्यांच्याकडून गृहखाते काढून घेऊन त्यांच्यासंबंधीचा आपला अविश्वास प्रकट केला. तरीही चव्हाण खुर्चीला चिकटूनच राहिले. आणीबाणीत तर त्यांचा अगदी पालापाचोळाच झालेला होता. त्यांच्याकडे कोण येते, ते कोणाशी काय बोलतात याची गुप्त पोलिसांकरवी इंदिरा गांधी माहिती मिळवीत असत.

हा अपमानही त्यांना असह्य झाला नाही.

लोकसभेची निवडणूक घेण्याचे इंदिरा गांधींनी जाहीर केले तेव्हा चव्हाण झेकोस्लोव्हाकियामध्ये होते. तेथून ते रुमानियाला जाणार होते, परंतु निवडणुकीची बातमी ऐकताच त्यांनी तत्काळ दिल्ली गाठली. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आणीबाणी नाहीशी झालेली नसली तरी ती बरीच शिथिल झाली होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन आपण इंदिरा गांधींच्या हुकुमशाहीविरुद्ध उभे रहावे असे जगजीवनराम यांनी ठरविले. आपली लोकशाहीनिष्ठा सिद्ध करण्याची चव्हाणांना तेव्हा चांगली संधी आलेली होती, परंतु जगजीवनरामांनी जेवढा मर्यादित धोका पत्करला तेवढा स्वीकारण्याची चव्हाणांची तयारी नव्हती.

'इंदिरा गांधी याच आमच्या नेत्या' असे देवकांत बारुआंप्रमाणे तेही म्हणत राहिले. निवडणुकीमध्ये इंदिरा गांधी पराभूत झाल्यानंतर चव्हाणांना त्यांचे भय बाळगण्याचे कारण नव्हते, तरीही त्यांनी ते धाडस केले नाही. आणीबाणीसंबंधी गुळमुळीत बोलून ते वेळ निभावून नेत असत. इंदिरा गांधींनीच जेव्हा आपला वेगळा पक्ष स्थापन करून चव्हाणांना दूर सारले तेव्हाच ते बाईंच्या हुकुमशाहीचा निषेध करू लागले.

हा सारा इतिहास आठवला तो चव्हाणांनी स्वतःला सेनानी असे संबोधिले म्हणून.

चांगल्या चांगल्या सेनानींनाही एखाद्या लढाईत पराभव पत्करावा लागतो; परंतु त्यामुळे ते नाउमेद होत नाहीत, आणि निष्प्रभही होत नाहीत. हळदीघाटीच्या लढाईत झालेला पराभव महाराणा प्रतापाची कीर्ती वृद्धिंगत करून गेला. कारण त्या पराभवाने त्याच्या झुंजार वृत्तीवर विजय मिळविलेला नव्हता. चव्हाणांनी यापूर्वी कधीही झुंज दिलेली नाही. म्हणूनच यापुढे ते कोणत्या पौरुषाचे प्रत्यंतर घडविणार असा प्रश्न पडतो.

आता तर त्यांची परिस्थिती आणखीनच बिकट झालेली आहे.

महाराष्ट्र काँग्रेस हा त्यांचा एकमेव आधार निखळला आहे.

ते कार्य वसंतराव नाईक यांनी सुरू केले आणि वसंतदादा पाटील यांनी पुढे रेटले.

महाराष्ट्रात रेड्डी काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांचे संमिश्र मंत्रिमंडळ ही भावी घटनांची सूचक नांदी ठरणार आहे.

'या दोन काँग्रेस पक्षांचे एकीकरण होणार नाही' असे चव्हाण निक्षून सांगतात. तसे एकीकरण होणे त्यांना सोयीचेही नाही. कारण या संदर्भामध्ये एकीकरण हा शब्द फसवा आहे हे त्यांना माहीत आहे. इंदिरा गांधींना हवे आहे ते रेड्डी काँग्रेसचे बिनशर्त विलिनीकरण. 'आपला पक्ष हाच खरा काँग्रेस पक्ष आहे' असे त्या म्हणतात त्यामागचा हाच अर्थ आहे. आपल्या पक्षामध्ये कोणाकोणाला घ्यायचे हेही इंदिरा गांधीच ठरविणार आहेत. स्वाभाविकच, ब्रह्मानंद रेड्डी आणि यशवंतराव चव्हाण यांना त्या पक्षात प्रवेश मिळणार नाही. त्या दोघांपैकी रेड्डी यांनी अध्यक्षपद सोडून देऊन आपला राजकीय अस्त करून घेतला आहे. राहता राहिले चव्हाण. अजून ते लोकसभेत प्रमुख विरोधी पक्षनेते आहेत आणि त्यामुळे मंत्र्याला मिळणारे वेतन आणि निवासस्थान, मोटार आदी सोयी त्यांना मिळत आहेत. रेड्डी काँग्रेसचे इंदिरा काँग्रेसमध्ये विलिनीकरण झाले तर या सुविधांना मुकण्याची पाळी चव्हाणांवर येणार आहे.

म्हणूनच चव्हाणांचा आजचा लोकशाहीनिष्ठेचा पवित्रा केवळ राजकीय अस्तित्वाचाच भाग ठरतो.

अशा वेळी आपल्या अनुयायांनी आपल्या पाठीशी उभे रहावे अशी चव्हाणांनी हाक दिलेली आहे; परंतु मतलबी नेत्याचे अनुयायीही मतलबीच असतात! जहाज फुटताच त्यातून पटापट उड्या मारणाऱ्या उंदरांप्रमाणे ते सुरक्षित आसरा शोधू लागतात. ही परिस्थिती चव्हाणांनी स्वतःच्या वर्तनानेच ओढवून घेतली आहे. इंदिरा काँग्रेसबरोबर संमिश्र मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रस्ताव संसदीय मंडळामध्ये चर्चेसाठी आला तेव्हाही चव्हाण गप्पच बसले. महाराष्ट्रात राष्ट्रपति–राजवट येऊ नये म्हणून आपण हा पवित्रा स्वीकारला असा ते खुलासा करतात.

ही शुद्ध आत्मवंचना आहे.

अण्णासाहेब शिंदे म्हणाले की, "महाराष्ट्रात राष्ट्रपति-राजवट यायचे काहीच कारण नव्हते. जनता पक्षाला बहुमत मिळाले नसले तरी सर्वाधिक जागा त्या पक्षाला मिळालेल्या आहेत. म्हणून त्या पक्षाला सरकार बनविण्याची संधी द्यायला हवी होती. तसे करणे लोकशाही संकेताला धरून झाले असते. इतके दिवस आमचा पक्ष राज्यावर होता. आता काही दिवस तो विरोधी पक्ष म्हणून विधानसभेत बसला असता तर काही बिघडले नसते. संमिश्र मंत्रिमंडळात सहभागी होऊन आमच्या पक्षाने सत्तेची लालसाच प्रकट केली आहे."

संमिश्र मंत्रिमंडळ म्हणजे शरणागतीची पहिली पायरी आहे असे अण्णासाहेब म्हणतात. हे मंत्रिमंडळ किती वेळ संमिश्र राहील याचीही त्यांना शंका वाटते. "आपण आपले हे मत व्यक्त का केले नाही?" असे विचारले तेव्हा ते म्हणाले की, 'महाराष्ट्राच्या संमिश्र मंत्रिमंडळासंबंधी दिल्लीत वाटाघाटी होत असताना मी प्रदेश काँग्रेसचा उपाध्यक्ष असूनही मला कोणीही भेटले नाही!'

केव्हा एकदा मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीसाठी महाशिवरात्रीचा मुहूर्त गाठतो असे वसंतदादांना झाले होते त्यांनी दिल्लीत आवश्यक त्या व्यक्तींचीच भेट घेतली-एकदा नव्हे तीनदा. महाराष्ट्र सदनातून बाहेर पडणाऱ्या मोटारी विलिंग्डन क्रिसेंटच्या रोखाने धावत होत्या. तेथील सारी खलबते पुरी झाल्यावरच त्यांचे तोंड रेसकोर्स रोडच्या दिशेने वळले. अशा धामधुमीमध्ये अण्णासाहेब शिंदे प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आहेत, ते सध्या दिल्लीतच आहेत याची कोणाला आठवण राहणार?

मात्र त्याकरिता अण्णासाहेबांनी उपाध्यक्षपदाचा राजीनामा धाडून दिलेला नाही हेही ध्यानात घेतले पाहिजे. त्यांच्या अहमदनगर जिल्ह्याला मंत्रिमंडळामध्ये प्रतिनिधित्व मिळालेले नाही म्हणून ते रागावले आहेत. हा रागही जराशा उशीरानेच प्रकट झाला. नगर जिल्ह्यावर अन्याय होऊनही अण्णासाहेब गप्प बसले यासंबंधी जेव्हा तेथील कार्यकर्ते टीका करू लागले तेव्हाच अण्णासाहेब राजीनामा देऊन मोकळे झाले!

यशवंतराव चव्हाणांप्रमाणे अण्णासाहेब शिंदेही इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळात होते. त्यामुळे कारभार करण्याच्या इंदिरा गांधींच्या पद्धतीविषयी ते अधिकाराने बोलू शकतात. मागे एकदा त्यांना भेटलो होतो तेव्हा त्यांनी इंदिरा गांधींच्या गतिमान नेतृत्वाची भरपूर प्रशंसा केली होती. आता मात्र त्यांच्या बोलण्यात कडवटपणा आढळतो. 'इंदिरा गांधी स्वभावतःच हुकुमशहा आहेत आणि त्यामुळे त्यांनी कधीही कोणत्याही मंत्र्याला त्याचे रास्त महत्त्व दिले नाही,' हा स्वानुभव अण्णासाहेब अनेक उदाहरणे देऊन कथन करतात.

वसंतराव नाईक यांनी मात्र वेगळा सूर लावलेला आहे. 'इंदिरा गांधींच्या चैतन्यदायी नेतृत्वाशिवाय आमच्यापुढे पर्यायच उरलेला नाही' असे ते विदर्भात रेड्डी काँग्रेसचा फज्जा उडाल्यापासून सांगू लागले आहेत. निवडणुकीच्या प्रचारसभांमधील त्यांच्याच भाषणांचे त्यांना सोयिस्कर विस्मरण झालेले आहे. इंदिरा गांधींनी वसंतराव नाईक यांना तडकाफडकी बडतर्फ करून शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री केले तेव्हा हेच गृहस्थ यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्रातील स्थान दुबळे व्हावे म्हणून इंदिरा गांधी कोणते खटाटोप करीत आहेत याचे इत्थंभूत वर्णन करीत होते. आता मात्र वसंतराव नाईक यांना चव्हाणांच्या भवितव्यापेक्षा स्वतःच्या भवितव्याची अधिक काळजी लागलेली आहे. आपण इंदिरा काँग्रेसमध्ये गेलो तरच 'विदर्भाचा नेता' या किताबावर आपल्याला अधिकार सांगता येईल, या विचारातूनच वसंतराव नाइकांनी आपली चाल आणि भाषा बदलली आहे. रेड्डी काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांच्या एकीकरणाची सर्वांत घाई झालेली आहे ती वसंतराव नाईक यांना. यशवंतराव मोहिते आणि मधुकरराव चौधरी हे वसंतदादांच्या मंत्रिमंडळातील दोन सदस्यही याच विचाराचे आहेत असे ते सांगतात. त्यामुळे 'एकीकरण नाही' असे म्हणणारे शरद पवार एकाकी पडले आहेत.

उत्तर भारतातील कोणत्याही राज्यामध्ये पुन्हा शक्तिशाली होण्याइतका उत्साह रेड्डी काँग्रेसमध्ये राहिलेला नाही. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या दोन दाक्षिणात्य राज्यांत हा पक्ष नाममात्रच ठरलेला आहे, हे ताज्या निवडणुकीने दाखवून दिले आहे. केरळचे मुख्यमंत्री ए. के. अँटनी हेच काय ते दक्षिणेमध्ये इंदिरा लाटेला विरोध करण्यासाठी बाह्या सरसावून उभे आहेत. यशवंतराव चव्हाणांमुळे महाराष्ट्र आपल्याला साथ देईल असा त्यांना आतापर्यंत विश्वास वाटत होता; परंतु रेड्डी काँग्रेसने संमिश्र मंत्रिमंडळाच्या रूपाने इंदिरा काँग्रेसशी हस्तांदोलन केल्यामुळे अँटनी यांचा विश्वास बराच खच्ची झालेला आहे. कारण विधानसभेत सहकार्य आणि बाहेर विरोध अशी भूमिका रेड्डी काँग्रेसला घेताच येणार नाही हे अँटनी जाणून आहेत. अशा परिस्थितीमध्ये इंदिरा गांधी यांच्या आक्रमक डावपेचांना तोंड देण्याइतके सामर्थ्य गलितगात्र झालेल्या रेड्डी काँग्रेसपाशी उरलेले नाही, हेच स्पष्ट होते.

छत्रपती आणि त्यांचे बाळराजे यांच्यावर मोठा बाका प्रसंग गुदरला आहे.

(क्रमशः)

---

**पुढील अंकी**

# डाव्या कम्युनिस्टांचा कावेबाज मनसुबा

---

परराष्ट्रीय घडामोडी

# फ्रान्सच्या निवडणुका : डावे जमीनदोस्त

चंद्रशेखर पुरन्दरे

दि. १२ मार्च आणि १९ मार्चला दोन फेऱ्यांमध्ये मतदान होऊन फ्रान्सच्या निवडणुकांत सत्तारूढ पक्षाच्या आघाडीला निर्विवाद बहुमत मिळाले. संपूर्ण जगाचे व विशेषतः युरपचे लक्ष या निवडणुकीने वेधून घेतले होते. काही आन्तरराष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्नही या निवडणुकीत गुंतले असल्याने फ्रेंच मतदारांनी दिलेला कौल अभ्यसनीय आहे.

**पार्श्वभूमी :** सहा वर्षांपूर्वी फ्रान्सच्या सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्टांनी एकत्र येऊन डावी आघाडी स्थापन केली. सोशॅलिस्टांचा नेता मितेरॉं याची सोशॅलिस्टांच्यात चैतन्य ओतण्यासाठी ही नवी योजना होती. फ्रान्सला गेल्या काही वर्षांत जे प्रश्न छळत आहेत त्यांच्या उकलीसाठी डावी आघाडीच परिणामकारक उपाय योजू शकेल असा मितेरॉंचा विश्वास होता. त्यातून बऱ्याच खटाटोपानंतर दोन्ही पक्षांनी मिळून एक संयुक्त कार्यक्रम तयार केला. कम्युनिस्टांना हवे असणारे सामाजिक बदल आणि सोशॅलिस्टांना हवे असणारे आर्थिक बदल यांची सांगड बसण्यावर संयुक्त कार्यक्रम अवलंबून होता; पण तो फ्रान्सच्या फक्त जेमतेम जगण्यास आवश्यक इतकेच उत्पन्न मिळविणाऱ्या लोकांच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक होता. त्याप्रमाणे तो आखण्यात आला. तो असा – ( १ ) पगार, पेन्शन आणि कुटुंबाचे भत्ते यांत ताबडतोब आणि भरपूर वाढ करावी. ( २ ) पगारांचा निर्देशांक आणि इतर सामाजिक फायदे वाढत्या जीवनमानाबरोबर आपोआप वाढावेत अशी व्यवस्था करावी. ( ३ ) कारखान्यांचे शासन त्यांच्या सेवकांमार्फतच व्हावे. ( ४ ) संपत्तीचे फेरवाटप करावे. त्यासाठी संपूर्ण करव्यवस्थेची पुनर्रचना करावी. (५) सर्व खाजगी बँका, कर्ज देणाऱ्या संस्था आणि विमा संस्थांचे हळूहळू राष्ट्रीयीकरण करावे. [ यांची संख्या जवळजवळ आठशे होती. ] तसेच नऊ प्रमुख औद्योगिक समूहांचे राष्ट्रीयीकरण करणे. असा हा कार्यक्रम आखण्यात आला होता; पण आताच्या परिस्थितीत याचा तोंडवळा बदलण्यात आला.

### फ्रान्सची सद्यःस्थिती

फ्रान्स हे जगातले एक अतिसंपन्न राष्ट्र असूनसुद्धा सध्या आर्थिक प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चाललेले होते. १९७३ साली पेट्रोलच्या किंमतीत एकदम चौपटीने वाढ झाल्यापासून साधारणतः आर्थिक आघाडी ढासळायला लागली. ( १ ) सध्या साडेदहा लाख लोक बेकार आहेत. हे एकूण कामगारांच्या ४·८ टक्के होतात. ( २ ) ९ टक्के वार्षिक दराने चलनफुगवटा वाढतो आहे. त्यामुळे आन्तरराष्ट्रीय बाजारपेठेत मध्यंतरी फ्रँक कोलांटचा मारीत होता. (३)आर्थिक वाढीचा वेग या साऱ्यांना तोंड द्यायला अगदीच अपुरा ( ३% ) आहे.

सध्याचा अध्यक्ष जेस्कार देस्तॉं याचे धोरण मध्यममार्गी आहे. त्यामुळे कम्युनिस्ट त्याच्यावर खवळून होते. त्यांना समग्र बदल अभिप्रेत होता. १९७४ साली जेस्कार देस्तॉं सत्तेवर आला. त्याचा पंतप्रधान त्या वेळी जॅक शिराक हा होता; परंतु नंतर अध्यक्षाशी धोरणावरून मतभेद होऊन जॅक शिराक बाहेर पडला आणि जनरल द गॉलच्या धोरणांवर व तत्त्वप्रणालीवर आधारित असा गॉलिस्टांचा नवा पक्ष त्याने स्थापन केला. त्यामुळे देस्तॉंची परिस्थिती फारच नाजूक बनली होती. अशा या सद्यःस्थितीमध्ये सार्वत्रिक निवडणुका आल्या. सर्वांनाच आपली ताकद अजमावण्यासाठी व फ्रान्सला नवीन दिशा देण्यासाठी मतदारांचा कौल मागायला पक्ष तयार झाले. गॉलिस्टांची भूमिका कम्युनिस्टांच्या विरुद्ध टोकाची म्हणजे उजवी आहे. गॉलिस्ट आणि जेस्कार देस्तॉंने पुढाकार घेऊन स्थापन केलेला युनियन फॉर डेमॉक्रसी ऑफ फ्रान्स (UDF) हे सहसात पक्षांचे कडबोळे, यांची आघाडी स्थापन झाली. सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्टांनीही डावी आघाडी स्थापन करण्याचे ठरविले. एकूण फ्रेंच जनतेचा नूर पहाता डावी आघाडी फारच प्रबळ ठरणार हे स्पष्ट दिसत होते.

### कम्युनिस्टांची भूमिका

सहा वर्षांपूर्वीचा संयुक्त कार्यक्रम दोन्ही पक्षांच्या संमतीने तयार झालेला होता; परंतु मागच्या एप्रिलमध्ये कम्युनिस्ट पक्षाचा नेता मार्शाय याने हा संयुक्त कार्यक्रम 'अद्ययावत्' करण्याच्या नावाखाली काही उपाय सुचविले. डाव्या आघाडीच्या या निवडणुकीत झालेल्या सपशेल पराभवाची बीजे तेथे आहेत. मार्शायने पुढील दुरुस्त्या सुचविल्या. ( १ ) कुटुंबभत्त्यात ५०% वाढ. ( २ ) बाकी सामाजिक फायद्यात व सवलतीत प्रचंड वाढ. ( ३ ) वेतनाची कमाल व किमान मर्यादा यात पाचपटींचा फरक. ( म्हणजे कमीत कमी पगार १००० रु. असल्यास जास्तीत जास्त ५,००० ) ( ४ ) कमीत कमी पगार २,२०० फ्रँक्स ( ४००० रु. ) वर स्थिर ठेवावा. ( ५ ) आयकरात जबरदस्त वाढ करावी.

१० मेला त्याने सगळा आर्थिक कार्यक्रम सविस्तर मांडला. त्याचे प्रमुख उद्दिष्ट श्रीमंतांना नागविणे हे होते आणि ते त्याने कोणताही आडपडदा न ठेवता स्पष्ट केले होते. फ्रान्सची करआकारणीची पद्धत श्रीमंतांना अनुकूल आहे. फ्रान्समध्ये करपात्र वरचा वर्ग आणि हातावर पोट असणारा खालचा वर्ग यांच्यातील तफावत युरपमध्ये सगळ्यात जास्त आहे. ही कमी करण्याचा विडा मार्शायने उचलला आणि मूलभूत दुरुस्त्या सुचविल्या. सोशॅलिस्टांचा मध्यम

मार्ग यामुळे धोक्यात आला. त्यांना मध्यमवर्गीयांना दुखवायचे नव्हते. मार्शायच्या एकतर्फी घोषणेमुळे सोशॅलिस्ट एकदम अडचणीत आले. मार्शायच्या योजनेनुसार फ्रान्सच्या मालकांना पगारापोटी कामगारांना एकूण ६८८ अब्ज रु. जास्त द्यावे लागले असते आणि सरकारला बजेटमध्ये ४०% वाढ करावी लागली असती. हा कार्यक्रम वाचून सोशॅलिस्टांचेच काय पण सामान्य नागरिकाचेही डोळेच पांढरे झाले ! मार्शायचा खोडसाळपणा असा की, त्याने १० मेला हा कार्यक्रम जाहीर केला. १२ मेला सोशॅलिस्ट नेता मितेराँची टी. व्ही. वर मुलाखत होती. त्यामुळे मितेराँ अडचणीत आला. शेवटी त्याने मार्शायचा कार्यक्रम हा कम्युनिस्टांचा कार्यक्रम आहे; त्याचा डाव्या आघाडीशी संबंध नाही असे जाहीर केले. नंतर काही महिन्यांत मार्शायने आधीचा गोंधळ कमी म्हणून की काय नवीन पिल्लू सोडून दिले. त्यान्वये स्टील आणि तेल कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करावे, पियॉट मोटार कंपनीच्या १४५० फर्म्सचे राष्ट्रीयीकरण करावे असे सुचविले. यामुळे फ्रान्सच्या एकूण कामगारवर्गाच्या १०% कामगार सरकारच्या आधिपत्याखाली आले असते आणि एकूण औद्योगिक क्षेत्रात गुंतलेल्या भांडवलाच्या ५०% भांडवल सरकारच्या नियंत्रणाखाली आले असते. मितेराँ या दुरुस्त्या ऐकून आडवाच झाला ! संपूर्ण देशभर खळबळ माजली. शेवटी डावी आघाडी टिकविण्यासाठी मार्शायने ७२९ फर्म्सवर तडजोड करण्याची तयारी दर्शविली; पण अखेर सप्टेंबरमध्ये बोलणी फिसकटली आणि दोघे एकमेकांचे कट्टर शत्रू म्हणून शिव्या द्यायला सज्ज झाले !

डाव्या आघाडीचे दिवाळे वाजल्यावरही काही तरी चमत्कार घडून ते एकत्र येतील अशी गांजलेल्या फ्रेंचांना शेवटची आशा वाटत होती. कारण एवढ्या तीव्र आर्थिक उपाययोजनेवरच त्यांच्या आशा केन्द्रित झालेल्या होत्या. त्यामुळे नमुन्यादाखल मतांची जेव्हा चाचपणी करण्यात आली तेव्हा डाव्यांना मिळून जेस्कार देस्तांच्या आघाडीपेक्षा ६% मते कायम जास्त मिळत होती. (५१% वि. ४५%) जेस्कार देस्तां यामुळे खचला नाही. त्याने अध्यक्ष पक्षातीत असलेली ही प्रथा गुंडाळून ठवली न् या निवडणुका 'न भूतो न भविष्यति' इतक्या महत्त्वाच्या असल्याचे कारण देऊन सरळ सरकारपक्षाचा प्रचार करायला सुरुवात केली. त्याचीही आवाडी फारशी मजबूत नव्हतीच. जॅक शिराक हा तर अध्यक्षाचा कट्टर विरोधकच; पण हे सगळं पोतं पाठीवर टाकून देस्तॉने अखेर बाजी मारली. त्याचं प्रमुख कारण म्हणजे त्याची टी. व्ही. वरची दोन भाषणे आणि शिराकचा प्रचंड उत्साह! शिराक जबरदस्त झंझावाती दौरे काढून डाव्यांना निष्प्रभ करीत गेला. त्याच्या आवाहनाचा प्रमुख मुद्दा असा होता की, आतापर्यंत स्वातंत्र्याकडून समाजवादाकडे गेलेला कोणताच देश समाजवादाकडून स्वातंत्र्याकडे परतलेला नाही. तेव्हा या डाव्यांना वेळीच वेचा ! प्रसंगी चलनवाढही पत्करून बेकारी नष्ट करायचे त्याने मान्य केले; *पण एकूण भूमिका अति उजवी. त्यामुळे* भांडवलवादी खूष. मध्यंतरी डाव्यांच्या विजयाची इतकी हवा झाली होती की, लोकांनी तातडीने पैसा परदेशी बँकात गुंतवायला सुरुवात केली होती. ल्युसिॲं वारिएर हा प्रसिद्ध जुगारी अड्ड्यांचा अध्यक्ष (कॅन आणि द्यविलामधील) ६३४,००० डॉलर्स घेऊन स्वित्झर्लंडला जात असताना याच धामधुमीत पकडला गेला.

## पहिली फेरी

तर अशा रीतीने वातावरणनिर्मिती झाल्यावर १२ मार्चला पहिली फेरी पार पडली. फ्रान्सच्या निवडणुकीच्या पद्धतीनुसार ज्या उमेदवाराला पहिल्या फेरीत पन्नास टक्क्यांहून अधिक मते मिळतात तो विजयी घोषित केला जातो, पण समजा, एखाद्या ठिकाणी ३१%,३४ % आणि ३५% अशी मते तीन उमेदवारांना पडली तर दुसऱ्या फेरीत फक्त वरच्या दोघांतच लढत होते. अशा वेळी आघाडीचे उमेदवार बहुधा एकमेकांच्या उमेदवारांना पाठिंबा देतात. म्हणजे डाव्या उमेदवारात कम्युनिस्टांनी सोशॅलिस्टांना आणि त्यांनी कम्युनिस्टांना द्यायला हवा; पण कम्युनिस्टांनी कृतघ्नपणा केला. जर २१% पेक्षा (एकूण मतदानाच्या) जास्त मते मिळाली तरच आम्ही सोशॅलिस्टांना दुसऱ्या फेरीत पाठिंबा देऊ, असे त्यांनी जाहीर केले. हे सोशॅलिस्टांना सरळ सरळ वापरून सोडून देणे होते. कारण मागच्याच वर्षी झालेल्या महापौरांच्या निवडणुकांत सोशॅलिस्टांच्य. बळावरच कम्युनिस्टांचे उमेदवार अनेक शहरांचे महापौर झाले होते.

१२ मार्चच्या पहिल्या फेरीत डाव्या आघाडीला खालीलप्रमाणे मते मिळाली.

कम्युनिस्ट २०.६२% सोशॅलिस्ट २२.६१%
MRG 2.1% आणि अति डावे ३.२%
एकूण ४८.५१ टक्के

डाव्यांना मते पडली तर उजव्यांना एकूण ४६.५% मते पडली. (गॉलिस्ट २२.७१%. जेस्कारची UDF 20.73 व. इतर) या आधीच्या नमुन्यादाखलच्या निवडणुकांत सोशॅलिस्टांना नेहमीच २६% मते मिळत *आलेली होती ती एकदम खाली आली.* इतकेच नव्हे तर जो मितेराँ फ्रान्सचा भावी अध्यक्ष व्हायचा त्याचा पक्ष सगळ्यात मोठा सुद्धा ठरू शकला नाही. गॉलिस्टांनी तो मान पटकावला !

एकूण ६३ जागी उमेदवार विजयी घोषित झाले. आणखी ४२८ जणांच्यात १९ मार्चला लढत झाली. १२ मार्चच्या सोमवारी निकाल प्रसिद्ध झाले आणि डाव्यांचा पोटात गोळा आला ! त्यांना जिथे ५२% ची अपेक्षा होती, तिथे केवळ ४८.५% मिळाली. त्यामुळे सहा महिन्यांचे कडवे वैर विसरून त्यांनी तात्काळ एकमेकांना पाठिंबा देण्याचा निश्चय केला. त्यामुळे ७५ कम्युनिस्ट उमेदवारांची निवड जवळपास निश्चित झाली असे त्यांना वाटले. पहिल्या फेरीत मतदानही विक्रमी झाले. (८३% हून जास्त) पण डाव्यांनी लोकांचा विश्वास गमावला होता.

## दुसरी फेरी

दुसऱ्या फेरीबद्दल अतिशय उत्सुकता निर्माण झाली होती. मतदान पहिल्या फेरीहूनही अधिक (८५%) झाले, पण निकाल जाहीर झाले आणि आघाडीची सारी स्वप्ने ढासळली. इतकेच नव्हे तर ज्या दीड कोटींनी त्यांना मते दिली होती त्यांचीही तीव्र निराशा झाली ! कारण यात एकूण ४९१ जागांपैकी २९० जागा सरकारपक्षाला मिळाल्या. डाव्या

आघाडीला केवळ २००. शेवटची परिस्थिती खालीलप्रमाणे

(कंसातील आकडे विसर्जित पार्लमेंट-मधील)

| | |
|---|---|
| गॉलिस्ट | १५३ (१७३) |
| जेस्कार देस्ताँ | १३७ (१९७) |
| | २९० |
| कम्युनिस्ट | ८६ (७४) |
| सोशॅलिस्ट | १०४ (९५) |
| रॅडिकल्स | १० |
| | २०० |

इतर– एक.

१) मितेरॉंचा हा राजकीय अस्तच झाल्यात जमा आहे. २) जेस्कार देस्ताँचा वैयक्तिक विजय. कारण अत्यंत भोंगळ पक्षाला त्याने शिराकलाही शह देऊ शकेल इतक्या ताकदीने उभे केले. विशेषत: १९७६ साली शिराकने त्याला मुदतपूर्व निवडणुका घ्यायचा सल्ला दिला होता तो न मानता आता त्या घेऊन परत आपण बरोबर असल्याचे सिद्ध केले. ३) कम्युनिस्ट आणि सोशॅलिस्टांना फारच मार बसला. आता दोघेही एकमेकांच्या नावाने खडे फोडीत आहेत. ४) पडलेल्या मतांच्या प्रमाणात विजयी उमेदवार नसल्याने पद्धत बदलण्याची मागणी मूळ धरीत आहे. (भारताप्रमाणेच) दुसऱ्या फेरीत सरकार-पक्षांना ५०·५% आणि डाव्यांना ४९·२% मते मिळाली. सरकारपक्षाला १·३% मते अधिक मिळूनही जागा मात्र ९० जास्त मिळाल्या. हेच जर प्रमाणशीर प्रतिनिधित्व असते तर फार तर १० जागा जास्त मिळाल्या असत्या. ५) देस्ताँला जे काही बदल करायचे आहेत, त्याला शिराक विरोध करणार! ६) किमतनियंत्रण सैल करण्याबाबत सोशॅलिस्ट विरोध करणार! पण बाकी करांची पुनर्रचना, किमानवेतनात वाढ वगैरे बिलांना त्यांची मान्यता मिळेल असे दिसते. ७) १९८१ साली अध्यक्षीय निवडणुका आहेत. तिथल्या देस्ताँच्या जागेवर शिराकचा डोळा आहे. तो तशी गडबड करणार; पण सगळ्यात महत्त्वाचा परिणाम म्हणजे युरोकम्युनिझमचे फ्रान्सपुरते स्वप्न तरी विरून गेले आहे.

देस्ताँला डावी आघाडी जिंकली तर मितेरॉंला पंतप्रधान करावे लागले असते. ती फार चमत्कारिक परिस्थिती झाली असती. एक तर ते दोघे राजकीय विरोधक. दुसरे म्हणजे डाव्या आघाडीचे सरकार म्हणजे कम्युनिस्टांचा निम्मा सहभाग राहिला असता. त्यामुळे मार्शायने जर त्याचे प्लॅन्स अमलात आणायचे ठरविले असते तर फ्रान्स आतापर्यंतच्या सगळ्यात जास्त गंभीर परिस्थितीला सामोरा गेला असता. चलनफुगवटा प्रचंड होण्याची भीती होतीच.

## आंतरराष्ट्रीय परिणाम

कार्टरने मध्यंतरी तो फ्रान्सला गेला असताना डाव्यांविरुद्ध मत व्यक्त केल्याने गोंधळ माजला होता. आता अमेरिकेला आनंद होईल अशीच परिस्थिती आहे. पश्चिम जर्मनी आणि इटलीतील सोशल डेमोक्रॅट्स्ना या घटनेने स्वाभाविक आनंद होईल. कारण कम्युनिस्ट हरले. सोविएत रशियाला दोन्ही सारखेच; पण त्यातल्या त्यात युरोकम्युनिझमच्या पुरस्कर्त्यांचा पराभव ही आनंददायक घटना. चीनला नवे सरकार जास्त रशियाविरोधी असल्याने समाधान, तर इस्रायलविषयी सहानुभूती असणाऱ्या सोशॅलिस्टांचा पराभव झाला म्हणून अरब राष्ट्रे आनंदी.

निवडणुकांआधी जेस्कार देस्ताँ डाव्या आणि उजव्या आघाड्यांमधील मध्यममार्गीयांच्या एकजुटीसाठी प्रयत्न करीत होता. म्हणजे सोशॅलिस्ट आणि त्याचा स्वत:चा UDF यांनी एकत्र येऊन सरकार बनवावे अशी कल्पना. आता ती कितपत अंमलात येते हे पहायचे. शिराक हा माणूस आणि त्याचे गॉलिस्ट अनुयायी संभाळणे जेस्कारला जड जाणार आहे. त्यामुळे अति उजवे गॉलिस्ट व अति डावे कम्युनिस्ट यांना वगळून तो फ्रान्सला सौम्यपंथाने पुढे नेऊ इच्छितो. सोशॅलिस्टांना देस्ताँपेक्षा वेगाने सुधारणाही हव्या आहेत आणि सत्ताही हवी आहे. या दोन्ही गोष्टींची सांगड कशी बसणार हे गूढच आहे. सध्या तरी सुन्न झालेले सोशॅलिस्ट परत एकदा कामगारांच्यातील आपले सत्ताकेंद्र पक्के करायच्या मागे आहेत.

चार एप्रिलला नव्या संसदेचे अधिवेशन होईल. जेस्कार देस्ताँ पंतप्रधान कोणाला नेमील हाही लक्षणीय विषय आहे. कारण आधीचा पंतप्रधान रेमंद बार याने UDF चे नेतृत्व करायचे नाकारले होते. नवीन पंतप्रधान आणि शिराक (तो पंतप्रधान न झाल्यास) यांच्या सहकार्यावरच फ्रान्सची पुढची आर्थिक दिशा अवलंबून आहे.

जगातील पुढारलेली औद्योगिक राष्ट्रे भांडवलशाहीची कास सहजासहजी सोडीत नाहीत हे मात्र यावरून स्पष्ट झाले. कारण १९७६ च्या डिसेंबरमध्ये जपान आणि ऑस्ट्रेलियात झालेल्या निवडणुकांमध्येही लोकांनी अल्पकाल डाव्यांना संधी दिल्यानंतर सत्ताधीशांनाच निवडून दिले होते. तोच प्रकार गेली वीस वर्षे फ्रान्सच्या सत्तेवर असणाऱ्या पक्षाच्या बाबतीत घडला आहे. □


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**फिडेल, चे आणि क्रांती**

अरुण साधू । सात रुपये

**आणि ड्रॅगन जागा झाला**

अरुण साधू । चवदा रुपये

**पूर्णिया**

अनिल अवचट । सहा रुपये

# डॉ. संपूर्णानंद पुतळा शुद्धीकरणामागील वस्तुस्थिती

किशोर बेडकिहाळ, सातारा

वाराणसी येथे डॉ. संपूर्णानंद ( उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री व संस्कृतचे एक विद्वान पंडित ) यांच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ केंद्रीय संरक्षणमंत्री जगजीवनराम यांच्या हस्ते झाला. आपल्याकडे तसे पुतळे बरेच बसविले जातात व त्यांचे अनावरण-समारंभही बिनबोभाट पार पडतात; परंतु डॉ. संपूर्णानंद यांच्या पुतळ्याबाबत इथल्या जातीय वर्चस्ववादी शक्तींनी हे अनावरण बिनबोभाट घडू दिले नाही. एका अस्पृश्याचा स्पर्श पुतळ्याला झाल्याने हा पुतळा बाटल्याचे (Polluted) जाहीर करून गंगेच्या पवित्र (?) जलाने तो तथाकथित शुद्ध करण्यात आला. ही घटना अस्वस्थ करणारी तर आहेच; परंतु सबंध राष्ट्राला लाजेने मान खाली घालावयास लावणारी आहे. तसे दलितांवर आपल्याकडे नित्य अन्याय घडतच असतात; पण सत्तेच्या कवचात सुरक्षित असणाऱ्या एका ज्येष्ठ दलित मंत्र्यावरही हा अपमानास्पद प्रसंग यावा ही आपल्या सामाजिक जाणिवेची खरोखरच शोकांतिका होय. भारतीय समाजजीवनात अस्पृश्यता व तिचे आनुषंगिक प्रश्न अजूनही तीव्रपणे शिल्लक आहेत हे तर उघड सत्य आहे; पण याच्या आधारे राज-कारण करणारे पक्ष व तत्सम प्रवृत्ती यामुळे हा प्रश्न अधिकच तीव्र बनत चालला आहे. या पुतळा-शुद्धीकरणाबाबतची जी माहिती आता उजेडात येत आहे ती पाहता हा प्रकार केवळ धार्मिक भावने-तून उद्भवला असेल असे वाटत तर नाहीच; पण राजकीय वैमनस्य, वर्गीय व वर्णीय वर्चस्व सिद्ध करण्यासाठी हा डाव असावा अशी शंका (जबरदस्त) येते. जनसमूहांच्या धार्मिक व मध्ययुगीन श्रद्धेचा आधार घेऊन आपले जातीय व वर्गीय वर्चस्व सिद्ध करण्याच्या सुप्त राजकारणाचा हा दृश्य परिपाक होय. या वर्चस्वाचा प्रहार एका मंत्रिपदावरील दलित व्यक्तीवर, विसाव्या शतकातील सत्तेचे महात्म्य माहीत असूनही होतो, या गोष्टीचा गंभीर विचार करण्याची वेळ आता आली आहे. भारताच्या ग्रामीण भागात या वर्चस्वाचा व त्या आनुषंगिक दहशतीचा प्रत्यय नित्यनियमित येतच असतो, शहरात मात्र या प्रत्ययाचे स्वरूप वेगळे असते.

या पुतळा-शुद्धीकरणाबाबतची वस्तुस्थिती व तिची पार्श्वभूमी स्पष्ट करणारा एक लेख वाराणशीहून निघणाऱ्या 'आज' या वृत्तपत्राचे संपादक विद्याभास्कर यांनी 'ON-LOOKER' या इंग्रजी पाक्षिकाच्या १६-३-७८ च्या अंकात लिहिला आहे. त्यावरून वस्तुस्थितीची पूर्ण कल्पना यावी म्हणून तो वाचकांच्यासाठी मुद्दाम खाली देत आहे–

वाराणसीमध्ये बहादूर जाफरशहा या मोगल सम्राटाच्या स्मृति-प्रीत्यर्थ बहादूर जाफरशहा अकादमी ही संस्था स्थापन झाली होती व ती आजही कार्यरत आहे. डॉ. संपूर्णानंद, डॉ. हुमायून कबीर, हफीज मोहम्मद इब्राहीम इत्यादी ख्यातनाम मंडळी या संस्थेची आश्रयदाती होती. लोकसभेचे माजी सभासद प्रा. राजाराम शास्त्री हे या संस्थेचे अध्यक्ष असून तरुण पत्रकार कासिम रझवी या संस्थेचे चिटणीस आहेत. या संस्थेने दहा वर्षांपूर्वी तिच्या आश्रयदात्यांचे पुतळे त्यांच्या जन्मगावी बसवायचे असा निर्णय घेतला. डॉ. संपूर्णानंद यांचा जन्म वाराणसीचा असल्याने व ते वाराणसीच्या संस्कृत विश्वविद्यालयाचे संस्थापक असल्याने त्यांचा पुतळा वाराणसीत बसवायचा ठरला व त्यानुसार संस्कृत विश्वविद्यालयाच्या मुख्य दरवाजासमोरची खुली जागा संस्थेने महापालिकेकडून मिळविली. संस्थेच्या खास निमंत्रणावरून जगजीवनराम यांनी पुतळ्याच्या अनावरणासाठी येण्याचे मान्य केले. जगजीवनराम यांच्याशी असलेल्या राजकीय वैमनस्याचे प्रदर्शन करण्याची काशीच्या पवित्र तीर्थक्षेत्री अनायास चालून आलेली ही संधी न सोडण्याचे हितसंबंधी गटाने ठरविले असावे. कारण जगजीवनराम पुतळ्याच्या अनावरण-समारंभासाठी येण्याअगोदर संस्कृत विश्वविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी स्वतःच व्यासपीठाचा ताबा घेऊन पुतळ्याचे अनावरण-केले. समारंभासाठी जमलेल्या (की हितसंबंधी गटांनी मुद्दाम जमविलेल्या) समुदायाला, पुतळ्याच्या अनावरणासाठी 'चांभाराची' गरज नाही असे सांगण्यात आले व पुतळ्याचे अनावरण झाल्याचे जाहीर करण्यात आले. हे संपल्यावर पोलिसांनी हस्तक्षेप करून व्यासपीठ पुन्हा पूर्ववत केले. जगजीवनराम प्रत्यक्ष आल्यावर किर-कोळ अडथळ्यांचा अपवाद वगळता समारंभ व्यवस्थित पार पडला. मात्र जगजीवनबाबू परत जात असताना काही गुंड विद्यार्थ्यांनी हातात बूट घेऊन बाबूजींना दाखविले व बूट शिवण्याचा आपला परंपरागत धंदा आहे व आता त्यास लागा असे सुनविले. बाबूजी निघून गेल्यावर विद्यार्थ्यांनी पुतळ्यावर बाटलीतले पाणी ओतले व बाटलेला पुतळा शुद्ध केल्याचे जाहीर केले. अर्थात बाटलीतील पाणी गंगेचेच होते हे सिद्ध झालेले नाही. हा सर्व प्रकार घडत असताना वाराणसी संस्कृत विद्यापीठाचे सध्याचे कुलगुरु व सध्याचे उत्तरे-कडील इंदिरा काँग्रेसचे एक नेते, कमलापती त्रिपाठी यांचे धाकटे बंधू श्री. करुणापति त्रिपाठी आपल्या सहकारी प्राध्यापकांसह ही घटना निमूटपणे ( की स्वस्थपणे ) पाहात बसले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे अडविण्याचा ( Reprimand ) प्रयत्न केला नाही. दुसरी विशेष बाब ही की, स्वतः कमलापति त्रिपाठी या दिवशी वाराणसीतच होते. त्यांना समारंभाला आमंत्रण असूनही ते आले नाहीत. वास्तविक कमलापति त्रिपाठी हे डॉ. संपूर्णानंदांचे विद्यार्थी व पुढे त्यांच्याच मंत्रिमंडळातील एक Pampered मंत्री होते; परंतु साधे उपस्थित राहूनही गुरुऋण फेडण्याची इच्छा त्यांना झाली नाही. उलट फार उशिरा वेळ टळून गेल्यानंतर त्रिपाठी-बंधू यांनी झाल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली. या घटनां-वरून ही बाब केवळ तीव्र धार्मिक भावनेतून घडली हे म्हणणे कठीण आहे. त्रिपाठी-बंधू अत्यंत पुराणमतवादी असून आजतागायत ते जगजीवनरामांच्या स्वागताला (काँग्रेस अखंड असेपर्यंत) जातीने हजर असावयाचे. मात्र या खेपेला यातले काहीच घडले नाही.

त्रिपाठींच्या या पुराणमतवाद्यांचा फायदा त्यांनी अन्य (या) प्रकारे करून घेतला व राजकीय वैमनस्य व शत्रुत्व याच्या प्रदर्शनार्थ हा प्रकार घडविला असण्याची दाट शक्यता आहे.

असे मानण्यास आणखी थोडा पुरावा आहे व तो असा– डॉ. संपूर्णानंद हे संस्कृत भाषा व वाङमयाचे अभ्यासक व चहाते होते. ते स्वतः ब्राह्मणेतर जातीचे; परंतु त्यांच्या भाषाप्रेमाच्या तळमळीसाठी ते स्वतः उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री असताना वाराणसीमध्ये त्यांनी विद्यापीठीय दर्जा असलेले आताचे संस्कृत विश्वविद्यालय काढले. त्या वेळचे उत्तर प्रदेश सरकारचे मुख्य सचिव व संस्कृतचे पंडित 'आदित्यनाथ झा' यांना त्यांनी कुलगुरू केले. एकदोन ब्राह्मणेतर कुलगुरूंच्या कालखंडातील काही अपवाद वगळता या विश्वविद्यालयाचा कारभार सुरळीत चालला होता. पुढे सर्यूपारिन (Saruy Parin) नामक ब्राह्मण कुलगुरूंच्या हाती विद्यापीठ गेल्यावर या संस्थेत सर्व स्तरावरील प्रशासनात (विभागप्रमुख, प्रसिद्धीविभाग, ग्रंथालयविभाग इ.) त्यांनी स्वजातीय लोकांचा भरणा केला. याचा व्हायचा तोच अनिष्ट परिणाम होऊन विद्यापीठ पुढे विशिष्ट जातीच्या व पुढे कुटुंबाच्या ताब्यात गेले. पुढे बहुगुणा मुख्यमंत्री असताना त्यांनी संपूर्णानंदांच्या गौरवार्थ या विद्यापीठाला संपूर्णानंदांचेच नाव दिले. ब्राह्मणजातीची बहुसंख्या असलेल्या विद्यापीठाला ब्राह्मणेतराचे नाव देणे ही घटनाच अस्मितेवर (खरे म्हणजे हितसंबंधी राजकारणावर) घाला घालणारी असल्याने असंतोष वाढला. प्रत्येक अभ्यासवर्गाच्या सुरुवातीला विद्यार्थी विद्यापीठाचे नाव बदला अशी मागणी करू लागले. या सबंध प्रकरणाची सुरुवात येथूनच झाली. कुलगुरूंच्यामुळे ब्राह्मणेतरांना विद्यापीठीय प्रशासनात जवळजवळ प्रवेश बंदच झाला. त्यातून या विद्यापीठातले विद्यार्थी निरनिराळ्या राजकीय पक्षात व पक्षातील अंतर्गत गटात (व्यक्तिनिहाय) विभागले गेल्याने या गटात दररोज क्षुल्लक कारणावरून भांडणे व मारामाऱ्या होतातच. ३ गट काँग्रेसचे (आता बहुधा आय. काँग्रेसचे), ३ गट जनतापक्षाचे आहेत. या विद्यापीठातील प्राध्यापकांचा धंदा विद्यार्थ्यांच्या परस्परविरोधी गटांना चेतवत राहणे हाच असतो. पुतळ्याच्या अनावरणसमारंभदिवशी अशाच एका संतप्त विद्यार्थ्यांच्या गटाने विद्यापीठीय उच्चस्तरीय व्यक्ती व अधिकारी (Authorities) यांच्या पाठिंब्याने व संमतीने जगजीवनबाबूंना 'टारगेट' केले व हा प्रकार घडून आला. अन्यथा कुलगुरू आपल्या सहकाऱ्यांबरोबर हा प्रकार स्वस्थपणे पहात बसणे शक्यच नव्हते.

या सर्व झालेल्या प्रकारावरून ही घटना धार्मिक प्रेरणेतून झाली असे म्हणता येत नाही, तर उलट, गंगेच्या पाण्याचे तथाकथित पावित्र्य, अस्पृश्याचा बाट या कालबाह्य परंतु समाजमान्य रूढींचा व कल्पनांचा आधार घेऊन राजकीय वैमनस्य व त्या अनुषंगाने जातीय व वर्गीय वर्चस्व सिद्ध करण्याचा हा उद्दाम प्रयत्न होता हे स्पष्ट होते. अशा तऱ्हेने राजकारणाच्या सोयीसाठी विद्यापीठाचा वापर करणे ही शिक्षणक्षेत्रातील कीड चव्हाट्यावर आली. ही घटना एकाच वेळी दलितांनी आपल्या पायरीवरच रहावे हे तर सूचित करतेच; परंतु राजकीय वैमनस्यापोटी वर्गवर्चस्वाच्या अहंकारालाही प्रोत्साहन देते व यावर आधारित राजकारण अजूनही शिल्लक आहे याची जाणीव करून देते. उत्तरेत ते जास्त तीव्र आहे. कोणी ते शेतकऱ्याच्या नावे करील तर कोणी धार्मिक आधारावर करील एवढाच फरक. या राजकारणाचा कणा मोडणारे व संपूर्ण क्रांतीचा वसा घेतलेले जनता सरकार आता याबाबत काय करते ते पहायचे. (इंदिरा काँग्रेसचा दलित कळवळ्याचा बुरखा या निमित्ताने फाटलाच आहे.) थोड्याफार फरकाने संपूर्ण भारतातीलच तीव्र होत जाणाऱ्या धार्मिक राजकारणाच्या आव्हानाचा गंभीर विचार करावयास हवा. अन्यथा संपूर्ण क्रांतीऐवजी आपण प्रतिक्रांतिलाच पाठिंबा देऊन जयप्रकाशांना पराभूत करू असे खेदाने म्हणावे लागेल. □

# कामगारांच्या देशातील कामगार

माणिक खेर, पुणे

कार्ल मार्क्सचं लिखाण वाचताना नेहमी मनात यायचं, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमुळे कामगारांवर होणाऱ्या गंभीर परिणामांवर मार्क्सने कोरडे ओढले आहेत तर प्रत्यक्षात साम्यवादी देशातल्या कामगाराची काय अवस्था असेल? भांडवलदारांच्या जगात, आजच्या यांत्रिक युगात माणूस हा एक यंत्र बनला आहे. आपल्या कामापासून तो मनानं खूपच दूर चाललाय्, ह्या सर्व विचारातील कडवेपण, मान्य केले तरी ह्यात कितपत तथ्य आहे, साम्यवादी देशांमधला कामगार खरोखरच मनापासून जीव ओतून काम करतो का, असं वाटायचं; पण तेथील कामगारांच्या जीवनावर प्रकाश टाकणारं फारसं काही उपलब्ध नसल्यामुळं तो प्रश्न तसाच मनात रेंगाळत राहिला.

आणि अलीकडेच 'A worker in a workers state' हे मिकलॉस हॅरास्ती या हंगेरियन क्रांतिकारकाचं पुस्तक हातात पडलं. मिकलॉस हॅरास्ती हा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या पिढीचा प्रतिनिधी. साम्यवादाचा जबरदस्त प्रभाव असलेली ही पिढी पूर्व युरोपातील हुकुमशाहीविरुद्ध खवळल्यास नवल नाही.

हॅरास्तीच्या ह्या लिखाणाचा सुगावा लागताच त्याच्या टंकलिखितत प्रती जप्त करण्यात आल्या व त्याच्यावर खटला भरला गेला. हे पुस्तक खळबळजनक व कामगारांना चिथावणारे असल्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आणि त्याला दंड व कारावासही भोगावा लागला.

सोव्हिएट ब्लॉकमधले देश भांडवलशाही नाहीत हे उघड असले तरी ते समाजवादी आहेत असेही म्हणता येणार नाही. कारण

तिथे मोकळे, भयमुक्त वातावरण आणि कामगारांची सत्ता मुळीच नाही.

'कामाप्रमाणे दाम' (Payment by Results) हा कामगारांच्या जीवनाचा केंद्रबिंदू, ठराविक वेळात तुम्ही किती काम करायचे, कामाचा प्रत्येक तुकडा किती वेळात करावयाचा आणि प्रत्येक तुकड्यामागे तुम्हाला किती पैसे मिळणार (Piece-Rate) हे आधी ठरलेले असते. ह्या पद्धतीने वेतनाची आकडेमोड व उत्पन्नाचा अंदाज करणे हे प्रत्यक्ष कामापेक्षाही अवघड.

निरनिराळ्या तऱ्हेचे काम ०.२, ०.३, ०.४ अशा गटात विभागले जाते. ही विभागणी म्हणजे दुसरे काही नसून प्रत्येक तुकड्याला लागणाऱ्या वेळाकडे दुर्लक्ष करून ठराविक कामात प्रत्येक मिनिटामागे तुम्ही किती पैसे मिळवू शकाल ह्याचा दर. उदाहरणार्थ, *०.३ ह्या गटात तुम्ही दर मिनिटाला* १२ पैसे मिळवू शकता. तक्त्याप्रमाणे ह्या गटातील कामाच्या प्रत्येक तुकड्याचा दर ४० पैसे असला तरी प्रत्येक तुकडा निर्माण करायला तीन मिनिटं लागत असल्यामुळे तुम्ही तुकड्यामागे ३६ पैसे मिळवू शकता. म्हणजे प्रत्यक्षात तुकड्यामागे ४० पैसे कधीच मिळवू शकत नाही !

कामाप्रमाणे दाम व ताशी दराने केलेले काम ह्यात एवढाच फरक, की तासाच्या दरात तुमचं उत्पन्न ठराविक असतं तर पहिल्या पद्धतीत ते तुमच्या उत्पन्नावर अवलंबून असतं असं आपल्याला वाटतं; पण खोलात जाऊन पाहिल्यास कामाप्रमाणे दाम ह्या पद्धतीत तुम्हाला एक तुकडा तयार करण्यासाठी किती वेळ लागतो ? तेवढ्या वेळातल्या प्रत्येक मिनिटाच्या दराने पैसे मिळतात हे लक्षात येईल. समजा तुम्ही तक्त्यातल्या वेगाप्रमाणे काम केलं, तरी तक्त्याप्रमाणे पैसे कधीच मिळवू शकणार नाही. कामाप्रमाणे दाम हे असं एक मृगजळ आहे. व कामगाराचं आयुष्य ह्या मृगजळामागे *धावण्यात जातं !*

नोकरीच्या सुरुवातीला सर्वांना सुरक्षिततेच्या नियमाची एक प्रत दिली जाते.

त्यावर फोरमन आणि कामगार दोघेही सही करतात. समजा, चुकून अपघात झालाच तर कामगाराला सुरक्षिततेचे सर्व उपाय माहीत असूनही त्याच्या चुकीमुळे अपघात झाला व त्याला कंपनी जबाबदार नाही असा त्याचा अर्थ !

कामाप्रमाणे दाम ह्या पद्धतीत प्रत्येकजण जास्तीत जास्त पैसे कसे मिळवता येतील ह्या एकाच विचाराने ग्रासलेला असल्यामुळे सहाजिकच कामाच्या गुणवत्तेकडे त्याचे दुर्लक्ष होते. असुरक्षितता– पैशाची व जिवाचीही– अशा तऱ्हेने काम करण्यामागची मुख्य प्रेरणा (!) बनते.

अनिश्चितता ही काम करून घेणारी जादूची कांडी आहे. ताशी कामाच्या दराने काम करणारा कामगार, त्याला आपण फसवलो गेलो आहोत असे वाटल्यास तो काम करणार नाही. कामाप्रमाणे दाम ह्या पद्धतीत कामगाराला आपण फसतोय् ह्याची पूर्ण जाणीव असते; पण तो जास्तीत जास्त पैसे मिळवण्याच्या ध्यासात गुंतल्यामुळे ह्या फसवणुकीकडे त्याचे दुर्लक्ष होते.

वरवर पहाता व्यवस्थापक आपण कामगारांचाच एक भाग आहोत असे भासवीत असले तरी तो एक आव आहे हे प्रत्येक कामगाराच्या मनात ठसलेले असते. 'आपण उत्पादनाचे अमुक अमुक उद्दिष्ट पूर्ण केले पाहिजे' असे जेव्हा संचालक सांगतो तेव्हा त्यातला 'आपण' किंवा 'आम्ही' हा त्याने कामगाराच्या शंकेला दिलेल्या उत्तरातल्या 'आम्ही' पेक्षा निराळा असतो !

व्यवस्थापक व त्या गटातले सर्व लोक *(त्यात ऑफिसमधले कारकूनही आलेच)* कसाही वेळ घालवतांत त्यांच्या कामाबद्दल कोणी चकार शब्दही काढत नाही किंवा त्यांना जाबही विचारीत नाही. त्यांच्या परिषदा आणि चर्चासत्रे ह्यात प्रत्यक्षात काय चालते त्याचे मोजमाप करायला काहीच साधन उपलब्ध नाही. फोरमनच्या हातात कामगारांच्या नाड्या असतात. कामाचे वाटप, ओव्हरटाइम, बोनस, रजा सर्व तोच ठरवतो. खरोखरच आयुष्यात दोन गोष्टी निवडू शकत नाहीत. आई आणि बॉस !

फोरमन आणि युनियनच्या पुढाऱ्याचे आतल्या आत संगनमत जुळलेले असल्यामुळे पुढारी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे फारसे काम करीत नाहीत. उलट 'तुम्ही जास्त काम केलंत तरच तुम्हाला जास्त पैसे मिळतील असं ठणकवायलाही ते मागेपुढे पहात नाहीत! व्यवस्थापनाची युनियनशिवाय काडी हलत नाही असा जरी प्रचार होत असला तरी ती नावापुरतीच असते. त्यामुळे कामगारांना युनियन ही 'विकतचा शत्रू' वाटते !

पूर्व युरोपियन देशातील कामगारांच्या व्यवस्थापनातील सहभागाबद्दल आपण बरंच वाचतो; परंतु हॅरास्तीच्या पुस्तकात ह्याचं निराशाजनक चित्र पहायला मिळतं. सर्वसाधारण कामगारांमध्ये व्यवस्थापन व युनियनच्या कराराबद्दल 'आपल्याला काय करायचंय्' अशी बेपर्वाई आढळते. कराराची प्रत फोरमनच्या परवानगीशिवाय पहायला मिळत नाही व बऱ्याच खटाटोपानंतर ती मिळालीच तरी त्यातल्या अतिशय किचकट, अगम्य शब्दांच्या व कायद्याच्या गुंतागुंतीमुळे सर्व मजकूर डोक्यावरून जातो ! सहाजिकच करार हा फक्त 'त्यांच्यासाठी' असतो !

कामगारांचा व्यवस्थापकांशी व संचालकांशी प्रत्यक्ष संबंध कधीच येत नसल्यामुळे त्यांची ओळख कारखान्याच्या पत्रिकेतून होते. पुष्कळांना आपल्या विभागप्रमुखाचं नावही माहीत नसतं. विभागप्रमुखाचं दर्शन जेव्हा परदेशी पाहुणे कारखान्यात येतात तेव्हाच होतं. *प्रत्येकजण त्या वेळेस आपण* किती चांगले आहोत हे दाखविण्याचा कसोशीने प्रयत्न करतो. पाहुण्यांचा लवाजमा गेला की, कोणती व्यक्ती कोण ह्याची चर्चा सुरू होते. एवढ्यात फोरमन परत एकदा कामावर देखरेख करण्यासाठी चक्कर मारतो आणि नित्याचं चक्र सुरू होतं...

कामगारांच्या देशातला असा हा कामगार. त्याच्या भावना आणि आकांक्षांना तिलांजली देऊनच त्याला कामाची सुरुवात करावी लागते. मशीनपेक्षाही खालच्या दर्जाची वागणूक त्याला मिळते. हे सर्व फारच धक्कादायक आहे. विश्वास न बसण्याजोगे; पण एका कामगारानेच हे लिहिलेलं असल्यामुळे ही सद्यःस्थिती आहे हे मनाला पटवून द्यावं लागतं ! □

मोफत ! मोफत !! मोफत !!!

## पांढरे डाग

नीलकमल बुटीने ३० वर्षांपासून पांढऱ्या डागाच्या रोग्यांना पूर्णपणे लाभ देऊन जगात प्रसिद्धी मिळविली आहे. आपणही एक लावायचे पॅकेट मोफत मागवून लाभ प्राप्त करा. केवळ १ महिन्यातच पूर्णपणे फायदा.

जवाहर चिकित्सा केंद्र
पो. कतरीसराय (गया)

# विकसित व्यक्तिमत्वाचे प्रतीक पु. शि. रेगे यांची 'सावित्री'

पु. शि. रेगे दिवंगत झाल्याची बातमी वाचली. त्यांचं पुण्यस्मरण त्यांच्याच एखाद्या लेखनाच्या वाचनानं होईल असं वाटलं म्हणून त्यांची 'सावित्री' ही कादंबरी हातात घेतली आणि एकदाही खाली न ठेवता वाचून काढली. खरोखर ही कादंबरीच तशी आहे.

ही कादंबरी म्हणजे सावित्रीने 'त्यांना' लिहिलेली सुंदर मुलायम पत्रं आहेत. पत्रांतूनच दोघांची हृदये एकमेकात गुंफली जातात. सावित्री ही एका तत्त्वचिंतकाची मुलगी. तेही पोस्टग्रॅज्युएट होऊन भीसीसच्या कामात गुंतलेले. बंगलूरच्या कॉलेजात ती पहिल्या वर्षाला आणि ते पोस्टग्रॅज्युएट स्टुडंट. नंतर ती तिच्या गावी कुर्ग प्रदेशातील तिरुपेटला येते आणि पत्रव्यवहार सुरू होतो. नंतर तिच्या आमंत्रणावरून ते एकदा तिच्या गावी येतात. काही दिवस राहून परत बंगलूरला जातात. त्यानंतर मात्र ते लंडनला त्यांच्या पुढच्या अभ्यासासाठी जातात आणि ती वडिलांबरोबर जपानला. पत्रव्यवहार चालूच रहातो. कित्येक दिवस दोघांमध्ये सादप्रतिसादाची भाषाच उमटत नाही. मनातलं मनातच रहातं. अव्यक्त रहातं; पण शेवटी मात्र सादाला प्रतिसाद मिळतो आणि शेवट गोड होतो. इतकी ही सरळ, साधी छोटी कथा; पण किती हळुवार! फुलपाखरू फुलावरून उडालं तरी परागाचे कण त्याच्या पायाला चिकटतातच. तितक्याच हळुवारपणे ही कथा. त्यातली सावित्री मनात रेंगाळत रहाते.

सावित्री ही अतिशय प्रभावी व्यक्तिरेखा. तिचं मन पाकळ्यांसारखं मृदु, संवेदनाशील. 'ते' येणार म्हणून व्याकुळतेनं वाट पहाणारं, येणं रद्द झाल्यामुळे पाकळ्यांसारखंच कोमेजणारं; पण हा आनंद, ते दुःख दोन्ही संयमानंच व्यक्त करणारं समतोल मन. अतिहळवेपणा कुठेही नाही. ही संवेदनशीलता फक्त 'त्यांच्या'च बाबतीत दिसते असं नाही. त्योरे नावाची तिची जपानला भेटलेली मैत्रिण परत स्वीडनला जाते तेव्हा ती लिहिते, 'त्योरे कालच गेली. मलाही आता इथं राहू नयेसं वाटू लागलं आहे.' जपानमधील आनंद मिशनचे व्यवस्थापक नामुरा यांच्याबद्दल ती म्हणते, 'अलीकडे ते खिन्नच असतात. त्यांच्याकडे पाहिलं की काही तरी चुकलं आहे, अधिकाधिक चुकत जाणार आहे असं वाटू लागतं.' क्षणोक्षणी स्वतःला विसरण्याचा प्रयत्न सावित्री करीत असते. इतकी संवेदनाशील असूनसुद्धा ती हळवी नसल्यामुळे सतत आनंदी आहे. तिच्या वडिलांनी तिला आनंदभाविनी असंच सार्थ नाव ठेवलं आहे.

सावित्रीच्या मनाला विचारांची वेगळीच प्रगल्भता लाभली आहे. तिचे स्वतःचे असे काही निश्चित विचार आहेत. ती मोठ्या तत्त्वचिंतकाची मुलगी असली किंवा एका अभ्यासू संशोधकाची प्रेयसी असली तरी दोघांच्याही व्यक्तिमत्त्वाचा पगडा तिच्या विचारांवर दिसत नाही. तिचे विचार स्वतंत्र आहेत. तिने 'त्यांना' आपलंसं करून घेतलं आहे, तिला त्यांचंसं करून घेतलं आहे, तरीसुद्धा ती व्यक्ती म्हणून वेगळी आहेच. त्यांच्यातही लोप पावलेली नाही आणि वडिलांतही नाही. एखादी कलाकृती अल्पजीवी आहे हे माहीत असलं तरी सुद्धा कलाकार तीत जीव ओतून ती पूर्ण का करतो? यावर सावित्रीचं म्हणणं असं की, 'करणारा ही माझी दुर्गा आहे, हा माझा राम आहे, ही माझी सीता आहे, हा माझा गणेश आहे या भावनेनं काम करतो.' सावित्रीला नेहमी सुजनच कसे भेटतात? ह्या 'त्यांच्या' प्रश्नाचा ऊहापोह करता करता ती सहज लिहून जाते, 'ज्याला वास्तव अर्थानं आपण सुख म्हणतो त्यानं नेहमीच काही माणूस सुखी होतो असं नाही; पण दुःखाच्या पलीकडचं जसं एक सुख असतं तसं सुखाच्याही पलीकडचं एक सुख असतं. सुखाच्या पलीकडच्या सुखात सुख आणि दुःख दोन्ही सामावून घेतलेली असतात.' गत आयुष्याचा जाता जाता आढावा घेताना ती म्हणते, 'सगळंच बदलत असतं; पण त्यातून जी जाणीव प्रगत असते तिला माझ्या दृष्टीने अधिक महत्त्व.'

तिचे स्वतंत्र विचार निर्भीडपणे व्यक्त करण्याची ताकदही तिच्यात आहे. तिची 'त्यांच्या'बद्दलची भावना कुठेही अतिरंजित न करता अतिशय वेचक शब्दांत पण अतिशय निःसंकोचपणे ती लिहिते, 'मी काय लिहिलं म्हणजे तुम्हाला बरं वाटेल? प्रेम, प्रीती, अनुराग यांच्यासारख्या शब्दांची मला अपूर्वाई वाटत नाही. एकेकदा मला वाटतं की, स्वतःला कुठं तरी स्थिर करण्यासाठी ही केवळ निशाणी म्हणून वापरतो. त्यांचा रंग केव्हाच विटलेला असतो. तुमच्याबद्दल मला एक आकर्षण वाटतं.' — सावित्री मनाने हळुवार असली तरी स्वप्नाळू नाही. प्रीती, प्रेम यांच्यासारख्या मोघम शब्दांत रंगून जाणारी नाही. प्रत्येक भावनेचा, कृतीचा, शब्दांचा नेमका आणि वास्तव अर्थ बांधण्याची जिज्ञासू वृत्ती तिच्यात आहे.

स्वतःला पटलेल्या गोष्टी निर्भयपणे ती आचरणात आणते. जन्मल्याबरोबरच मातापित्यांना मुकलेल्या अर्भकाला स्वतःबरोबर हिंदुस्थानात आणायला आणि स्वतःची मुलगी म्हणून सांभाळायला ती कचरत नाही. माणुसकीचे कर्तव्य बजावताना समाजाला किंवा 'त्यांना' काय वाटेल म्हणून मागे हटत नाही. हे धाडस खरोखरच लाखात एखादीचे असेल. संसारी स्त्रीसुद्धा अनाथ मुलाचा सांभाळ करायला मागेपुढे पाहील; पण सावित्री कुमारिका असूनसुद्धा बीनाला स्वतःची मुलगी म्हणून सांभाळते.

दुसऱ्याच्या स्वभावाचे मूल्यमापन ती अतिशय समतोलपणे करते आणि तितक्याच अस्वस्थपणे स्वतःच्या गुणदोषांकडे, स्वभावाकडे पाहून विश्लेषण करू शकते. तिने 'त्यांचे' केलेले मूल्यमापन असे— 'तुमचे मन कसं गूढ जलाशयासारखं. त्यात आकाशाचे

बदलते रंग दिसत असले तरी त्याचे स्वतःचे रंग वेगळेच असतात. एखादा ओळखीचा वाटण्यापूर्वीच अनोळखी होऊन बसतो, दुसऱ्याला सहज उठाव देतो...तुमचा साधेपणा; किंचित ओशाळा स्वभाव, दुसऱ्याशी वागताना किंवहुना दुसऱ्याविषयी विचार करतानाही उठून दिसणारी ऋजू न्यायबुद्धी, मागचं-पुढचं सहज सांधून त्यांना एक नवं आपलं रूप द्यायची हातोटी-हे सर्व आता माझं झालं आहे. 'त्यांच्या गुणांबरोबरच त्यांच्या ओशाळ्या स्वभावाचाही उल्लेख ती तितक्याच मोकळेपणाने करते. स्वतःबद्दल ती लिहिते,' तुमच्या माझ्याबद्दलच्या काय काय कल्पना आहेत कोण जाणे. 'मी तुम्हाला वाटते तितकी व्यवस्थित नाही. स्वभावानं थोडी थंड आणि सहजासहजी न गांगरणारी म्हणून कदाचित तुमचा तसा समज झाला असावा.' 'मला सुजन लाभतात ते अंशतः माझ्या भाग्यानं; पण अंशतः माझ्या मनाच्या समजुतीनं. मी कशाचाही अव्हेर करीत नाही आणि शेवटी जे घेते ते आपलेसं करून घेते. सुजन, दुर्जन आपण आपले आपणच असतो.' इतक्या त्रयस्थपणे स्वतःच्या स्वभावाचं परीक्षण करू शकणारा, स्वतःच्या जडणघडणीचा कार्यकारणभाव पडताळून पाहू शकणारा निश्चितच व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या मार्गावर असतो.

जगात घडणाऱ्या घटना, त्यावर स्वतःचे विचार, इतरांचे विचार, त्यांचे मानवी स्वभावांवर होणारे परिणाम या सर्वांची ती अतिशय चोकसपणे दखल घेते. व्यक्तीवरून समाजाच्या विचारापर्यंत सहज जाऊ शकते. जागतिक युद्धाचा वणवा पेटलेला असताना आणि दोघेही युद्धात भाग घेतलेल्या वेगवेगळ्या देशांमध्ये असताना ती लिहिते, 'तुमची काळजी वाटते. मला असं वाटतं, सगळ्यांचीच सगळ्यांनी काळजी करायला हवी आहे.' आत्मप्रौढीशिवाय असणारा आत्मविकास तिचे व्यक्तिमत्त्व अधिकच खुलवितो. तिने बसविलेला बॅले, एजवर्थच्या घराचं सुंदर कलागृहात केलेलं रूपांतर ह्या सर्व गोष्टी तिची कृतिशीलता दाखवितात.

अशी ही संवेदनाशील, कलाप्रेमी, मनस्वी, बुद्धिमान, सोज्ज्वल आणि लाघवी सावित्री, म्हणजे स्त्रीच्या विकसित झालेल्या व्यक्तिमत्त्वाचं एक प्रतीकच वाटतं. ही सावित्री खूप खूप आवडून जाते. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा मनावर खोल उमटवून जाते. खरोखर तारुण्यात पदार्पण करणाऱ्या प्रत्येकीने हे व्यक्तिमत्त्व अभ्यासावं. 'तारुण्यात पदार्पण करणाऱ्या' असं अशासाठी म्हटलं की तोच काळ जगाचं भान येण्याचा असतो; विचार करण्याची शक्ती येण्याचा आणि स्वतःच्या शक्तींचा विकास करण्याचा असतो. अशा वेळी हे प्रगल्भ विचारांचं, विचारांना साजेशा कृतीचं व्यक्तिमत्त्व डोळ्यात भरावं, मनात ठसावं.

या कादंबरीला एक विशिष्ट उंची लाभण्यामागे लेखकाचा वाटा फारच मोठा. सगळं श्रेय त्यांच्याकडे. सावित्रीच्या मनाच्या सूक्ष्म कंपनांना शब्दांकित करणारी रेग्यांची भाषाशैलीही वेगळीच. थोड्या शब्दात खूप काही सांगून जाणारी. बुधवारी 'ते' यायचे म्हणून आतुरतेने वाट पहाणारी सावित्री सहज लिहून जाते, 'आज सोमवार, उद्या मंगळवार, परवा बुधवार!' तिची व्याकुळता किती वेचक शब्दात पण मोठ्या आशयाने व्यक्त झाली आहे! रेग्यांची ही अशी छोटी छोटी क्वचित तुटक वाटणारी वाक्यं आहेत. भाषाही बहुतांशी सांकेतिकच, पण छोट्याशा जलाशयात आभाळ दिसावं तसं सगळं मन त्यांच्या दोन शब्दांत प्रतिबिंबित होऊ शकतं. 'अल्पाक्षरी बहुवत' हा लेखनकलेतला निकषाचा गुण इथे पदोपदी प्रत्ययाला येतो.

अप्पा, एजवर्थ, प्रो. जोशी, प्रो. गुरुपादस्वामी, त्योरे, बीना, नामुरा ह्या कादंबरीतील इतर व्यक्तिरेखा. त्या अतिशय स्पष्टपणे आणि सहजपणे कादंबरीत उतरल्या आहेत. फुलामध्ये पराग जसे उपरे वाटत नाहीत तशाच या व्यक्तिरेखाही त्या दोघांच्या पत्रव्यवहारात अलगद सामावल्या आहेत. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व त्याच्या विचारात आणि कृतीत प्रतिबिंबित होत असतं, ह्या गोष्टीचं भान ह्या सगळ्यांचं व्यक्तिरेखाटन करताना लेखकानं ठेवलं आहे. कादंबरीत सगळ्याच व्यक्तिरेखा रेखाटताना बाह्यांग गौण ठरवून विचार आणि कृतीतून त्या फुलविल्या आहेत.

कलाकृतीनं समाजाला काही द्यावं की नाही हा प्रश्न जरी बाजूला ठेवला तरी समाजाला काही तरी देणारी कलाकृती अमर ठरते. ही कादंबरी समाजातील प्रत्येक पिढीतील व्यक्तीला काही तरी देऊन जाते. तरुण पिढीच्या मनात जसं सावित्रीचं स्वतंत्र पण स्वैर नसलेलं व्यक्तिमत्त्व रुजवून जाते, तसंच पालकांच्या पिढीलाही एक नवा विचार देऊन जाते. सवित्रीने आपल्या विचारशक्तीचा, कलाप्रेमाचा वारसा आपल्या वडिलांकडून घेतला आहे. हे कलाप्रेम, ही जागरूकता, ही ज्ञानाबद्दलची जिज्ञासा, स्वतंत्र विचार करण्याची शक्ती, आपल्यात उतरायला हवी असेल तर पालकांनी हे सर्व आधी आपल्यात आणलं पाहिजे.

सावित्रीचे विचार, *अप्पा आणि एजवर्थ* यांमधील चर्चा, त्यावर सावित्रीचे विचार, युद्धाच्या घटनेवरचे सर्वांचे विचार यांच्या निमित्ताने फार सुंदर विचार लेखकाने कादंबरीत मांडले आहेत. 'नवीन वस्तूचा किंवा प्रसंगाचा आपण 'अनुभव' घेतो- म्हणजे मागून पुढे जात असतो. घेतलेला अनुभव म्हणजे सध्याच्या स्थितीतून मागे जाऊन स्मरणाच्या सहाय्यानं काढलेला आलेख. दोन्ही प्रकारांत वर्तमान अस्तित्व लक्षातच घेतलं जात नाही.' हे आणि असे अनेक सुंदर विचार.

छोट्या लच्छीला मोर हवा असतो; पण त्याला जवळ बाळगायचं तर त्याला द्यायला दाणागोटा सुद्धा नसतो. मोर म्हणतो मी रोज येत जाईन; पण मी आल्यावर माझ्याबरोबर लच्छानं नाचलं पाहिजे! लच्छी कबूल होते आणि रोज मोर येत रहातो. रोज लच्छी आनंदी राहू लागते. हवा असलेला मोर तिला असा प्राप्त होतो. एक सुंदर तत्त्वज्ञान या राजम्माने सावित्रीला सांगितलेल्या गोष्टीतून लेखकानं मांडलं आहे. 'मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं ते ते आपणच मोर व्हायचं.' कादंबरीच्या शेवटी ह्या गोष्टीचा संदर्भ अतिशय नाजुक रीतीने आणि सहजपणे घेतला आहे. ह्या गोष्टीवरील नृत्यनाट्यात सावित्रीने 'त्यांना' 'मोराचे' काम दिले आहे. मोर ही हवीशी गोष्ट. 'ते' लंडनहून परत यायचा निर्णय तिच्या पत्रावरून तातडीने घेतात. मोर तिला मिळालेला असतो.

☐

# आमचे ग्रंथालय

## विसाव्या शतकातील काही सर्वोत्तम लेखक

# आंद्रे मालरॉ

अर्नेस्ट हेमिंग्वेविषयी मी एकदा लिहिले होते की, त्याचे साहित्य आणि तो हे जणू एकमेकांचे प्रतिबिंबच. त्यात जुळ्या भावांसारखे साम्य. आंद्रे मालरॉ या फ्रेंच लेखकाबद्दलसुद्धा हेच म्हणता येईल. आंद्रे मालरॉ यांचे विचार व कर्तृत्व यात कोणतीच दरी नव्हती. लेखकाने कर्तृत्वाने आपल्या साहित्यिक तत्त्वाला उचलून धरले पाहिजे असे तो नेहमी म्हणे. त्याप्रमाणे तो करूनही दाखवीत असे. स्पेनमधील यादवी युद्धामध्ये या लेखकाने लढाऊ वैमानिकाची भूमिका घेतली होती ! वयाच्या ७२ व्या वर्षी त्याने बांगलादेशामध्ये पाकिस्तानविरुद्ध लढण्याची तयारी दाखविली होती ! मृत्यूला माणूस सामोरा गेला नाही, त्याने जर धोका पत्करला नाही, तर तो स्वाभिमानाने जगूच शकत नाही, असे तो नेहमी म्हणत असे. (काही लोकांच्या बाबतीत 'मला भीती वाटणारच नाही हीच मोठी भीती असते ! या लोकांची गोष्ट वेगळी. हे लोक खरोखर भित्रे नसतात. भित्रेपणाचा आव मात्र आणतात. ही भीती युद्धोत्तर साहित्यिकांनी निर्माण केलेल्या पात्रांसारखी आहे. उदा. सॅम्युअल बॅकेटची पात्रे.)

दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनात जी पोकळी निर्माण झाली (युरोपमध्ये) तिने एका विचित्र प्रकारच्या साहित्याला जन्म दिला. याला absurd साहित्य म्हणतात. ज्या महाभयानक पोकळीतून ते निर्माण झाले तीच पोकळी या साहित्याचा गाभा बनली. या absurd साहित्यिकांमध्ये मोठमोठी नावे आहेत. कामू, पिंटर, पिरांडेलॉ, रॉबे ग्रीलें, आयोनेस्को, सार्त्र वगैरे. या ॲब्सर्ड साहित्याचा फारसा स्पर्श आंद्रे मालरॉला झाला नाही.

सॅम्युअल बॅकेटची भयाण शून्यता मालरॉला जाणवली नाही असे नाही. मालरॉची पात्रे ही परिस्थितीशी नेहमी झगडत असतात. परिस्थिती प्रतिकूल आहे हे जाणून झगडत असतात. जणू झगडण्यातच माणसाचा स्वाभिमान सामावलेला आहे. प्रयत्न करणे हेच अंतिम उद्दिष्ट आहे. यशाला गाठणे हे नाही, तर सॅम्युअल बॅकेटची पात्रे भयाण शून्यतेमुळे जणू संमोहित होतात ! प्रयत्न केल्यानेही काही पदरी पडणार नाही हे हेरून असतात. या जाणिवेने ती petrify झालेली असतात, obsessed होतात !

जिथे जिथे अन्याय होत असे, जिथे जिथे मानवी मूल्ये पायदळी तुडविली जात असत तिथे तिथे आंद्रे मालरॉ आवाज उठवीत असे. या असल्या व्यक्तीला द गॉलने फ्रान्सचा मिनिस्टर ऑफ कल्चर केले होते. मानवाचा मानवांनी केलेल्या छळाविरुद्ध नेहमी उठणारा हा आवाज मृत्यूच्या आधी दोनदा बंद पडला होता. फ्रान्सने अल्जेरियामध्ये जे अत्याचार केले त्या वेळेला. जेव्हा नेमके मोठ्या आवाजाने बोलायचे होते, त्याच वेळेला हा आवाज बंद होता. या माणसाची द गॉलवर भलतीच निष्ठा होती. इतकी की, तत्त्वनिष्ठेशी या माणसाने फारकत घेऊन व्यक्तिनिष्ठेशी लग्न लावले. १९६८ मध्ये जेव्हा फ्रान्समध्ये विद्यार्थीबंडाचे फूत्कार ऐकू येऊ लागले तेव्हासुद्धा मालरॉचे तोंड उघडले नाही हे चुकले. त्याची प्रतिमा थोडीशी डागळली; पण एक-दोनदा चुकले म्हणजे मनुष्याचा मोठेपणा का कमी होतो ?

मालरॉ द गॉलशी एकनिष्ठ राहिला; पण पॅब्लो पिकासोबरोबर त्याची नेहमीच खडाजंगी होई. दोघांचा अहं अगदी उत्तुंग शिखरावर होता. त्या दोघांपैकी एकही लवमात्र खाली यायला तयार नव्हता. मालरॉनी स्पॅनिश यादवी युद्धात विधायक कार्य केले होते. १९२५–१९२७ मध्ये त्यांनी चीनच्या यादवी युद्धातही भाग घेतला होता, तर पिकासोंनी स्पेन यादवी युद्धाच्या पार्श्वभूमीवर ग्वेर्निका नावाचे चित्र काढून जगाला थक्क करून सोडले होते. ग्वेर्निका हें उत्तर स्पेनमधले एक शहर आहे. १९३७ मध्ये जर्मन लोकांनी हे शहर बेचिराख करून टाकले होते. युद्धाची भीषणता, युद्धाचे वैफल्य पिकासोंच्या क्यूबिस्ट पद्धतीने यांत चित्रित केले आहे.

आंद्रे मालरॉ हा बंडखोर होता, मानवतावादी होता, कादंबरीकार होता, राजकारणी होता, वैमानिक होता, कलेचा इतिहासकार होता, उत्खननशास्त्रात प्रवीण होता. हे सर्व काही तो होता; पण तो द गॉलचा चमचा होता. माणसाने सर्व काही व्हावे; पण चमचा कधीच होऊ नये ! एकदा तर द गॉलने एक गुप्त पत्रक काढलें होते. त्यात सर्वांना सूचना दिल्या होत्या की, जर यदाकदाचित द गॉलची व पॉंपिडूची राजकीय हत्या झाली तर आंद्रे मालरॉला फ्रान्सचा अध्यक्ष करावे !

आंद्रे मालरॉची आशिया खंडावर फार प्रीती होती. अन्यायाशी झगडताना याच भूमीवर आपला हिंसात्मक अंत व्हावा अशी त्याची इच्छा होती. म्हणूनच त्याने इंदिरा गांधींना पत्र लिहिले की, १५० ऑफिसर्ससकट बांगलादेशामध्ये एक गोरिला स्कूल उघडण्याची परवानगी त्याला द्यावी. इतर कुणा तरी माणसाने मालरॉला द गॉलचा चमचा म्हटलेले माझ्या तरी ऐकिवात नाही. बऱ्याच लोकांनी मात्र त्याला द गॉलचा 'थिंक-टॅंक' म्हटले होते.

चिनी व स्पॅनिश यादवी युद्धात मालरॉला बराच अनुभव मिळाला व या अनुभवाची परिणती दोन कादंबऱ्यांत झाली. त्यांची नावे आहेत Man's Fate व Man's Hope. त्यांनी एक Psychology of Art नावाचे पुस्तकही लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी 'सौंदर्यशास्त्र' एक वेगळ्याच दृष्टिकोनातून मांडले आहे. राभापांनी ते वाचले असेलच !

आंद्रे मालरॉ हा असा एक दुर्मिळ पाश्चात्य लेखक होता की, राष्ट्राच्या शक्तीमुळे किंवा संपत्तीमुळे तो भारावून जात नसे. सुधारलेल्या पाश्चात्य देशांना येणारी अवकळा त्याने आधीच भाकीत केली होती. या अवकळेचा संसर्ग पौर्वात्य देशांनाही लागेल असे तो म्हणतो.

आंद्रे मालरॉ प्रकाशझोतात आला तो त्याच्या 'Storm Over Shanghai' या पुस्तकामुळे. (स्टेटसमध्ये याच पुस्तकाचे नाव Man's Fate असे आहे. या पुस्तकाला गॉंकूर पारितोषिक मिळाले होते. स्टेटसमध्ये

पुस्तकाची नावे का बदलून टाकतात ते कळत नाही. अल्बॅर कामूच्या 'द आउट साइडर' या पुस्तकाचेही नाव तिकडे 'द स्ट्रेंजर' असे आहे.) उत्कृष्ट कलाकृतीमध्ये तंत्र कधीच महत्त्वाचे नसते. तंत्रापेक्षा लेखकाला काय सांगायचे असते ते जास्त महत्त्वाचे असते. तंत्रापेक्षा गाभा हा केव्हाही श्रेष्ठ असतो. 'मेन्स फेट'मध्ये मुख्य पात्रे सहा आहेत. ही पात्रे चिनी व युरोपियन आहेत. त्यांच्या भोवताली कट, कट हाणून पाडायला दुसरा कट व अत्यंत धोकादायक व भयप्रद वातावरण असते. या पार्श्वभूमीवर ही पात्रे आपल्या अस्तित्वाचा मागोवा घेतात. ही पात्रे सतत शारीरिक व मानसिक तणावात वावरत असतात. त्यांना विचाराने व कार्याने मानवाच्या विचित्र परिस्थितीपलीकडे जायचे असते. लेखकासारखीच ही पात्रे विचार व कर्तृत्व यांमध्ये दरी ठेवीत नाहीत. यशापेक्षा प्रयत्न करण्यातच त्यांना जास्त समाधान वाटते.

'अँटी-मॅमॉयर्स' हे मालरॉचे आत्मचरित्र. नावाप्रमाणेच आगळे, वेगळे. यात (Chronology) कालक्रम नाही. काळ आणि वेळ यांच्यामध्ये हे पुस्तक घड्याळाच्या लंबकासारखे हेलकावे घेत राहते. या पुस्तकात त्यांनी आपल्या आयुष्यातील नाट्यमय घटना दिल्या आहेत. मार्सेल प्राउस्टचे *Remembrance of Things Past* हे वाचताना मालरॉच्या आत्मचरित्राची आठवण येते.

मालरॉच्या वडिलांनी व बहुतेक त्याच्या आजोबांनीही आत्महत्या केली होती. कुटुंबाचा इतिहास असा असतानाही त्याच्यात कोणताही कडवटपणा आला नव्हता. त्याचे व्यक्तित्व संपूर्णपणे विकसित झाले होते. त्याची दोन मुले मोटारअपघातात मेली होती.

नेपोलियन, फ्रान्स्वा I, व लुई XIV यांच्या बाथरूममध्ये मोना लिसाचे चित्र (किंमत कोट्यवधी रुपये) असे हे आधी मालरॉ म्हणाला होता; परंतु मालरॉ मंत्री असताना त्याने फ्रान्सच्या असंख्य कलाकृती जगभर दाखविल्या. काही वर्षांपूर्वी मोना लिसाला जपानमध्ये नेण्यात आले होते. अर्थात या चित्राचा कोट्यवधी रुपयांचा विमा उतरविला होता.

'माझे हात रक्ताने माखले आहेत व माझे आयुष्य निरुपयोगी आहे' असे एकदा मालरॉ म्हणाला होता; पण त्या हातांनी असंख्य चित्रकलेच्या कृती कुरवाळल्या होत्या. मालरॉ 'मिनिस्टर ऑफ कल्चर' झाल्यानंतर त्याने पहिले कोणते काम केले? पॅरिसच्या सर्व कलाकृती (शिल्पशास्त्र, स्थापत्यशास्त्र) त्याने साफ करवून घेतल्या. या कलाकृतींच्या जोपासनेसाठी त्याने एक कार्यक्रम आखला. व्हर्सेलिसचे नूतनीकरण त्यानेच केले. पॅरिसमध्ये काही पुतळ्यांचे व कलाकृत्यांचे सफाईकाम चाललेले असतानाच एकदा द गॉल पहाणी करण्यासाठी आले. एक प्रख्यात शिल्प अर्धे साफ झाले होते, अर्धे मळकट होते. अर्धा साफ झालेला भाग इतका उठून रेखीव दिसत होता की, जनरल द गॉलनी हळूच एक शीळ वाजविली. आणखीन केव्हाही, कुठेही या ताठर, कर्मठ द गॉलनी शिट्टी वाजविली नव्हती!

युद्धोत्तर काळात जसे बेकेट-टाइप साहित्य बाहेर यायला लागले, तसाच अस्तित्ववाद सुद्धा फोफावू लागला. सूक्ष्म निरीक्षण केले तर असे आढळून येईल की, बेकेट-टाइप साहित्यात सुद्धा अस्तित्ववाद असतो. आंद्रे मालरॉचे म्हणणे असे आहे की, पुढील पन्नास वर्षांत अस्तित्ववाद काय किंवा दुसरा वाद काय; कॅपिटॅलिझम, कॉम्युनिझम किंवा कोणतीही इझम काय हे सर्व बाजूला राहील. माणसाने केलेल्या नवीन नवीन संशोधनामुळे एक वेगळेच सायन्स निर्माण होईल. सर्व वेगवेगळ्या empirical संशोधनाच्या कक्षा वाढून त्या सर्व इझमच्या पलीकडे जातील.

आंद्रे मालरॉच्या शेवटच्या पुस्तकाचे नाव आहे. Lazare. १९७२ मध्ये तो अत्यंत आजारी पडला होता व मृत्यूच्या जबड्यातून जेमतेम परत आला होता. हाही अनुभव त्याने या पुस्तकात चित्रित करून ठेवला आहे.

वयाच्या ७५ व्या वर्षी (२३-११-१९७७ रोजी) हा अष्टपैलू लेखक मृत्यू पावला.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | रेषा (कथासंग्रह) योगिनी जोगळेकर | रु. ७·०० |
| २. | गुन्हेगारा इथे न थारा (पोलीस कादंबरी) ई. एस्. मोडक | „ २५·०० |
| ३. | सविता राणी (कादंबरी) सौ. कुसुम अभ्यंकर | „ १८·०० |
| ४. | सर्वोत्कृष्ट मराठी कथा, खंड १० वा (कथा) राम कोलारकर | „ २२·५० |
| ५. | आपलेच दात दुसऱ्याचे ओठ (कथा) रमेश मंत्री | „ १२·०० |
| ६. | सकीना (कादंबरी) बाबा कदम | „ १५·०० |
| ७. | राणी (कादंबरी) पु. भा. भावे | „ १५·०० |
| ८. | हिंदू समाज एक अन्वयार्थ डॉ. इरावती कर्वे | „ १५·०० |
| ९. | घुसळण (कथा) उद्धव शेळके | „ ०६·०० |
| १०. | देवकेळ (कथा) मधु मंगेश कर्णिक | „ ०८·०० |
| ११. | मंगळसूत्र (कथा) इंद्रायणी सावकार | „ १०·०० |

'आमची दीर्घ मुदतीची वर्गणी भरली तर ती इतर वाचनालयाइतकीच (किंबहुना त्याहूनही कमी) होते.'

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७, सदाशिव पेठ पोस्टासमोर,
पुणे-३०


[पृष्ठ १९ वरील श्री. पु. शि. रेगे यांच्या 'सावित्री'वरील लेख सौ. नंदा पतकी यांनी लिहिलेला आहे. नजरचुकीमुळे नाव लेखासोबत छापले गेले नाही.]

प्रयत्न करीत आहेत. अनेक मंडळींच्या फेऱ्या सुरू झाल्याने गेले काही दिवस थंड असलेले जेपींचे निवासस्थान चांगलेच गजबजून गेलेले दिसते. जेपी भेटायला आलेल्या मंडळींचे म्हणणे ऐकून घेतात. स्वतःची तब्येत अत्यंत प्रतिकूल असतानाही भेटायला आलेल्या मंडळींचे मन ते सहसा मोडीत नाहीत. भेटण्याच्या निश्चित ठरवून दिलेल्या वेळा मात्र कटाक्षाने पाळाव्या लागतात. एक तर त्यांचे आठवड्यातील तीन दिवस वैद्यकीय उपचारातच खर्ची पडतात. सोमवार–बुधवार–शुक्रवार अशा तीन दिवशी डायलेसिसचा उपचार करून घ्यावा लागतो, जवळजवळ सात तास त्यामध्ये खर्ची पडल्याने ते पूर्णपणे थकून जातात. त्यामुळेच हे तीन दिवस अन्य कामाच्या दृष्टीने तसे निकामीच ठरतात. भेटायला येणाऱ्या मंडळींमध्ये जसे नेते असतात, तसेच त्यांच्यावर अपार श्रद्धा असलेले गोरगरीब नागरिकही असतात. अत्यंत विश्वासाने ते आपली गाऱ्हाणी त्यांच्यासमोर मांडतात. बिहारमधील छोट्या छोट्या खेड्यांतून जेपींच्या आदेशाप्रमाणे लोक–समिती स्थापन झालेल्या आहेत. १५० ते २०० कुटुंबांमधील व्यक्ती त्यामध्ये सहभागी होतात. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कामही लोकसमिती करते. या लोकसमितीसमोर काही प्रश्न उभे राहिले की, थेट जेपींकडे येतात. जनता पक्षाबद्दल तक्रार करतात. कांग्रेस आणि जनता पक्ष यामध्ये काहीच फरक नाही असे सांगायलाही ते कमी करीत नाहीत. जेपींनी स्वतः पुढे येऊन नेतृत्व करावे, त्यांना मार्गदर्शन करावे अशी त्यांची अपेक्षा असते. जेपी सारे ऐकून घेतात आणि अत्यंत संथ लयीमध्ये बोलण्यास सुरुवात करतात. ' लोक–समितीचे काम चालू राहिलेच पाहिजे असे आग्रहाने सांगतात. तुम्ही एकवटून उभे राहिलात तर त्याचा राजकीय नेत्यांवर दबाव राहील. तुमची सरकारदरबारी असलेली कामे नेमकी नोंदवून संबंधित मंत्र्यांची भेट घ्या. कदाचित् त्यामुळेच तुमचे काम चटकन होईल. माझी तब्येत ही अशी. तब्येत जर अशी दगा देती ना तर मी जरूर काही करू शकलो असतो ! ' खेडोपाडी पसरलेले भोळेभाळे लोक श्रद्धेने त्यांना भेटायला येतात आणि जेपी त्यांना यथाशक्ती दिलासा देतात. पाटण्यामधील जेपींच्या निवासस्थानी हा प्रकार नेहमीच चालू असतो. लोक एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपल्याला भेटायला येतात. तक्रारींची भेंडोळीच्या भेंडोळी आपल्यासमोर उलगडतात त्या अर्थी परिस्थिती गोंधळाची असली पाहिजे असे जेपींच्या मनाने घेतलेले दिसते. निराशा आणि चीड अशा दोन्ही भावना त्यांच्या मनात घर करून बसलेल्या दिसतात. विचारशक्तीवर पडणारा ताण आणि घसरती तब्येत यामुळे ते अधिकच अस्वस्थ होऊन त्यांची मनःस्थिती मोठी विचित्र होते, असे त्यांच्यावर उपचार करणाऱ्या एका डॉक्टरने सांगितले. स्वतःच्या तब्येतीची नेमकी अवस्था त्यांना माहीत असल्याने त्याबद्दल ते कधी तक्रार करीत नाहीत. आपली तब्येत अशीच ढासळत रहाणार हे त्यांनी गृहीतच धरलेले दिसते.

जनता पक्ष हा आपला पक्ष अशी त्यांची धारणा असल्याने ' ये भी तो मेरा एक अंग है । ' अशा शब्दांत ते जनता पक्षाचा उल्लेख करतात. जनता पक्षामधील त्रुटी आणि जनता शासनाच्या हातून झालेल्या चुका याबद्दल बोलावे की नाही याबद्दल त्यांची मनस्थिती द्विधा झालेली दिसते. याचे मुख्य कारण असे की, जनता पक्षाची शक्ती कमी होऊ नये असे त्यांना मनोमन वाटते. जनता पक्षाच्या शत्रूंचा फायदा होणार नाही आणि जनता पक्षाच्या सामर्थ्यावर परिणाम होणार नाही अशा पद्धतीने जनता पक्ष आणि सरकार यांच्याबर टीकाटिप्पणी करायची म्हणजे तारेवरील कसरतच आहे. जनता पक्षाबद्दल ते काही वेडेवाकडे बोलले की या पक्षाचे विरोधक त्याचा राजकीय प्रचारासाठी लाभ उठविणार, मग जेपींनी आपली परखड मते कधीच बोलून दाखवू नयेत काय ? त्यांच्याजवळच्या माणसांतही याबाबत मतभेद दिसतात. अलीकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकांमधील यशामुळे इंदिराजींचे जे पुनरागमन झाले आहे त्याला बळकटी येईल अशा पद्धतीची टीका जेपींनी करू नये असे अनेकांना वाटते. जनता पक्ष व सरकार याबाबत बोलताना त्यांनी संयम पाळावा अशीच त्यांची अपेक्षा दिसते. तथापी त्यांच्या परिसरातील बहुसंख्य लोकांना त्यांनी आपले विचार मोकळेपणाने व्यक्त करावे असे वाटते. छात्रयुवासंघर्षवाहिनीच्या तरुण नेत्यांचे याबाबत जेपींवर बरेच दडपण असलेले दिसते. आणीबाणीच्या काळात त्यांनी सुसंबद्ध भूमिगत चळवळ उभारली होती तर निवडणुकांच्या काळात त्यांनी जनता पक्षासाठी अंग मोडून काम केले. त्यांचे नेते स्वच्छच सांगतात की, बिहारमध्ये जनता पक्षाची यंत्रणा नाही. तेथे केवळ जनता सरकार आहे. आणि राज्याचे मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूरही ही गोष्ट मान्य करतात. आज छात्रसमितीचे हे नेते सरकारवर चांगलेच नाराज झालेले दिसतात. आज लोक शासनाच्या चुकांचा जाब आम्हाला विचारतात. आज आमच्या लक्षात येऊन चुकले आहे की, ग्रामीण भागात आम्हाला जर भरीव कार्य करायचे असेल तर सरकारबरोबरील संघर्ष ही एक अपरिहार्य गोष्ट आहे. सरकार आपल्या पक्षाचे आहे ही भावना आम्ही जितक्या लवकर सोडून देऊ तितके बरे, असे कडवट परंतु परखड विचार छात्रसमितीचे नेते बोलून दाखवितात. जेपींच्या जवळ असलेल्या एका गटाला असे वाटते की, जेपींनी झाल्या गोष्टीतील चुका दाखवीत बसण्यात वेळ काढू नये. त्यांनी निश्चित कार्यक्रम जनता पक्षासमोर ठेवावा आणि निश्चित कालमर्यादेमध्ये त्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन मिळवावे. या कार्यक्रमामध्ये तळामधील माणसाचे जास्तीत जास्त हित हे मुख्य विचारसूत्र असावे. जेपींनी याबाबत काय ठरविले आहे ? ते म्हणतात–' जनता पक्षाबद्दल मला पुष्कळ काही सांगायचे आहे; पण मी ते ' योग्य वेळी ' सांगेन !' त्यांचे कुटुंबीय नातेवाईक किंवा सल्लागार यांपैकी कोणासच जेपी नेमके काय करतील हे सांगता येत नाही. ते सगळ्यांचे ऐकून घेतात; परंतु निर्णय स्वतःच्या मनाने घेतात. त्यांच्याबाबत कोणतीही गोष्ट निश्चितपणे सांगता येत नाही. महत्त्वाच्या भाषणाच्या वेळी ते टिपण वापरीत नाहीत. त्यांचे आयत्या वेळचे भाषण विलक्षण प्रत्ययकारी आणि निश्चित विचार

देणारे असते. जेपींची आजची तत्वे पाहता ते काही मर्यादेबाहेर जाऊ शकत नाहीत हे तर स्पष्टच आहे. संपूर्ण क्रांतिसंमेलनाचे व्यासपीठ ही एक शेवटची मोठी संधी आहे. जेपी आणि जनता पक्ष यामधील संबंध ही देशाच्या राजकारणामधील एक महत्त्वपूर्ण बाब आहे. आता हे संबंध कोणते वळण घेतात हे पहायचे. ◻

## ◻ एका मुख्यमंत्र्यांच्या घरची गोष्ट !

राज्य कोणतेही असो नवीन मुख्यमंत्र्याने सत्तासूत्रे हाती घेतली की त्याची घरची मंडळीही लगोलग राजधानीच्या ठिकाणी येऊन दाखल होतात. अर्थात यात गैरवाजवी काहीच नाही. कुटुंबप्रमुख जेथे राहणार तेथेच घरवाले येणार हे सूत्र बिहारचे मुख्यमंत्रिपद संभाळणारे कर्पूरी ठाकूर यांच्या घरवाल्यांना मान्य असलेले दिसत नाही. कर्पूरीजी महिन्यातील वीस दिवस पाटण्यामध्ये मुक्काम ठोकून असले आणि त्यांचे शासकीय निवासस्थान पाटण्यामध्येच असले तरीही त्यांची पत्नी फुलेश्वरीदेवी, वडील गोकुळ ठाकूर गावाकडील आपल्या झोपडीत राहणेच पसंत करतात. न्हावी समाजात जन्मलेले कर्पूरीजी स्वकर्तृत्वावर पुढे आले असले तरी त्यांचे कुटुंबीय आपल्या मूळ गावी आपला मूळ व्यवसाय करीत, तसेच जो काही थोडाफार जमिनीचा तुकडा आहे त्याची मशागत करीत कालक्रमण करीत आहेत. मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय कसे रुबाबात रहातात, फिरतात याचा अनुभव अनेक वेळा येतो. त्या पार्श्वभूमीवर कर्पूरीजींचे पिताजी आणि अन्य कुटुंबीय ज्या पद्धतीने राहतात ते पाहिले म्हणजे कौतुक वाटते. करंट साप्ताहिकाने आपला प्रतिनिधी पाठवून या गोष्टीची खातरजमा करून घेतली. समस्तिपूरपासून काही मैलांवर असलेल्या या छोट्या गावी रिक्षा किंवा टॅक्सी करून जाता येते. या छोट्या गावावर रजपुतांचे वर्चस्व आहे आणि या रजपूत मंडळींना स्थानिक लोक बाबुसाहेब म्हणून पुकारतात. रजपुतांखेरीज जी अन्य मंडळी आहेत ती प्रामुख्याने मागासलेल्या जातीतील आहेत. अत्यंत हलाखीच्या अवस्थेत असूनही हे लोक मनाने तसे दिलदार आहेत. लज्जारक्षणार्थ पुरेसे वस्त्र नाही, रहायला चांगली झोपडी नाही; पण तरीही यांची कोणती खास तक्रार नाही. याच समाजातील न्हावी जमातीमध्ये कर्पूरीजींची एक झोपडी आहे. आज बिहारच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान झालेल्या या नेत्याची वाडवडिलार्जित मालमत्ता म्हणजे झोपडीवजा असलेले हे घर आणि जमिनीचा एक तुकडा ! बिहारच्या मुख्यमंत्र्यांचे घर पहावे म्हणून तेथे गेलो तर फुलेश्वरीदेवी ( म्हणजे तिथल्या शालिनीताई ) अगदी गावाकडे शोभून दिसावे अशा पद्धतीने दंतमंजन करीत होत्या. माझा परिचय करून देऊन त्यांच्याशी बातचीत सुरू केली.

प्रश्न : तुमचे सारे आयुष्य दारिद्र्याशी मुकाबला करण्यात खर्ची पडले आहे. आता तुमचे पतिराज मुख्यमंत्री झाल्याने तुम्हाला खूप समाधान वाटत असेल नाही ?

या प्रश्नावर त्यांनी जे उत्तर दिले त्यावरून हा समाज दारिद्र्यातही सुखासमाधानाने कसा राहू शकतो याचे उत्तरही मिळाले. त्या म्हणाल्या, 'समाधान म्हणा किंवा सुखदुःख म्हणा हे पुष्कळसे मानण्यावर अवलंबून आहे. संयुक्त विधायक दलाच्या मंत्रिमंडळामध्ये कर्पूरीजी ज्या वेळी उपमुख्यमंत्री होते त्या वेळी मी पाटण्यात त्यांच्याबरोबर रहात होते. त्या वेळचे पाटण्यामधील माझे वास्तव्य आणि आज माझे पती राज्याचे मुख्यमंत्री असतानाचे माझे येथील वास्तव्य यामध्ये मला काही खास फरक दिसत नाही. एक आहे, पाटण्यात जशी आगेमागे माणसे असतात तशी ती येथे नाहीत; पण इथे आपल्या लोकांबरोबर राहिल्याचे समाधान आहे. पाटण्यात होतो तरी आम्ही मक्याची रोटी खात होतो आता तीच डाळरोटी इथे खातो.

प्रश्न : कर्पूरीजी येथे येतात का ? घरच्या प्रश्नात ते कितपत लक्ष घालतात ?

उत्तर : त्यांना घरी यायला सवडच नसते. मुख्यमंत्री झाल्यापासून ते केवळ एक-दोन वेळाच इकडे आले. पत्रद्वारे मात्र त्यांच्याशी आमचा सतत संपर्क असतो. घरच्या प्रश्नामध्ये आवश्यकता वाटली तरच ते लक्ष घालतात.

प्रश्न : तुमचा येथील कार्यक्रम काय असतो ?

उत्तर : माझे वृद्ध सासरे येथे असतात, त्यांची देखभाल करणे, आमची जी छोटी जमीन आहे तिचेही काम पहाणे यात माझा वेळ जातो. खरं सांगायचं तर खेड्यात रहाणे मला फारच सुखायह वाटते.

कर्पूरीजींनी एका अनाथ मुलाचे संगोपन करून त्याला आपल्या कुटुंबातील एक समजून लहानाचे मोठे केले आहे. वकील यादव हे त्या मुलाचे नाव. आजही हा मुलगा कर्पूरीजींच्या कुटुंबियांबरोबरच रहातो आणि त्यांना सर्व प्रकारचे सहाय्य करतो. कर्पूरीजींचे वडील गोकुळ ठाकूर यांना पहाताच मी क्षणभर चमकलोच ! हातातील वस्तरा सफाईदारपणे चालवीत हा वृद्ध गृहस्थ समोर बसलेल्या इसमाची दाढी घोटीत होता. समोरचा मनुष्य निघून गेल्यावर मी त्यांच्याजवळ गेलो–ते शांतपणे म्हणाले, 'हे माझे रोजचे काम आहे.'

प्रश्न : दादाजी, आज आपले वय ८० वर्षांचे आहे. आपला मुलगा राज्याचा मुख्यमंत्री आहे. असे असताना आपल्याला आपला वंशपरंपरागत व्यवसाय चालविणे विचित्र वाटत नाही काय ?

उत्तर : छे, हो ! त्यात विचित्र वगैरे वाटण्यासारखे काय आहे? गेली अनेक पिढ्या आम्ही हाच व्यवसाय करीत आहोत. हा व्यवसाय मी सोडून देण्याचे कारण काय ? शिवाय कर्पूरी पैसे साठवीत नाही. तो त्याच्या पद्धतीने काम करतो. आम्ही आमचा व्यवसाय चालवितो.

प्रश्न : या व्यवसायात तुम्हाला किती पैसे मिळतात ?

उत्तर : मिळतात पोटापाण्यापुरते. गावातले तमाम रजपूत माझ्याकडेच येतात. आमच्या वर्षभरातील गरजा ते पूर्ण करतात.

प्रश्न : मुख्यमंत्री काही पैसे पाठवतात का ?

उत्तर : हं, काही वेळा पैसे येतात, विशेषतः सणासुदीला त्याला आमची याद येते; पण खरं सांगायचं तर पाठविण्यासाठी त्याच्याजवळही पैसे शिल्लक नसतात. पगाराचा मोठा भाग तो गोरगरिबांना मदत करण्यातच खर्ची घालतो आणि त्याबद्दल माझी काहीच तक्रार नाही.

जयप्रकाशजी या संदर्भात म्हणतात, राजकारण्यांच्या राहणीमधील थाटमाट पाहिला म्हणजे कर्पुरी ठाकूर हे निष्कलंक चारित्र्याचे एक चमकते उदाहरण आहे हे मान्य करावेच लागते !

## असे ऐकिवात आहे की...

□ □ तामीळनाडूचे मुख्यमंत्री एम्. जी. रामचंद्रन पुन्हा चित्रपटा-काम करण्यास सुरुवात करणार आहेत. चित्रपटमाध्यमाचा वापर मध्ये करूनच त्यांना शह देण्याची योजना तामिळनाडू विधानसभेतील विरोधी पक्षाचे नेते करुणानिधी यांनी हाती घेतली आहे. ही योजना हाणून पाडण्याच्या उद्देशानेच एम्. जी. रामचंद्रन यांनी पुन्हा तोंडाला रंग लावण्याचे ठरविले आहे. एम्. जी. रामचंद्रन यांच्या या निर्णयाला अनुकूल–प्रतिकूल असे दोन्ही विचार पुढे येत आहेत. एका नागरिकाने त्यांच्या या निर्णयाविरुद्ध चक्क न्यायालयाकडे धाव घेतली आहे. न्यायालयाने जर काही आक्षेप घेतले नाही तर पडद्यावरून मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर क्षेपावलेले एम्. जी. आर. पुन्हा एकदा पडद्यावर येऊन दाखल होतील. अर्थात आता पडद्यावर आले तरी आपली जेम्स बाँड प्रतिमा मात्र त्यांना आता संभाळता येणार नाही. मुख्यमंत्र्याने केल्या तरी शोभून दिसतील अशा अबा-दाबाच्या भूमिकाच ते स्वीकारतील.

□ □ महाराष्ट्रात नवीन मंत्रिमंडळ सत्तेवर येऊन महिनाभराचा काळ होतोय न होतोय तोच हे दुतोंडी गाडे पुढे चालविणे कठीण आहे याची प्रचीती येऊ लागली आहे. महाराष्ट्रातील कॉंग्रेस खाऊन टाकण्यास इंदिराजी आतुर झाल्या असून कालपरवापर्यंत त्यांच्या नावाने लाखोली वाहणाऱ्या वसंतराव नाईक यांनी या कामी पुढाकार घेतला आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत प्रदेश कॉंग्रेसमध्ये या विषयाबाबत काही निश्चित निर्णय लागून गेला असेल. एक गोष्ट नक्की की, वसंतरावांनी कितीही आव आणला तरी सारी कॉंग्रेस आपल्याबरोबर नेणे त्यांना खरोखरच अवघड आहे. त्यातून बहुमत तर इतके डुगडुगते आहे की, बारा–पंधरा आमदारांचा गटही या सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यास समर्थ आहे. ही वस्तुस्थिती हेच नामदार शरद पवार यांचे सगळ्यात मोठे सामर्थ्य असून वेळ आलीच तर ते याही मार्गाचा अवलंब करतील. तसे त्यांनी केले तर तत्त्वासाठी संघर्ष केल्याचे श्रेय मिळेल आणि कुणी सांगावे कदाचित मुख्यमंत्रीपदही मिळेल.

□ □ शहा आयोगाने आपला जो अहवाल सादर केला आहे त्याची छाननी केल्यावर इंदिराजींवर काही वेगळे खटले दाखल करणे आणि आवश्यकता भासल्यास त्यांना अटक करणे शक्य आहे असा अहवाल गृहमंत्रालयाने तयार केला आहे. तथापी असे ऐकिवात आहे की, या गोष्टीला घिसाडघाईने मंजुरी देण्यास मंत्रिमंडळ तयार नाही. चरणसिंग आणि राजनारायण यांची भूमिका आग्रही असली तरी अटलजी आणि मोरारजीभाई यांना या प्रकरणी घाई पसंत नाही. इंदिराजी या आज एक स्फोटक राजकीय अणुबॉंबसारख्या आहेत. त्यांना हात तर लावलाच पाहिजे; पण तो केव्हा आणि कोणत्या पद्धतीने हे मात्र पूर्ण विचार करूनच ठरवावे लागणार आहे. या प्रकरणी एकदा हात पोळले असल्याने पंतप्रधानांकडून दिला जाणारा सबुरीचा सल्ला नाखुषीने का होईना परंतु स्वीकारला जात आहे. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

चक्रमचक्री : पृष्ठ ८ वरून

की, अपमान आणि दुःख यांना कोणी इतर व्यक्ती कारणीभूत नसून आपल्या पूर्वकर्मांचा तो परिणाम आहे.

अहो, पण हे सर्व स्थितिवादी विचार आहेत. आपल्याला तर इथली सर्व परिस्थिती बदलायची आहे: त्यासाठी नवे, कल्पक निर्णय घ्यायला लागतील. प्रत्येक गोष्ट जर पूर्वसंचितानुरूप ठरणार असेल, तर धाडसी पावले उचलता कशी येणार ?

हां, इथे तुम्ही गोंधळ करीत आहात. आपली पूर्वकर्मे आपल्या भविष्यकालीन कृतींवर सत्ता गाजवीत नाहीत. भविष्यातील आपली कार्ये आचरण्यास आपण पूर्ण स्वतंत्र आहोत. कर्मसिद्धान्ताचा अर्थ इतकाच आहे की, आपण जे कर्म करू त्याच्या परिणामांपासून आपल्याला सुटका नाही. ते भोगलेच पाहिजेत. उलट, मोरारजी असे स्पष्ट सांगतात की, कर्मसिद्धान्तामुळे सत्कर्माकडे प्रवृत्ति बळावते आणि मनुष्य आपले भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी झटू लागतो.

## निःस्वार्थ जनसेवा

ठीक, ठीक. या कर्मसिद्धान्ताखेरीज आणखी कोणत्या गोष्टी आपले पंतप्रधान मानतात ? ते गांधीवादी असल्याने सत्य, अहिंसा, अपरिग्रह व अस्तेय इत्यादी सर्व काही असेलच.

होय, महात्मा गांधींप्रमाणेच सत्याचरण हे एक जीवनाचे अढळ तत्त्व त्यांनी मानले आहे. किंबहुना त्यांची सत्यनिष्ठा ही त्यांच्या ईश्वरनिष्ठेचाच एक भाग आहे. औचित्य-विवेक, सुसंगत वर्तन, अहिंसा यांचाही समावेश सत्यनिष्ठेतच होतो. त्याहूनही महत्त्वाचा भाग म्हणजे निष्कपट. महाभारतात म्हटलेच आहे, 'न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम्' सत्याला कपटाचा स्पर्शही सहन होत नाही. सत्यनिष्ठ माणसाला लबाडीचा तिरस्कार वाटतो.

पण आपण तर असे धरून चालतो की, राजकारण म्हणजे कपट, विश्वासघात, लबाडी आणि खोटेपणा यांचे जंजाळ. निदान भारतीय राजकारणाला तरी गेल्या बारा वर्षांत ही अवकळा आली आहे. अहो, आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा विश्वासघात करून ज्यांनी आपल्या राजकीय उत्कर्षाच्या नाटकाची नांदी केली आणि ज्याचे भरतवाक्य 'अविश्वसनीय साक्षीदार' अशा शिक्क्याने 'हायकोर्टाने' लिहिले, त्या नाटकाच्या नायिका इंदिराबाई राजकीय रंगमंचावर गाजत असताना कसली सत्याची आणि निष्कपटतेची चर्पटपंजरी चालवता ?

बाई बाजूलाच राहू द्यात. बाईंचे पिताजी जवाहरलाल नेहरू तरी सत्त्वशील राजकारणी होते ना ? पण त्यांच्याही विषयी या संदर्भात मोरारजीभाईंनी दिलेला अभिप्राय मार्मिक आहे. ते म्हणतात की, "नेहरू ईश्वराचे अस्तित्व मानत नसल्याने सत्यावरही त्यांची निष्ठा नव्हती. सर्वसाधारण धोरण म्हणून सत्याचा अवलंब ते करीत असले तरी अपवादात्मक प्रसंगी लबाडीने वागण्यास ते कमी करीत नसत. मात्र लबाडीचा आरोप आपल्यावर येऊ नये म्हणून कपटाची कृत्ये ते आपल्या हस्तकांकरवी करीत. अशा कामांसाठी माझा उपयोग होणार नसल्याने त्यांचे आणि माझे फारसे रहस्य जमले नाही." राजकारणात नीतिमूल्यांचे स्थान कोणते याविषयी आधुनिक इतिहासात नेहमीच दोन मतप्रवाह रहात आले आहेत. टिळक आणि गांधी यांचाही या बाबतीत वाद झाला होता आणि त्या वेळेला गांधींनी टिळकांना नास्तिक म्हटले होते, असा प्रवाद आहे. आता बाईंचे राजकारण पुरतेच बेबंद होते आणि त्याची कोणीच तरफदारी करणार नाही. मोरारजीभाई मात्र गांधींच्या पंथातले असून राजकारण सत्यनिष्ठच असले पाहिजे असा आग्रह धरणारे आहेत.

पण जर सत्यनिष्ठा आणि निष्कपटपणा यांना मोरारजी इतके महत्त्व देणारे आहेत, तर ते राजकारणात राहिलेच कशाला ? नेहरूंसारखा थोर राजकारणी देखील त्यांच्या सत्यनिष्ठेच्या कसाला उतरू शकत नसेल, तर राजकारणाचे आणि सत्यनिष्ठेचे कोष्टक जुळणारे नाही असे समजून निदान सत्तेच्या राजकारणातून तरी त्यांनी दूर व्हावयास हवे होते की नाही ?

बरोबर आहे; हा प्रश्न अगदी साहजिक आहे. मोरारजी राजकारणात राहिले याचे कारण लोकसेवेतूनच सत्यस्वरूपी ईश्वराचा शोध शक्य आहे अशी त्यांची धारणा आहे. आपण जर निःस्वार्थ जनसेवा करण्याची ऊर्मि बाळगली असेल तर राजकारणाच्या भोवऱ्यात राहूनही त्यातल्या लबाडीपासून दूर राहू शकू असे त्यांना वाटते.

## आग्रहीपणा

मोरारजींवर हट्टाचा नि आग्रहीपणाचा जो आरोप वारंवार करण्यात येतो याचे कारणही हेच असेल. चार-चौघांशी जमवून घ्यायचे असेल तर लबाडी, गुळमुळीतपणा, दुहेरी धोरणे खपवून घ्यावी लागतात. मोरारजींची सत्यनिष्ठा जर निरपवाद असेल, तर हे त्यांना कसे जमणार ?

आपण आग्रही आहोत, हे मोरारजींना अजिबात मान्य नाही. ते म्हणतात की, "दुसऱ्यांची मते समजावून घ्यायला आणि माझी मते समजावून द्यायला मी नेहमी तयार असतो. अशा स्थितीत दोन बाजूंचे जमले नाही तर केवळ मीच आग्रही कसा ठरतो ? दुसरीही बाजू तितकीच आग्रही म्हणावी लागेल. जेथे तत्त्वाचा प्रश्न नसून केवळ मतभेदाचा प्रश्न असेल तिथे मी बहुमताचे म्हणणे नेहमीच मान्य केले आहे" याला उदाहरण द्विभाषी मुंबई राज्याच्या विभाजनाचे. द्विभाषी मुंबई राज्याचे विभाजन होऊ नये, सध्याच्या परिस्थितीत ते योग्य नाही असे मोरारजीभाईंचे मत होते. मात्र भाषिक राज्यरचनेला त्यांचा तत्त्वतः विरोध नव्हता. त्यामुळे काँग्रेसने मुंबई राज्याचे विभाजन करण्याचे बहुमताने ठरविल्यानंतर त्यांनी ते मान्य केले. याउलट गोव्यात लष्करी कारवाई करण्यास त्यांचा अहिंसेच्या तत्त्वानुसार विरोध होता. म्हणून काँग्रेस वर्किंग कमिटीत गोव्यासंबंधींच्या ठरावाला त्यांनी शेवटपर्यंत विरोध केला.

पंडित नेहरूंचे माजी सचिव मथाई यांनी अलीकडे जे पुस्तक लिहिले आहे, त्यांत म्हटले आहे की, स्वतः नेहरू मोरारजींचे वर्णन 'स्ट्रेटेस्ट मॅन' असे करीत असत. मोरारजी आणि टंडन ही त्यांना भेटलेली सर्वांत सरळसोट माणसे होती. नेहरूंनी केलेले हे वर्णन यथार्थ दिसते.

नेहरूंनी केलेले मोरारजींचे वर्णन अगदी चपखल आहे. मात्र त्याला आणखी थोडी जोड द्यावयाला हवी. आपण जेव्हा एखाद्याला सरळसोट माणूस म्हणतो तेव्हा त्याला दुसऱ्याची पर्वा नाही किंवा व्यवहारातले छक्केपंजे त्याला कळत नाहीत असा एक भाव त्यात असतो. मोरारजींचा सरळसोटपणा या अर्थाचा नाही. आयुष्यभराच्या चिंतनातून आणि आयुष्यात खाल्लेल्या टक्क्याटोणप्यांच्या अनुभवांतून त्यांनी जो एक व्रतस्थपणा अंगी बाणवून घेतला आहे त्याचे व्यावहारिक रूप म्हणजे हा सरळसोटपणा आहे. सरळ रेषा हे अनंत लांबीची त्रिज्या असलेले वर्तुळच आहे, असे म्हणतात. अनंताच्या चिंतनातून व्यवहाराची वर्तुळे पहाताना माणूस सरळसोटच बनणार ! □